

वर्ष ७ अंक १७

# अंगारमळा

पिढ्यान्‌पिढयांच्या अबोलतेला लिहिते –बोलते
करण्याचा एक इवलासा प्रयत्न

दहावे वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन

## गुरुकुंज मोझरी विशेषांक




# सुखी और समृध्द हो किसान अपना
# कलश सीड्स का है बस यही सपना



## कलश सीड्स प्रा. लि.

मंठा रोड, जालना – ४३१२०३.

Kalash

# अंगारमळा

**Title Code :** MAHMAR47450

**वर्ष ७ । अंक १७ । मार्च २०२३**

**मूल्य : रु. ५०**

**अंगारमळा** हे त्रैमासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा- ४४२ ३०७ यांनी मुद्रीत करून तेथेच प्रकाशित केला.

संपादक
**गंगाधर मुटे**

अंक मांडणी
**सुरज भोयर**

वार्षिक वर्गणी : रु. १५० केवळ
संपर्क :
**अंगारमळा**
**मु.पो. आर्वी (छोटी)**
**ता. हिंगणघाट, जि. वर्धा**
**पीन कोड - ४४२ ३०७**
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004

**ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :**
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200

अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Title Code : MAHMAR47450

## अंतरंग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | युगात्मा शरद जोशी स्मारक | उपक्रम | | २ |
| २ | अकरा भूमिपुत्रांनी शिकवला धडा | युगात्मा शरद जोशी | अमृत कुंभ | ६ |
| ३ | सृष्टीच्या पालनहाऱ्याला मरावेसे का वाटते? | डॉ. किशोर सानप | अध्यक्षीय भाषण | ९ |
| ४ | १० वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन - गुरुकुंज मोझरी | रवींद्र दळवी | कव्हरस्टोरी | १५ |
| ५ | संमेलनाचे ठराव .................................. | | वृत्तांत | १७ |
| ६ | स्त्री महादेवासारखा नवरा का मागते? विष्णूसारखा का नाही? | सौ. प्रज्ञा बापट | वनिताविश्व | १८ |
| ७ | शेतकरी कवी संमेलन वृत्तांत | राजेंद्र फंड | वृत्तांत | २० |
| ८ | गझल मुशायरा वृत्तांत | निलेश कवडे | वृत्तांत | २४ |
| ९ | शेतकरी साहित्य संमेलन साहित्य परीक्षणाच्या निमित्ताने | अंकुश शिंगाडे | परीक्षण | २७ |
| १० | विठ्ठलाची गझल | सुनिल बावणे | मृदगंधा | ३० |
| ११ | शेतकरी ठार | सागर लाहोळकार | मृदगंधा | ३० |
| १२ | सर्जा राजा दोन पाऊलं पुढे | राजेंद्र उदारे | मृदगंधा | ३१ |
| १३ | साथ तुझीच असेल | रझिया इस्माईल जमादार | मृदगंधा | ३१ |
| १४ | मातीचे देणे सरले नाही | कपिल सावळेश्वरकर | मृदगंधा | ३२ |
| १५ | ये असा रस्त्यावर | खुशाल दादाराव गुल्हाने | मृदगंधा | ३२ |
| १६ | घेऊ राखेतूनउभारी | अनिकेत जयंतराव देशमुख | मृदगंधा | ३३ |
| १७ | वांझ साहित्य निर्माण होण्याऐवजी निर्माणच न होणे काय वाईट? | गंगाधर मुटे | अध्यक्षीय भाषण | ३४ |

# युगात्मा शरद जोशी स्मारक

युगात्मा जोशींचे स्मारक म्हणजे त्यांच्या अपूर्ण स्वप्नांची पूर्तता करणारे आदर्श मॉडेल असेल. या उपक्रमाचे ३ विभागात वर्गीकरण असेल.

**१) स्मृतींचे जतन –** युगात्मा शरद जोशींच्या स्मृतींची जपणूक, स्मृती समारंभ, प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, चिंतन–मनन सुविधा व विचारप्रसारासाठी युगात्मा स्मारक

**२) साहित्य प्रसार –** युगात्मा शरद जोशींच्या साहित्याच्या प्रसारासाठी युगात्मा ग्लोबल ग्रंथालय. ग्लोबल ग्रंथालयाची व्याप्ती मोठी असेल जेथे शेतीविषयातील सर्व साहित्याचा संग्रह असेल. सोबतच जपश्रळपश ग्लोबल डिजिटल ग्रंथालय ही कल्पना सुद्धा आपल्याला साकार करायची आहे. शेती विषयातील सर्व ग्रंथ, प्रबंध, शोधप्रबंध, पुस्तके, विशेषांक, कादंबरी, काव्यसंग्रह यासहित सर्व शेती साहित्य एकत्रितपणे वाचकांना व अभ्यासकांना उपलब्ध करून देणे हा यामागील प्रमुख उद्देश असणार आहे.

**३) युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी –** सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती व निर्यात शेतीची शरद जोशींची संकल्पना साकार करण्यासाठी

**पहिले वर्ष – पहिला टप्पा :**

पहिल्या टप्प्यात पहिल्यावर्षी आपल्याला युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनीवर लक्ष केंद्रित करायचे आहे. ‘‘सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती..... म्हणजेच युगात्मा शरद जोशींच्या स्वप्नातील भारत’’

बदलत्या काळाच्या प्रवाहाचा वेध घेत १९९२ मध्ये द्रष्टे शेतकरी नेते शरद जोशी यांनी शेतकरी उत्पादक कंपनीची संकल्पना मांडून शेतकऱ्यांनी यापुढे सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती आणि निर्यात शेती अशी चतुरस्त्र शेती करावी, असे आवाहन केले होते. सोबतच काही प्रात्यक्षिके म्हणून त्या दिशेने पाऊलही टाकले होते पण त्यावेळेस शासकीय धोरणे शेती प्रक्रिया व्यवसायाला पूर्णतः प्रतिकूल असल्याने ही दार्शनिक प्रात्यक्षिके आदर्श मॉडेलमध्ये रूपांतरित होऊ शकली नव्हती. त्यासोबतच रस्त्यावरची लढाई निकराने लढण्यातच पुरेशी दमछाक झाल्याने संघटनेच्या पाईकांना आर्थिक लढाई लढायला उसंतच मिळाली नाही.

१९९२ मध्ये शरद जोशींच्या गुरुकिल्लीकडे कानाडोळा करणाऱ्या शासनाने कालांतराने मात्र हीच संकल्पना शरद जोशींचे नाव न घेता आडपडद्याने स्वीकारली. शेतमाल प्रक्रियेला प्रतिकूल असलेली पूर्वीची धोरणे हळूहळू अनुकूल व्हायला लागली. शेतकरी उत्पादक कंपन्यांना मदत करण्यासाठी स्वतंत्र विभागांची निर्मिती झाली आणि आता तर शेतकरी उत्पादक कंपन्यांना भरघोस अनुदान देणाऱ्या विविध योजना अस्तित्वात आल्या आहेत. जागतिक बँकेच्या सहकार्याने अर्थपुरवठा केला जात आहे. शेतकऱ्यांनी एकजूट करून शेतमाल मूल्यसाखळी विकसित करण्याची, प्रक्रिया उद्योग उभारण्याची, शेतमाल प्रक्रिया उद्योगाचा पाया रचण्याची हीच योग्य वेळ आहे.

युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी Companies Act, 2013 नुसार रजिस्टर झाली असून ३१ जानेवारी २०२२ रोजी नोंदणी, पॅन व टॅन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

## सभासद व्हा, भागधारक व्हा

१. १८ वर्षावरील कुणीही भारतीय व्यक्ती कंपनीचा भागधारक होऊ शकेल.

२. महिलांना प्राधान्य

आपण सभासद (शेअरहोल्डर) होऊ इच्छित असाल तर आपणास खालील बाबींची पूर्तता करावी लागेल.

१) आपला सभासद अर्ज सादर करावा लागेल. अर्जासोबत आधार, पॅन, फोटो व सातबारा, ८ अ. जोडावा लागेल. कुटुंब प्रमुखाच्या नावाने असलेला ७/१२ चालेल. स्वतःच्या नावानेच असला पाहिजे हे बंधन नाही.

२) शेतकरी नसल्यास भूमिहीन असा उल्लेख अर्जात करून बिगर शेतकऱ्यांनाही सभासदत्व (शेअर) मिळवता येईल.

२) शेअरची रक्कम कंपनीच्या खात्यावर जमा करावी लागेल.

३) १८ वर्षावरील व्यक्ती सभासद होऊ शकतो.

४) एका कुटुंबातील कितीही सदस्य सभासद होऊ शकतात.

**सभासदत्व मिळवण्यासाठी करावयाचा अर्ज :**

१) www.sharadjoshi.in/node/226 या लिंकवरून अर्ज डाउनलोड करावा. पूर्ण फॉर्म व्यवस्थित भरून कंपनीच्या पत्यावर पोस्टाने पाठवावा. (कुरिअरने पाठवू नये.) तसेच व्यवस्थित स्कॅनिंग करून एक प्रत yugatma@gmail.com वर किंवा व्हाटसपवर पाठवावी.

२) 'युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी' या नावे चेक लिहून अर्जासोबत जोडावा किंवा ऑनलाईन रक्कम भरण्यासाठी बँक डिटेल्सकरीता संपर्क करावा किंवा शुल्काची रक्कम प्रत्यक्ष बँकेत जाऊन रोखीने किंवा NEFT/RTGS च्या माध्यमातून भरावी व पैसे भरल्याची पावती अर्जासोबत जोडावी.

३) अधिक माहिती yugatma.sharadjoshi.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## शेअर मूल्य :

पुरुषांसाठी शेअर मूल्य : प्रती शेअर एकूण रक्कम रु. १६००/- किंवा त्यापटीत शुल्क भरून कंपनीचे सभासद-भागधारक होता येईल.

महिलांसाठी शेअर मूल्य : प्रती शेअर एकूण रक्कम रु. १४००/- किंवा त्यापटीत शुल्क भरून महिलांना कंपनीचे सभासद-भागधारक होता येईल.

**संचालक मंडळ :**

**आमचे मार्गदर्शक**

सौ. सरोजताई रवीभाऊ काशीकर आमचे मार्गदर्शक रामनगर मगनवाडीजवळ वर्धा

ॲड. श्री वामनराव चटप आमचे मार्गदर्शक देशपांडे वाडी, राजुरा ता– वरोरा जि. चंद्रपूर

**संस्थापक संचालक मंडळ**

श्री. गंगाधर महादेवराव मुटे, आर्वी छोटी, ता. हिंगणघाट जि. वर्धा

सौ. शैलजाताई लक्ष्मीकांतजी देशपांडे, जाजुवाडी, आर्वी ता. आर्वी जि. वर्धा

सौ. वंदनाताई वामनराव चटप, देशपांडे वाडी, राजुरा ता. वरोरा जि. चंद्रपूर

श्री. रमेशराव जिजाभाऊ खांडेभराड, शिवनगर, जालना ता. जि. जालना

श्री. दिलीपराव लक्ष्मणराव भोयर, धनोडी, ता. वरुड जि. अमरावती

श्री. जयंतराव रामचंद्र बापट, पहूर इझारा ता. कळंब जि. यवतमाळ


श्री. सुभाषराव धनुजी बोकडे, कुरझाडी जामठा ता. जि. वर्धा

श्री. रविंद्रजी जगन्नाथजी खोडे, सेलडोह ता. सेलू जि. वर्धा

सौ. उषाताई सारंगजी दरणे, टाकळी दरणे, ता. देवळी जि. वर्धा

सौ. मनोरमाताई गणेशराव मुटे, आर्वी छोटी ता. हिंगणघाट जिल्हा– वर्धा

# आमचे मार्गदर्शक



ॲड. श्री वामनराव चटप



सौ. सरोजताई रवीभाऊ काशीकर

# संस्थापक संचालक मंडळ




सौ. शैलजाताई ल. देशपांडे



श्री. गंगाधर म. मुटे



सौ. वंदनाताई वा. चटप



श्री. जयंतराव रामचंद्र बापट




श्री. रमेशराव जि. खांडेभराड



श्री. दिलीपराव ल.भोयर



सौ. उषाताई सारंगजी दरण



श्री. सुभाषराव ध.बोकड



सौ. मनोरमाताई गणेशराव मुटे


# अकरा भूमिपुत्रांनी शिकवला धडा

**हरिश्चंद्र राजा, तारामती राणी**
**डोंबाघरी भरी पाणी, डोंबाघरी पाणी..**

मृदंग झांजांचा कल्लोळ आणि गाणाऱ्यांची सामूहिक बेसूरता ओलांडून अर्थ असा भिडला, की गळ्यातला आवंढा गिळेना.

आणीबाणीचा काळ अजून चालू होता. भूमिहीनांना दोनअडीच एकर जमिनीची वाटणी चालली होती. माझ्या जमिनीच्या पश्चिमेला दहाबारा घरांना मिळालेल्या जमिनी पडून राहिल्या होत्या. महाळुंग्याच्या शिवळे पाटलांच्या जमिनी कित्येक आदिवासींना मिळालेल्या, रिकाम्याच पडल्या होत्या. हे प्रकरण मला काही समजेना. खरे म्हणजे जमीन मिळाल्यानंतर नवभूधारकांनी उत्साहाने जमीन कसायला लागले पाहिजे होते. जमिनीचे फेरवाटप झाले, जमीन नसणाऱ्यांना जमिनी मिळाल्या म्हणजे ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न सुटतो असे आम्ही कित्येक वर्षे ऐकत, घोकत होतो आणि या जमिनी हाती आलेल्यांना त्याचे काहीच कौतुक नव्हते.

कुणी म्हणाले, जमीन मिळाली तरी औते पाहिजेत, बैल पाहिजेत, बियाणे पाहिजे, खतं पाहिजेत, नुसती जमीन घेऊन काय करता? अकलूजला का कुठे कुणी पुढाऱ्यांनी नवा प्रयोग केला. नवभूधारकांना त्यांच्या जमिनी नांगरून, पेरून द्यायच्या. मी मनात विचार केला, पाचपंचवीस नवभूधारक एकत्र झाले, थोडीफार पैशाची सोय झाली, तर सामूहिक शेती जमणार नाही का? खेडच्या प्रांत अधिकाऱ्यांनी दावडीच्या नवभूधारकांची गाठ घालून दिली. अडचण कोणतीच नव्हती, जुना मालक थोडा कटकट्या होता; पण कायद्याने त्याचे काहीच चालण्यासारखे नव्हते. मामलेदारांनी स्वत: येऊन जमिनीच्या सीमा काढून दिल्या. एकूण अकरा भूमिहीनांना सलग जागी जमीन मिळाली होती. अकरा घरच्यांची बैठक बोलावली. निम्मेअधिक चावडीवर आले. सगळ्यांनी सामूहिक शेती करायची. सगळ्यांची जमीन सामूहिक मानायची. माझा हा तुकडा असे म्हणायचा कोणालाच अधिकार राहणार नाही. नाही तर विहिरीची जागा ज्याच्या जमिनीवर लागेल, तो विहीर खणून झाल्यावर म्हणायला लागायचा– मला नाही तुमच्या सामूहिक शेतीतसामील व्हायचे. व्हा माझ्या जमिनीच्या बाहेर; म्हणजे मग सगळेच मुसळ केरांत जायचे. शेतीचे नाव ठरले, **'अकरा भुमिपुत्र'**.



एक एक गमतीची गोष्ट लक्षात आली. या अकरापैकी तीनच खऱ्या अर्थाने भूमिहीन होते. त्यांच्या घरचे पुण्या–मुंबईला नोकरीत होते. त्यांना शेती नावावर झाली यात आनंद होता. वेगवेगळ्या पुढाऱ्यांना भेटून त्यांनी जमीन मिळावी याकरिता पैसा खर्चही केला होता; पण जमीन कसण्यात त्यांना मनातून काहीही उत्साह नव्हता. माझ्यासमोर, अधिकाऱ्यांसमोर जमीन कसण्याबाबत आपल्या उत्साहाचे प्रदर्शन करण्यात मात्र त्यांची अहमहमिका चाले. बँकेकडून कर्ज मिळवायची व्यवस्था मी खेटे घालून घालून करून आणली. बरोबर अकरापैकी फक्त एकच भुमिपुत्र; बाकीचे सगळे घरच्या कामासाठी गुंतलेले. एकोणिसाव्या शतकातील मिशनऱ्यांच्या धाटणीवर मी स्वतःलाच धीर देत होतो. आपल्यावर विश्वास ठेवण्यासारखे आपण प्रत्यक्षात काय करून दाखवले आहे? त्यांनी निरुत्साह दाखवावा हे साहजिकच नाही, योग्यही आहे. काम उभे राहील तस तसा त्यांचा विश्वास वाढेल.

जमीन डोंगराच्या कपारीत उतरणीवर, बांधबंदिस्तीचे मोठे काम करणे जरूर होते. संबंधित खात्याच्या मंडळींनी काम करून देणे कबूल केले. अट एक–कामाकरिता रोजावर लावायची माणसे जागेवर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आमची. मी आनंदाने कबूल केले. तालुक्याच्या गावाहून दावडीला आलो. दोन चार भुमिपुत्र भेटले. त्यांना निरोप दिला, दोनचार दिवसांत आपण शेतीवर राहायला जायचे. प्रत्येक नवभूधारकाच्या घरातली दोन माणसे तरी राहायला आली पाहिजेत. बांधबंदिस्तीचे काम आपणच केले तर पदरचा खर्च करावयाच्या ऐवजी मजुरी मिळेल. जे गैरहजर राहतील त्यांना

वेगळा भार द्यावा लागेल.

ठरलेल्या दिवशी सकाळी उजाडता उजाडता दावडीला गेलो. कोणत्याच घरचे कोणीच सापडेना. तास दोन तासांत चार घरातली नऊ माणसं हाती लागली. त्यांना माझ्या जीपमध्ये घालून त्यांच्या जमिनीवर नेले. जमिनीवर अफाट दगडगोटे गोळा करायला सुरुवात झाली. दगड लावून घेऊन पहिल्यांदा रात्रीकरिता आडोशाच्या भिंती करून घ्यायला सुरुवात झाली. संध्याकाळी कंदिलाच्या प्रकाशात सगळ्यांनी भाकऱ्या खाल्ल्या.

मायदेशी परत आल्यापासून आयुष्याला काही दिशा सापडते आहे असं वाटलं. जेवण झाल्यावर दोन तरुणांनी गावात जाऊन उद्या सकाळी प्रत्येक घरच्या दोघादोघांना गोळा करून आणण्याची हमी देऊन गावाकडे प्रस्थान ठेवले. एक दोन तशीच सटकली. आम्ही सहा जण दगडांच्या रचलेल्या भिंतींच्या आडोशात डोंगरातील वाऱ्याच्या भणभणाटात रात्र काढली. दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत नवीन कोणीच आले नाही. गावातल्या कोणत्या तरी मर्तिकाची बातमी लागली. राहिलेले भूमिपुत्रही लगबगा गावाकडे जाऊ लागले. अशाच प्रकारची पुनरावृत्ती होऊ लागली. तेव्हा मी सगळ्यांना एकदा विचारले, ‘तुमची अडचण तरी काय आहे? तुम्हाला शेती करायची आहे की नाही? नसेल करायची तर मला मोकळे करा.’

‘वा, वा! असं कुठं झालंय? तुम्ही गेला म्हणजे सगळंच कोसळलं बघा. मग तर आम्हाला तोंडात मातीच घालावी लागेल अनब तो मालक आम्हाला आता जगू देईल का? साहेब, असं करू, जरा बेताबेतानंच घेऊ, मालकाला एकदम चिडवणं बरं नाही...‘ वगैरे, वगैरे, वगैरे.

माझ्या एकूण प्रकरण लक्षात आलं. एव्हाना हजार दोन हजार मी पदरचे खर्चून बसलो होतो. अकरापैकी एकालाही जमीन कसण्याची आणि कष्ट करण्याची इच्छा नव्हती. बिगर शेती उत्पन्नाचे साधन असतानाही भूमिहीन म्हणून नावे नोंदवून त्यांनी जमीन मिळवली होती. माझ्यासारख्या शहरी माणसापुढे भूमिहीनतेचे करुण नाटक करून दाखवायचे कौशल्य त्यांना जमले होते. गावकऱ्यांपढे त्यांचे नाटक चालत नव्हते. त्यांना जमीन कसायची नव्हती. पुढेमागे खरीददार सापडला तर विकून दोन पैसे करायचे होते आणि जमले तर हस्तांतरित जमिनी म्हणून त्या कदाचित परतही मिळवायच्या होत्या.

....पण यात त्यांचे कुठेच चुकत नव्हते. चुकत माझेच होते. बँकेच्या कर्जाचे प्रकरण करतानाच माझ्या लक्षात आले होते. विहिरीचा खर्च करून, पाण्याची सोय करून शेती करायची म्हटले तर कोणतेही पीक काढले तरी बँकेच्या कर्जाची परतफेड या जन्मी शक्य नव्हती. दरवर्षी चांगले पीक येईल असा हिशेब केला तरी खर्च फिफ़टत नव्हता. ही काय गंमत आहे. याचा उलगडा मला स्वतःला त्या वेळी झाला नव्हता.

गावकऱ्यांना ते कळलं होतं. भुमिपुत्रांनाही ते कळलं होतं; पण ते मला सांगत नव्हते. हे सर्व समाजव्यवस्थेचं गुह्यतम गुह्य आणखी उग्र तपस्येने माझे मलाच शोधावे लागणार होते.

‘तुमची सगळ्यांची जमिनीवर राहायला जायची तयारी झाली, म्हणजे मला निरोप द्या.‘ असं म्हणून मी भुमिपुत्रांचा निरोप घेतला. एक धडा शिकून. यापुढे लोकांचे भले करण्याचे प्रयत्न बंद. भिकेच्या आणि मदतीच्या प्रकल्पातून गरिबीचा प्रश्न सुटत नाही. वर्षानुवर्षे गावागावातील गरिबी संपण्याबद्दल जो मार्ग मनात शंकासुद्धा न आणता मी मानला होता, त्याबद्दलच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पुन्हा एकदा शून्यावर आलो होतो. स्वित्झर्लंडला परत जाण्याचा मोह मी कसा टाळला कुणास ठाऊक?

**– शरद जोशी**

(युनिकोडीकरण – शंकरराव ढिकले, नाशिक)
(सा. ग्यानबा, १२ सप्टेंबर १९८८)

दहावे अखिल भारतीय


# मराठी शेतकरी साहित्य संमेलन

दिनांक : २१ व २२ जानेवारी २०२३

स्थळ : राष्ट्रसंत सभागृह, अ.भा. श्रीगुरुदेव सेवा मंडळ

गुरुकुंज आश्रम, ता. तिवसा जि. अमरावती

## अध्यक्षीय भाषण



डॉ. किशोर सानप

- सृष्टीच्या पालनहाऱ्याला जगावेसे का वाटत नाही?
- मरावेसे का वाटते?
- आत्महत्या करावीशीच का वाटते?

'' सृष्टीच्या पालनहाऱ्याला, तारणहाऱ्याला जगावेसे का वाटत नाही? मरावेसे का वाटते? आत्महत्या करावीशीच का वाटते?''

– डॉ. किशोर सानप

# अध्यक्षीय भाषण

पवित्र पावन अशा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मोझरी या गावी दोन दिवसीय १० वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित केल्याबद्दल सर्व महानुभवांचे मी स्वागत करतो आणि आनंद व्यक्त करतो. या संमेलनाच्या तुकडोजी महाराज विचारपिठावर उपस्थित संमेलनाचे स्वागताध्यक्ष, गुरुकुंज आश्रमाचे सरचिटणीस तथा अ. भा. गुरुदेव सेवा मंडळाचे प्रमुख जनार्दनपंत बोथे, संमेलनाचे उद्घाटक म्हणून लाभलेले नाशिक येथील सह्याद्री फॉर्म्सचे संस्थापक मा. विलास शिंदे, प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले खा. अनिल बोंडे, विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष व माझे मित्र डॉ. रवींद्र शोभणे तसेच वऱ्हाडी कादंबरीकार तथा महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ सदस्य मा. पुष्पराज गावंडे, सन्माननीय अतिथी मा. सरोजताई काशीकर, मा. मंजिरी भोयर, मा. दिलीप भोयर, डॉ. मनीषा रिठे व मित्रवर्य गंगाधर मुटे आणि लेखक कवी विजय विल्हेकर, माझी सेवाभावी पत्नी सौ. कविता किशोर सानप, माझे सर्व आप्तस्वकीय आणि तमाम शेतकरी साहित्य संमेलनाला उपस्थित असलेले सर्व लेखक, कवी, गझलकार, वक्ते पदाधिकारी आणि कार्यकर्ता मंडळी.

प्रिय बंधू आणि भगिनीनो शेतकरी साहित्याला प्राचीन काळापासूनची परंपरा लाभलेली आहे.

गाथा सप्तशती

मित्र हो, शेतकरी साहित्याची परंपरा 'गाहा सत्तसई' या संस्कृतमधील व 'गाथा सप्तशती' या प्राकृत भाषेतील ग्रंथाची रचना हालाने शालिवाहन काळात केली. 'गाथा सप्तशती'मध्ये सामान्य लोकजीवन, शेतकऱ्यांचे जीवन व शेतकऱ्यांची अवस्था या विषयी शालिवाहन काळात १२ व्या शतकात हालाने ७०० गाथांची रचना केली.

मढे झांकुनिया करिती पेरणी । कुणबियांचे वाणी लवलाहे ।।
तयापरी करी स्वहित आपुले । जयासी फावले नरदेह ।।
ओटीच्या परीस मुठीचे ते वाढे । यापरि कैवाडे स्वहिताचें ।।
नाही काळसत्ता अपुलिया हाती । जाणते हे गुंती उगवती ।।

**समाज, शासन, साहित्य, संघटना अशा सर्वच स्तरांवर गांधीजींचे तीन बंदर सृष्टीच्या तारणहाऱ्याला केवळ वाकुल्या दाखवीत आहेत. मित्रहो, इतकी उदासिनता असेल, आपल्याच जन्मदात्याकडे पाहण्याची तर या नव्या जगाला नक्कीच भवितव्य नाही.**

तुका म्हणे पाहे आपुली सूचना । करितो शाहाणा मृत्युलोकी।।

इ.स. १६०८ ते १६५० पर्यंत संत तुकारामांनी शेतकऱ्यांची दुरावस्था, शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहून त्यांचे हृदय करुणा आणि दयेने पाझरले होते. शासन व्यवस्था कुणाचीही नसते ती फक्त आपली सत्ता आणि खुर्ची सांभाळण्यात व्यस्त असते. आजही शेतकऱ्यांची दुरावस्था आणि आत्महत्या संपलेल्या नाहीत. त्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामव्यवस्था रचण्यासाठी 'ग्रामगीता' रचली. संत तुकोबांचा कळवळा तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' लिहून अनुभवला होता. शेतकऱ्यांनी आपली दुरावस्था नष्ट करावी. यासाठी संत तुकोबा म्हणतात,

सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायांचे ।।
नाही वेठी जेवा सारा । जौहाती नाही हाणीयारा ।।
सरीक नाही रे दुसरा । धनी सारा तुझा तू ।।
जपतप नांगरणी । न लगे आटी दुनवणी ।।
कर्म कुळवणी । न लगे धर्मपाळी दोन्ही ।।
ज्ञानपाभारी ती फणी । न लगे करावी पेरणी ।
वीज न लगे संचिताचे । पीक पिकले ठायींचे ।।
नाही यमाचे चोरटे । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटे ।।
पीक न वजे भरवसा । करी उद्वेग तो पिसा ।।
सराई सर्व काळ । वाया न वजे घटीकापाळ ।।
प्रेम पिकले अपार । नाही साटवावया थार ।।
ऐसिये जोडी जो चुकला । तुका म्हणे विग त्याला ।।
वणाच्या सोकारी । सेत खादले पाखरी ।।
तैसा खाऊ नको दगा । निदसुरा राहुनी जागा ।।
चोरासवे वाट । चालोनी केले तळपट ।
डोळे झांकुनी राती । कुपी पडे दिवसा जोती ।।
पोसी वाजे गाय । तेथे कैची दुध सांय ।
फुटकी सांगडी । तुका म्हणे न पवे थडी ।।
सेत आले सुगी । सांभाळावे चारी कोण ।
पिका आले परी । केले पाहिजे जतन ।।
पेटवूनी आगटी । राहे जागा पालटुनी ।
पडिलिया मान । बळ बुद्धी व्हावी दोनी ।।

तुकोबांनी शेत चारी कोन राखले पाहिजे. तुकोबांनी शेतीत पिकणारे पिक हे विठ्ठलाचे मानून बुद्धी आणि बळाचा वापर केला. ज्याच्या घरात दारिर्द्य आहे त्याच्या घरात दुध दुभते असे व्यवसाय नसतात. असे लोक शेतातल्या पिकांची चोरी करतात या लोकांपासून सावध राहिले पहिजे. शेवटी शेती आणि कुळधर्म हाच शेतकऱ्यांचा प्राण असतो. त्यांचे जीवन असते. विठोबासुद्धा शेतकऱ्यांच्याच सोबत असतो. आजच्या परिस्थितीत शेतकऱ्यालाच कुळाचार पाळावा लागतो. कुणीच त्याच्या मदतीला येत नाही. काळ बदलला तरी परिस्थिती बदलली नाही. संत तुकारामांच्या कालखंडात अभिजन वर्गाने 'महाकवी संत तुकाराम' यांनाही नकार देण्याची परंपरा १९६० पर्यंत कायम ठेवली. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी संत तुकारामांना खेडूत, गावंढळ अशा शेलकी भाषेत संत तुकोबा आणि शेतकरी साहित्याला नकार दिला.

ग्रामीण साहित्य हे आभासी जगाचे साहित्य होय –

mahyco grow

mahyco
प्रत्येक बी अनमोल

## शेतकऱ्यांचे हित हीच प्राथमिकता

सन १९६४ साली महिकोची स्थापना झाली व तेंव्हापासुनच शेती संशोधनावर भर दिलेला असुन आजतागायत ३० विविध पिकाच्या प्रकारात ११५ पेक्षा अधिक संकरीत बियाण्याचे वाण विकसित केले.

गत ५५ पेक्षा जास्त वर्षांपासून, महिकोचा प्रयत्न शेतकऱ्यांसाठी उच्च दर्जेदार बियाणे निर्माण करण्यासोबतच अधिक उत्पादनाची हमी तसेच जैविक आणि अजैविक ताणाचे निराकरण करण्यास शेतकऱ्यांना मदत करणे हे होय. महिकोची विविध प्रकारची उत्पादने तसेच देशाच्या काना कोपऱ्यात पसरलेले विस्तृत जाळे, आमच्या १ कोटीहून अधिक शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविते.

शेतकऱ्यांची प्रगती ही एकच बांधिलकी जोपासण्याऱ्या महिकोचे पायाभूत तत्वज्ञान - शेतकऱ्यांचे हित हीच आमची परंपरा व विचारधारा.



# महिको प्रायव्हेट लिमिटेड

ई-मेल : info@mahyco.com, वेब-साइट : www.mahyco.com

/MahycoGrow /MahycoGrow /Mahycogrow


CDCC BANK
चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., चंद्रपूर
एकुण शाखा - ८२ व पे ऑफिस - ११
दीपावली
निमित्य
सर्व नागरिकांना व शेतकरी बांधवांना
मंगलमय शुभेच्छा !
आपली बँक ... चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँक...
शेतकऱ्यांची बँक...शेतमजुरांची बँक... महिलांची बँक...
युवकांची बँक... जिव्हाळ्याची बँक... आपणा सर्वांची बँक...
श्री. संतोषसिंह रावत
अध्यक्ष
श्री. यशवंत दिघोरे
उपाध्यक्ष
श्री. शेखर धोटे संचालक
डॉ. विजय देवतळे संचालक
श्री. संदिप गड्डमवार संचालक
श्री. रविभाऊ शिंदे संचालक
श्री. दामोधर मिसार संचालक
श्री. प्रकाश बन्सोड संचालक
श्री. दामोधर रूयारकर संचालक
श्री. संजय तोटावार संचालक
श्री. पांडूरंग जाधव संचालक
श्री. उल्हास करपे संचालक
श्री. विजय बावणे संचालक
श्री. गजानन पाथोडे संचालक
डॉ. अनिल वाढई संचालक
श्री. चंद्रकांत गोहोकार संचालक
श्री. राजेश रघाताटे संचालक
श्री. ललित मोटघरे संचालक
श्री. मनोहर पाऊणकर संचालक
सौ. नंदाताई अल्मुलवार संचालिका
सौ. सुचित्रा ठाकरे संचालिका
सौ. प्रभाताई वासाडे संचालिका
श्री. राजेश्वर कल्याणकर मुख्य कार्यकारी अधिकारी
बँकेच्या विविध योजना
किसान क्रेडिट कार्डवर पीक कर्ज वाटप.
सोने तारण कर्ज योजना (शेतकऱ्यांसाठी कमी व्याजदर).
स्वयंसहाय्यता बचतगट योजना.
वाहन खरेदी दुचाकी, जीप, कार कर्ज सुविधा.
उच्च शिक्षणासाठी कर्जाची सोय.
पगारदार, शिक्षकांसाठी विविध खास कर्ज योजना.
व्यापार/व्यवसायाकरीता कॅश क्रेडिट कर्ज
ईतर बँका मार्फत पगार होणाऱ्या शासकिय/निमशासकिय कर्मचारी,
सिनिअर कॉलेजचे प्राध्यापकांसाठी गृह कर्ज व वैयक्तीक कर्जाची सुविधा.
महिलांसाठी शासकीय, योजने अंतर्गत बचत गटामार्फत कर्ज मंजुर करण्याचे धोरण.
शेतकरी व उद्योग व्यवसायासाठी प्रॉपर्टी मार्गेज कर्जाची सुविधा.
शेतकऱ्यांकरीता दुचाकी वाहन खरेदी कर्ज
घर बांधणी/फ्लॅट/प्लॉट खरेदी / तयार घर खरेदी / घर दुरुस्ती करीता कर्ज.
छोटया व्यावसायीका करीता स्व. राजीव गांधी स्वावलंबन कर्ज योजना.
शेतकरी कल्याण योजने अंतर्गत शेतकऱ्याचे आजारात आर्थिक मदत.
एस.एच.जी. बचत गटांना ३% व्याज सवलत योजना लागू.
सरकार निश्चित पात्राकरी वाहन कर्ज योजना फक्त ८.५०% व्याज दराने.
(मर्यादित कालावधी दि. ३१/०३/२०२३ पर्यंत)
५००० कोटी खेळते भांडवलाकडे वाटचाल
३१ मार्च २०२२ अखेर आर्थिक स्थिती
ठेवी ३४९२४०.२२ लाख
कर्जबाकी १४९२६०.५० लाख
नफा १६५६.३९ लाख
नेट एनपीए ०%
शेतीपुरक योजना
दुग्ध/मत्स्य/कुकुटपालन
जनावरांसाठी पशुखाद्यासाठी कर्ज सुविधा
जलसिंचन योजना
नविन विहीर/पंप/पाईप लाईन/
तुषार संच/ठिबक संच/बोअरवेल/
ट्युब वेल/शासकीय कर्ज सुविधा
कृषि यांत्रिकी सुविधा
ट्रॅक्टर/पॉवर टिलर/थ्रेशर
शेती अवजारांसाठी कर्ज सुविधा
ठेवीचे आकर्षक व्याजदर (दि. ०१/१०/२०२२ पासून)
अ.क्र. ठेवीचा प्रकार व कालावधी — व्याजदर (द.सा.द.शे.)
१) सेव्हिंग ठेवी (बचत ठेवी) ३.००
२) मुदती ठेव (संकलीत आवर्त ठेवीसह)
१. १५ दिवस ते ४५ दिवस ३.५०
२. ४६ दिवस ते ९० दिवस ४.००
३. ९१ दिवस ते १८० दिवस ४.७५
४. १८१ दिवस ते १ वर्षाचे आतील कालावधी ५.००
५. १ वर्ष ते २ वर्षाचे आतील कालावधी ५.५०
६. २ वर्ष ते ५ वर्षाचे आतील कालावधी ५.७५
७. ५ वर्षाचे व परंतु जास्तीत जास्त १० वर्षापर्यंत ५.९१
अ) सभासद बचत ठेव ५.९१
ब) सहकारी संस्था बचत फंड गुंतवणूक ठेव ५.९१
क) सहकारी संस्था बॅड डेब्ट फंड गुंतवणूक ठेव ५.९१
ड) सहकारी संस्था शेअर्स रिडम्शन फंड गुंतवणूक ठेव ५.९१
इ) कर्मचारी सिक्युरिटी डिपॉझिट ५.९१
फ) बँक क्रेडिट स्टॅबिलायझेशन फंड ३.००
कर्जदार शेतकऱ्यांना वैयक्तिक अपघात विमा योजना लागू करण्याचा मानस
पगारदार कर्मचाऱ्यांना ३० लाख वैयक्तिक अपघात विम्यासह ईतर सोयी सुविधा
छोटया व्यवसायिकांना त्वरीत ५०,०००/- कर्ज उपलब्ध
महिला बचत गटांना तसेच छोटया व्यवसायिकांना स्वावलंबी बनविण्याचे ध्येय
थकबाकी कर्जदारांना व्याज सवलतीची सामोपचार कर्जफेड योजना
सुरक्षित ठेवी
त्वरीत कर्ज
ठेवीवर व्याज ज्यादा कर्जावर कमी व्याजदराचा फायदा
NEFT / RTGS / IMPS INWARD & ECG सुविधा उपलब्ध
CTS, CLG, PEMS मार्फत लाभ मिळण्याची सुविधा
ATM, SMS Alert व लॉकर सेवा उपलब्ध
मोबाईल ATM व्हॅन सुविधा
सोने तारण कर्ज बँकेच्या २० शाखांमध्ये सोने शुध्दता तपासणी मशीनची व्यवस्था
संपूर्ण शाखा कोर बँकींग प्रणालीवर कार्यरत

शेती आणि शेतकरी मिळून 'ग्राम' तयार होते. शेतकरी व शेती असल्याशिवाय ग्रामीण साहित्य ही संकल्पना आभासी जगाचे साहित्य होय. आभासी ग्रामीण साहित्याला पहिल्यांदा शेतकरी साहित्य चळवळीचे जनक लेखक, कवी गंगाधर मुटे यांनी नकार दिला. 'साठोत्तरी काळात शेती आणि शेतकरी साहित्याचे जनक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हेच मानावे लागतात. 'ग्रामगीता' हा शेतकरी साहित्याचा मुलभूत पाया आणि तत्वज्ञान आहे. या दृष्टीने 'ग्रामगीता' हे शेती आणि शेतकरी साहित्याचे महाकाव्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी लिहिले.

शेतकरी साहित्याची चळवळ –

ग्रामीण साहित्याची चळवळ आणि मराठी साहित्य साठोत्तरी काळातही हास्यास्पद होते. या आभासमय साहित्याला शह पहिल्यांदा हालाच्या 'गाथा सप्तशती'ने दिला. तुकोबांच्यानंतर मात्र ग्रामीण साहित्य चळवळ बनू शकले नाही. कोणत्याही प्रकारचे शेतकऱ्यांचे जीवघेणे प्रश्नही सोडवू शकले नाही. शेतकऱ्यांचे मसीहा शरद जोशी यांनी सबंध भारतभर शेतकऱ्यांची चळवळ उभारली. विजय जावंधिया, शेषराव मोहिते, अमर हबीब, गंगाधर मुटे, विजय विल्हेकर व तमाम शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते या लोकांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शेतकरी चळवळ उभारली. शरद जोशींनी महाराष्ट्रात 'अंगारमळा' पेटविला आणि शेतकऱ्यांच्या तेजस्वीपणाचा व शक्तीचा परिचय देशात घडवून आणला. या चळवळीतून ज्या ज्या शेतकऱ्यांनी साहित्य निर्मिती केली त्यांचे साहित्य शेतकऱ्यांचे गंभीर प्रश्न मांडू लागले. ''शेतकरीच आपला आणि इतर शेतकरी बांधवाचा विकास करू शकतो हे लक्षात आले''.

देव बाजारचा भाजीपाला नाही रे...''

> **'आत्महत्या शेतकऱ्यांची नाही, तर शेतीची होत आहे.'' एकही शेतकरी आपल्या मुलाला शेतकरी करण्यास तयार नाही. असे असेल, तर या कृषिप्रधान देशाचे भवितव्य काय?'**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजन–कीर्तन व ग्रामगीतेद्वारा अंधश्रद्धा निर्मुलनाचा प्रसार आणि प्रचार पूर्ण देशभर केला. हेच कार्य आधुनिक संत गाडगेबाबांनी सुद्धा केले होते.

मनी नाही भाव म्हणे । देवा मला पाव
देव अशाने भेटायचा नाही रे । देव बाजारचा भाजीपाला नाही रे।।
दगडांचा देव त्याला वडराचं भेव । लाकडाचा देव त्याला अग्नीचं भेव
सोन्या चांदीचा देव त्याला चोरांचं भेव । देव बाजारचा
भाजीपाला नाही रे ।।

देव बाजारचा भाजीपाला नाही तर देवाचं देवत्व ''सेवाभावनेत'' आहे. म्हणून पुढे राष्ट्रसंत म्हणतात,

कशाला काशी जातो रे । बाबा कशाला पंढरी जातो
संत सांगते ते ऐकत नाही । इंद्रियाचे ऐकतो
कीर्तनी मान डोलवीतो परी कोंबडी बकरी खातो ।
वडील जणांचे श्राद्ध कराया गंगेमाजी पिंड देतो
खोटा व्यापार जरा न सोडी । देव कसा पावतो
गरिब गुरांची दया न चित्ती । दानासी हाथ आवरतो
पापे धुवायला गंगेत जाऊन नाहतो । असत्याचरण करतो ।।
अरे रिकामा कशाला फिरतं । तूज गावच नाही का तीर्थ
गावी राहतील उपवासी । अन्नसत्र लावीतोसी काशी
हे दान नव्हे का व्यर्थ ।
तुझ्या गावाची मोडली शाळों धर्मशाळा तू शहरी का जोडली ।।
जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो अपुले
तोची साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

संत तुकोबा म्हणतात, हेच सेवाभावनेचे व्रत सर्व संतानी सांगितले. तुकडोजी महाराजांनीसुद्धा गोरगरिबांच्या सेवेतच आणि गावातल्या उपवासी लोकातच सेवेचे व्रत मानले. तसेच ''ग्रामव्यवस्थेला आणि ग्रामगीतेला'' जीवनात सर्वात जास्त महत्व दिले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरित्रातील महत्वाच्या घटना –

राष्ट्रसंतांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली येथे २३ एप्रिल १९०९ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण अमरावतीमधील चांदूरबाजार येथे झाले. त्यांचे जन्मनाव माणिक होते. आयुष्यही माणिकासारखे जगले. नंतर चंद्रपूरच्या जंगलात वास्तव्य केले. सालबर्डीच्या महाअन्नदान यज्ञाला प्रारंभ केला. सेवाग्राम आश्रमात बापूंच्या सान्निध्यात त्यांनी १९३६ मध्ये वास्तव्य केले. गांधीजींच्या 'चले जाव' या चळवळीत त्यांनी भजन कीर्तनाने जनजागृती केली. त्या दरम्यान त्यांना अटकही झाली. काही महिन्यांनी जेलमधून सुटकाही झाली. महाराजांनी विश्वशांती नाम सप्ताह सुरु केला. सामुदायिक प्रार्थनेचा शुभारंभ केला. अ.भा. गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. हरिजन मंदिर प्रवेश, नशाबंदी व आखाडा संघटन, गोवध बंदी कार्यक्रम अशा अनेक लोक उन्नयनाच्या कार्यक्रमात महाराज रमून गेले. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या उपस्थितीत राष्ट्रपती भवनात खंजेरी भजन सादर केले. भजन संमेलनाने जनजागृती घडवून आणली.

महाराजांचे कार्य पाहता सन १९४९ मध्ये भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांचा 'राष्ट्रसंत' म्हणून सन्मान केला. लाल बहादूर शास्त्री यांच्या उपस्थितीत शंभर गावात ग्रामसुधार कार्यक्रम घडवून आणला. भूदान दौरा, गुरुकुंज आश्रमात विदर्भ साहित्य संमेलन, अ.भा. राष्ट्र भाषा संमेलन, भारत सेवक संमेलन बिहार, विश्वधर्म व विश्वशांती परिषदेसाठी मलाया, जपान व ब्रम्हदेशाचा दौरा १९५५ मध्ये केला. तुमसर येथील विदर्भ साहित्य संमेलनात १९५६ मध्ये ग्रामगीतेचे प्रकाशन करण्यात आले. ऋषिकेश येथील भारत साधू समाजाच्या पहिल्या अधिवेशनाचे अविरोध अध्यक्ष होते. १९६२ व १९६५ मध्ये युद्धसीमेवर जाऊन सैनिकांचे तेज व राष्ट्रप्रेम जागृत केले.

तुकडोजी महाराजांनी नेहमीच 'जय जवान जय किसान' यात कधीही फरक केला नाही. तुकडोजींच्या मते,

झाडझडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेंगी सेना ।
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेगी किनारे ।।
तुकड्यादास कहे मत भुलो, वे दिन आये हमारे ।
सब दुनियाका पालनकर्ता, उसके ही हम प्यारे ।।

१९६५ मध्ये अ.भा. श्री. गुरुदेव सेवामंडळ संचालक मंडळाला स्वाधीन करून पदमुक्ती घेतली. राष्ट्र सुरक्षा संमेलन नागपूर, आयुर्वेद संमेलन गुरुकुंज आश्रम, मोझरी अश्या अनेक पातळ्यांवर आपले आयुष्य राष्ट्रासाठी झिजविले. संतानाही देहाच्या मर्यादा असतात. संताना मृत्यू नसतो. मृत्यू असतो तो सर्वसामान्य लोकांना. संतांचे तर महानिर्वाण होत असते. ११ ऑगस्ट १९६८ मध्ये राष्ट्रसंत उर्फ माणिक उर्फ तुकडोजी महाराज यांचे 'महानिर्वाण' झाले.

सद्गुरू आडकुजीने मुझपर । कृपासिंचन किया ।
तुम भी भजन लिखते रहो । यह आशिष मुझको दिया ।।
तब से भजन लेखन बढा । इस हाथसे संभाले नही ।
गंगा प्रवाहित वाक्यरचना । सहजही होती गयी ।।

जो निष्काम कर्म करी । मानामान दूर धरी
भक्ती कळवळ्याने करी । तोची श्रेष्ठ आवडतो ।।
अब दुनिया की दौलत मै हू । अब हिम्मत की हिम्मत मै हू ।।
नवनिर्माण यज्ञ जो करी । विश्व तयाच्या येतसे करी ।।
माणूस द्या मज माणूस द्या । ही भिक मागता प्रभू दिसला
लोक दर्शनासाठी जातो । देव दिसावा म्हणूनिया
देव म्हणे मज माणूस न दिसे । अजब तमाशा हा असला ।।
पुरी करो कामना बापू की । तब ही कीरत बढे आप की
आझादी पायी हमने सद्गुण सतचारित्र्य बनाने । सिढी न लो राह पाप की ।।
मानवता ही पंथ मेरा । इंसानियात ही पक्ष मेरा
सबकी भलाई धर्म मेरा । दुविधा को हटाना कर्म मेरा

**ग्रामगीतेची रचना –**

नवभारत निर्मितीत ग्राम सुधारणेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्राम सुधारला तरच भारतात नवनिर्मिती शक्य आहे. हे महाराजांनी ओळखले होते.''ग्रामगीता म्हणजे सामाजिकज्ज धार्मिक व वैज्ञानिक दृष्टीकोनातून केलेले महाउद्बोधन होय.''

जाणावे ग्राम हेची मंदिर । ग्रामातील जन सर्वेश्वर
सेवा हेची पूजा समग्र । हाची विचार निवेदावा
यासाठी करावा ग्रंथ प्रारंभ । आचरण ज्ञान मुळारंभ
सक्रीयतेचे मूळस्तंभ उभाराया
ग्रामग्रामासी जागवा । भेदभाव समूळ मिटवा
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ।।

तुकडोजी महाराजांनी त्यांची 'ग्रामगीता' हीच शेतकऱ्यांना अर्पण केली आहे. 'ग्रामगीता ही शेतकऱ्यांचा मुक्तीचा जाहीरनामा आहे'. राष्ट्रसंत ग्रामगीतेच्या अर्पण पत्रिकेत म्हणतात.

सर्व ग्रामासी सुखी करावे । अन्न-वस्त्र- पात्रादी द्यावे
परि स्वत: दुख:चि भोगावे । भूषण तुझे ग्रामनाथा ।।
कष्ट करोनी महाल बांधसी । परी झोपडीही नाही नेटकीशी
स्वातंत्र्याकरिता उडी घेशी । मजा भोगती इतरचि ।।
ऐशा भोळ्या शंकरासी । सौख्य लाभावे सर्व देशी ।
मानवाची पूर्णता तुजसी । प्राप्त व्हावी, मना वाटे ।।
म्हणोनि केली 'ग्रामगीता' । जागृत व्हाया ग्राम-देवता ।
सबंध यावा सागर-सरिता । ऐसा तुझा सर्वांशी ।।
तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो । सकळांचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो । विश्वामाजी या योगे ।।
म्हणोनि तुजची करितो अर्पण । तू विश्वाचे अधिष्ठान
तुझेची व्हावे आधी उत्थान । विश्वामाजी म्हणोनिया ।।

**शेतकऱ्यांचा अघोषित संप आणि शासनाचा नाकर्तेपणा –**

मित्रांनो राज्यातल्या मराठी भाषिक आणि देशातील बहुभाषिक शेतकऱ्यांनी वारंवार तहान भूक हरवून यशस्वीपणे ऐतिहासिक लढे दिले परंतु आजचे सरकार म्हणजे संत तुकोबांच्या भाषेत,

आपुलिया पोटासाठी करी लोकांचिया गोष्टी
अंगी ज्ञानपणाची मस्ती बोलणे तितुके वाया गेले
तुका म्हणे शिंदळीच्या व्यर्थ श्रमविली वाचा ।।

तुकोबा अश्या शासकांना दंडविधानही लोकांच्या हाथी सोपवितात.
भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथा ।।

संत तुकोबा म्हणतात आम्ही आमचे उपरणेही भल्या माणसासाठी सोडून देऊ. पण आमच्याशी कुणी नाठाळपणाने वागत असेल तर त्याचा माथा फोडण्यास काठी वापरण्यासही आम्ही मागे पुढे पहणार नाही. खरेतर अस्सल शेतकऱ्यांनी सत्तेचा माज उतरविला. पण शेवटी सृष्टीच्या पालनहाऱ्याला, तारणहाऱ्याला जगावेसे का वाटत नाही? मरावेसे का वाटते? आत्महत्या करावीशीच का वाटते?

सबके लिये खुला है । मंदिर यह हमारा
मतभेद को भुलाये । मंदिर यह हमारा ।।
आओ कोई भी पंथी । आओ कोई भी धर्मी
देशी विदेशियोको । मंदिर यह हमारा ।।

आयन रँड यांच्या 'ॲटलास श्रग्ड' या कादंबरी नुसार शेतकऱ्यांचा अघोषित संप आणि जगबुडी – शरद जोशी यांचे क्रांतिपर्व

शरद जोशी यांनी महाराष्ट्रातील कृषिजीवनात शेतकरी संघटनेचे क्रांतिपर्व निर्माण केले. पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या आंदोलनाची क्रांतिकारी ऊर्जा महाराष्ट्राच्या भूमीवर निर्मून आणि पुढे गल्ली ते दिल्लीपर्यंत अनेक वर्षे जागती ठेवली. शेतीचे कायदे आणि शेतीची सबंध व्यवस्थाच सरकार नियंत्रित करीत असल्यामुळे, भारतीय शेतीवरील सर्वच जाचक कायदे-बंधने हटवून शेती पूर्णपणे मुक्त केल्यानेच ती जागतिकीकरणाच्या रेट्यात टिकू शकेल; असा आग्रहही शरद जोशींनी केला होता. शेतकरी

संघटना आणि महेन्द्र टिकैत, शरद जोशींच्या क्रांतिकारक विचारांना तिलांजली देण्याचे राजकीय डावपेच यशस्वी झाल्यामुळे, भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनातील एकमेव आशेचीही ज्योत मालवली गेली. शेतकऱ्यांची व्होट-बँक देशातील मोठी व्होट-बँक असल्यामुळे, पॅकेजच्या भुलथापांनी भारतीय शेती कायमच डायलीसीसवर राहिली. कृषी-कृषकांचे अर्थशास्त्र अधिकाधिक बिघडतच गेले. भूसंपादन कायदे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष राबवून, सेझ-कल्चर सरकारनेच अस्तित्वात आणले. सक्तीने शेतजमिनी बळकावून शेतकऱ्यांना 'शेती-निकाला' केले. 'दुख:मुक्तीची मृत्यू-सेज बहाल केली' शेतीच्या बुडित व्यवसायात नवीन पिढीने येऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी आपली मुले शहरात शिकवून-शहरी नोकरीपेशात रुजवून-प्रसंगी शेतजमिनी विकून, नव्या पिढीचे शेती कसण्याचे सर्वच रस्ते बंद करून टाकले. ही सर्व भूमीची दुर्दैवी, अमानुष मशागत गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून आपल्या देशात सुरू असल्यामुळे, भारतीय जुन्या पिढीतील

**शेतकरी निर्जन बेटावर निघून गेले ! तर सत्ता तरी कुणावर गाजवायची? रिकाम्या आणि ऐतखाऊ पांढरपेशांच्या बुर्ज्वा जमातीवर? की लालफितशाहीतल्या मग्रूर अधिकाऱ्यांवर?.**

मायबाप शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करू लागले. नव्या पिढीने शेतीविरूद्ध अघोषित संप पुकारून, पांढरपेशा समाजात आपलं जगणं सुकर करून घेतलं.

वर्तमानपत्रे ही केवळ चहा पिताना वाचण्यासाठी आणि नंतर महिनाभराने दहा रूपये किलोने विकून पैसा वसूल करण्याचीच मानसिकता असलेल्या समाज व्यवस्थेत; डोके फूट प्रबोधनाने कोणत्याही क्रांतिच्या शक्यताच कधी निर्माण होताना दिसणार नाहीत; अशीच गोळीबंद व्यवस्था बुर्ज्वा सुखवस्तू व्यवस्थाप्रिय लोकांनी-भांडवलदारांनी-सत्तापटूंनी रुजवत आणलीच आहे. जगभर महाविनाशाचे हादरे बसत असतानाही आपण कसे शांत-स्वस्थच आहोत... मनातल्या सुखवस्तू तलावात सारंकसं सामसूमच आहे... आपलं कशाशीच काही घेणंदेणं राह्यलं नाहीय. आपण आणि आपला परिवार भला. पण, हे त्रिकालाबाधित सत्य नाहीच; ही मानसिकता क्षणकालातच नेस्तनाबूत होण्याची दुःचिन्हे ठळकपणे जगभर दिसू लागली आहेत. जगबुडीत जगच बुडते. तेव्हा बुडत्याचे पाय डोहाकडेच असतात. कुणीही वाचवायला मागंच उरणार नाही. जग अंधारात बुडू लागल्याचे भाकित अमेरिकन-रशियन लेखिका आयन रॅंड यांनी सनब १९५७ मध्ये लिहिलेल्या 'अॅटलास श्रग्गड' या फॅन्टसी-नॉव्हेलमध्ये मांडलेच आहे.

कृषिजगताच्या नव्या पिढीने शेती न करता शेती विकून, शहरात नोकरी करण्याचा व्यवसाय स्वीकारला. शहरी जीवनात सर्वच सोयीसुविधांचा लाभ घेण्यासाठी, मोठ्या प्रमाणावर गावगाड्यातून पांढरीला विकून, शहरी स्थलांतरित झाल्याचेही वास्तव गेल्या तीनचार तरी दशकांपासून, शेतीच्या घाट्याचे पोवाडे गात गातच नागरी समाजात स्थिरावल्याचेही ठळकपणे समोर आलेच आहे. एकप्रकारे आपल्या मायबापांच्या आत्महत्याग्रस्त ग्रामजीवनाचे वास्तव लक्षात घेऊन, शेतीच न करण्याचा विडा नव्या पिढीने उचलला आहे. नव्या पिढीने काही चूक केल्याचेही म्हणण्याची आज कुणाला उजागरी नाही. प्रकाशयुगातून अंधारयुगात उजळ माथ्याने प्रवेश केल्याचे धोके सबंध देशालाच महाविनाशाच्या गर्तेत खेचणारे आहेत.

शेतकऱ्यांची व्होटबँक म्हणजे सत्ताधाऱ्यांचा खेळ -

कवी विठ्ठल वाघ म्हणतात,

आम्ही मेंढरं मेंढरं यावं त्यानं हाकलावं,<br>
पाचा वर्षाच्या बोलीनं होते आमचा लीलाव !

कवी विठ्ठल वाघांच्या मेंढरं कवितेचेच जर वास्तव समाजात रुजले असेल; तर शेतकऱ्यांच्या पुढच्या नव्या पिढीने शेती कसण्याविरूद्ध अघोषित संप पुकारला असेल; तर त्याला जबाबदार कोण? शेतीच्या प्रश्नावर गेली दहा वर्षे नुसती चर्चाच होत आहे. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांचा विचार करून मांडलेले देशी धोरणही धूळ खात पडून राहिले आहे. शेतकऱ्याला ना बाजाराचे स्वातंत्र्य आहे, ना सरकारचे संरक्षण. आता मात्र गंभीर धोका लक्षात घेऊन सरकारने तरी जागे होणे गरजेचे आहे. हा गंभीर धोक्याचा इशाराही दिला आहे. याचाही विचार किमान आपल्या देशातील समाज, शासन, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, पर्यावरणवादी, निसर्गवादी, सांस्कृतिक

**जगातील तमाम बुद्धिवंत, शास्त्रज्ञ, उद्योजक, कलावंत, साहित्यिक संपावर गेले तर या जगाचे काय होईल? काहीही होणार नाही. परंतु शेतकरी जर संपावर गेले तर मात्र जगबुडी जरूर होईल**

क्षेत्रातील उमेदवारांनी-सेवाभावी संस्थांनी अग्रक्रमाने करण्याचीच ही खरी वेळ आहे.

**शेतकरी निर्जन बेटावर गेले तर जगबुडी जरूर होईल -**

शेतकऱ्यांची चिंता वाहणाऱ्या समाजाने, शासनाने, कृषितज्ज्ञांनी, विद्यापीठ आणि शास्त्रज्ञांनी, संघटनांनी, प्रधानमंत्री-अर्थमंत्री-कृषिमंत्री आदींनी वेळीच धोका ओळखून, गंभीरपणे परिस्थितीचा अभ्यास करण्याची निकड असते. येऊ पाहणाऱ्या महाविनाशाच्या लाटांना थोपविण्यासाठी उपाय योजना करण्याचीही तत्काल गरज असते. अन्यथा, जमिनीच्या पोटातून केव्हाही बाहेर पडणाऱ्या ज्वालामुखीच्या तोंडावर जगबुडीच्या युगांताची वाट पाहातच सबंध जग उभे असल्याची आयन रॅंड या लेखिकेची फॅन्टसी; विज्ञानाचाच नवा आविष्कार वास्तवात येण्याचे सत्य नाकारता येणार नाही... जो न देखे रवी, वो देखे कवी... हेही कदाचित या जगाचे भविष्यच असू शकेल!

जगातील तमाम बुद्धिवंत, शास्त्रज्ञ, उद्योजक, कलावंत,

साहित्यिक संपावर गेले तर या जगाचे काय होईल? काहीही होणार नाही. परंतु शेतकरी जर संपावर गेले तर मात्र जगबुडी जरूर होईल! लोकप्रिय तत्त्ववेत्त्या आयन रँड यांनी 'ॲटलास श्रग्गड' या कादंबरीतून जगाला हीच धोक्याची सूचना दिली आहे. जगामध्ये संपत्ती निर्माण करणारी, समृद्धी आणणारी, जगाला पोसणारी ही माणसे; ती एका क्षणी ठरवतात की, आता खूप झाले. यापुढे जगाला आपल्या खांद्यावरून नाही वाहून न्यायचे. एकेक करून ते सारे आपले काम बंद करतात. जगाला, येथील एकमेकांवर जगणाऱ्या बांडगुळाप्रमाणे जगणाऱ्या माणसांना लाथाडून दूर निर्जन बेटावर निघून जातात...आणि सारे जग अंधारात बुडते. या सत्याच्या जवळच आपण पोहोचलो आहोत.

**साठोत्तरी साहित्यातील शेतकरी साहित्याचे परिवर्तन युग –**

समाज, शासन आणि सांस्कृतिक क्षेत्रांत कृषिजगताकडे कसे पाहिले जाते? याचा आत्मशोध घेतला की मुख्यत्वे ग्रामीण साहित्यातून गावगाड्याचे आणि शेतकऱ्यांचे जीवन–वास्तव मांडण्याचा प्रयत्न खूप आधीपासूनच झालाय. शेतकऱ्यांची भाषा, शेती, हालअपेष्टा, जीवन जगण्याची निसर्गशैली आर्दीचे चित्रण आभासी परंतु मनोरंजनाच्या पातळीवर सुरूवातीला झाले, हेही खरे आहे. शेतकऱ्यांच्या जीवनशैलीला–जगण्याच्या बोलीभाषेला नागरी लोक हसून भाषेची खिल्ली उडवतात, हेही खरे आहे. विनोदी साहित्य म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले गेले, हेही खरे आहे. साठोत्तरी कालखंडात मात्र ग्रामीण साहित्यातून गावगाड्याच्या अवकळाग्रस्त जीवनजाणिवांची वास्तवाभिमुख अभिव्यक्ती झाली, हेही खरे आहे. कवी विठ्ठल वाघांची शेतकरी दिंडी, साहेबराव पाटील यांची शेतकऱ्यांच्या आत्महत्येची परखड मीमांसा करणारी कविता; हे साहित्यातील परिवर्तनाचे तरंग लक्षात घेतले की; सबंध महाराष्ट्रातून साठोत्तरी काळात लिहित्या पिढीने, ग्रामीण साहित्याची परिमाणे बदलत्या वास्तवानुसार समाजमनात पेरण्याची मौलिक कामगिरी केल्याचेही सत्य नाकारता येणार नाही. साठोत्तरी कालखंडात उद्धव शेळके, रा. रं. बोराडे, आनंद यादव, कवी ना. धों. महानोर, कवी विठ्ठल वाघ, सदानंद देशमुख, रविंद्र शोभणे, शेषराव मोहिते, भास्कर चंदनशीव, बाबाराव मुसळे, भारत काळे, कैलास दौंड अशा काही मोजक्या खुद्द शेती कसणाऱ्या शेतकरी साहित्यिकांनी मात्र शेतकऱ्यांच्या जीवनाची वाताहत, आत्महत्या, दुष्काळ, शेतीचे बुडीत अर्थशास्त्र, जातवास्तव अशा सर्वहारा अंगाने शेतकऱ्यांचे जीवन–वास्तव सृजनशीलपणे मांडल्याचेही दिसते. परंतु साहित्यसृजनाने आंदोलन उभारून काही शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा दूर केल्याचे उदाहरण नाही. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने जी काही क्रांती महाराष्ट्राच्या शेती जीवनात घडवून आणली, तेवढाच केवळ एक अपवाद आहे. बाकी तर,

> सारं कसं सामसूम तरंग नाही तलावात,
> वळं कलंडती असे कुठे गेले झंझावात
> इळीमिळी गुपचिळी जगन्याची रीत झाली,
> निंघे अर्थाचं दिवायं शब्दाची तं पत गेली.

हेही सांस्कृतिकवास्तव–समाजवास्तव–शासनवास्तव कवी वाघांनी मांडलेच आहे.

**गांधीजींच्या तीन बंदराची दुरावस्था –**

मुळातच सृष्टीच्या जगद्व्याळात जन्मणाऱ्या प्रत्येकाची नाळ सृष्टीच्या पालनकर्त्या, पोषणकर्त्या, संतवृत्तीने बुडीत धंद्याचा शेती–व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांशीच जुळलेली असते. परंपरागत शेती कसण्याची पद्धत कालबाह्य झाली. परंपरागत शेतीत केवळ कर्जच पिकते. पिकलेले भरमसाठ कर्ज स्वाभिमानी शेतकऱ्याला आत्महत्या करायला प्रवृत्त करते. शेतकऱ्याचाच घास घेते, बळी घेते. शेती आणि नफ्याची सांगड घालणारे तंत्रज्ञान कार्पोरेट ॲग्रीकल्चरने–सेझ कल्चरने ग्लोबल युगात अंमलात आणले आहे. तसे लहान लहान गटशेतीचे प्रकल्प गावोगावी उभारून शेतीची लागवड केवळ नफ्यातच होईल, यासाठी शेती आणि शेतकऱ्यांसाठी कळवळा असलेल्या शासनाने, समाजाने, स्वयंसेवी संघटनांनी निरपेक्ष पुढाकार घेण्याची आज आवश्यकता आहे. कारण, शेतकरी हा सृष्टीतील चराचराला जगवणारा अन्नदाता आहे. तो नसला तर ह्या सृष्टीचाही प्रलय अटळच आहे. 'शेतकरी जगला तर जग जगेल. शेतकरी मेला तर जगही मरेल! शेतकरी आत्महत्या करतो, ही टोकाची निरिच्छाच त्याच्या अंतःकरणात का प्रवेश करते? याचाही शोध घेण्याची गरज आहे.'

मुख्य मुद्दा हा आहे की, संतप्रवृत्तीने जगासाठी जगणाऱ्या सृष्टीच्या पालनहाऱ्याविषयीचा खोलवरचा करुणाभाव–कर्तृत्वभाव–जगदाताभाव एकूणच सृष्टीला जगवणाऱ्या व्यवस्थेला कितपत जाणवला आहे? याचाच खरेतर शोध घेण्याची गरज आहे. असेही लक्षात येते की, जगात शेतकऱ्यांविषयी केवळ कोरडी सहानुभूतीच शेष आहे. गांधीजींच्या तीन बंदराची अवस्था जगभर दिसते आहे. शेतकऱ्यांविषयी काहीही बोलायचं नाही! शेतकऱ्यांच्या बुडीत जगाविषयी काहीही ऐकायचे नाही! मृत्यूपंथाला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांची मढीही पाहायची नाहीत! समाज, शासन, साहित्य, संघटना अशा सर्वच स्तरांवर गांधीजींचे तीन बंदर सृष्टीच्या तारणहाऱ्याला केवळ वाकुल्या दाखवीत आहेत. मित्रहो, इतकी उदासिनता असेल, आपल्याच जन्मदात्याकडे

**समाज, शासन आणि सांस्कृतिक क्षेत्रांत कृषिजगताकडे कसे पाहिले जाते? याचा आत्मशोध घेतला की मुख्यत्वे ग्रामीण साहित्यातून गावगाड्याचे आणि शेतकऱ्यांचे जीवन–वास्तव मांडण्याचा प्रयत्न खूप आधीपासूनच झालाय. शेतकऱ्यांची भाषा, शेती, हालअपेष्टा, जीवन जगण्याची निसर्गशैली आर्दीचे चित्रण आभासी परंतु मनोरंजनाच्या पातळीवर सुरूवातीला झाले, हेही खरे आहे. शेतकऱ्यांच्या जीवनशैलीला–जगण्याच्या बोलीभाषेला नागरी लोक हसून भाषेची खिल्ली उडवतात, हेही खरे आहे. विनोदी साहित्य म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले गेले, हेही खरे आहे.**

पाहण्याची तर या नव्या जगाला नक्कीच भवितव्य नाही.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीने देशाचा विकास मोजला जातो, हीच मूलभूत चूक आजवर आम्ही करीत आलो आहोत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीलाही शेतकऱ्यांचीच मुलं जगभर उपयोगी पडल्याचे वास्तव आहे. मायबाप शेतकऱ्यांची प्रगती झाली तरच त्यांची मुलं ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत प्रगती करायला पुढे येतील. शेतीच्या तंत्रज्ञानाने-मार्केटिंगच्या प्रयोगाने शेतीचा व्यवसाय नफ्यातच कसा आणता येईल? याचा आधी शोध घ्यायला हवा. शेतीचा विकास हाच खरेतर उद्योग-धंदे-विज्ञान-तंत्रज्ञानाचाही विकास मानायला हवा. कोणत्याही देशाच्या विकासाचे मूलभूत स्त्रोत; कृषीक्षेत्र-सृजनशील जमीन-नैसर्गिक संपत्ती हेच असते. कृषिवलांच्या भूमी-कृषिसह कृषिवलांची प्रगती; कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मोजमाप करण्याचेच मुख्य स्त्रोत असले पाहिजे. मापदंड असला पाहिजे. शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीनेच; देशाच्या विकासाचे मोजमाप करण्याचा पायंडा कसा पडेल? याचीच चिंता करण्याचा हा काळ आहे. शेती आणि शेतकऱ्यांकडे पाहण्याची उदासिन दृष्टीच मुळातून बदलायला हवी.

जेष्ठ गांधीवादी कार्यकर्ते, आयआयटी दिल्ली आणि चेन्नईत प्राध्यापक राहिलेले, तामिळनाडू आणि मध्य प्रदेशातील चित्रकूट विद्यापीठाचे कुलगुरू राहिलेले सेवाभावी कार्यकर्ते डॉ. करुणाकरन वर्तमानात गांधीग्राम-वर्धा येथे स्थायिक झाल्यावर त्यांनी 'स्मार्ट किसान कृतिकार्यक्रम' आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी राबवला. डॉ. करुणाकरन या अभ्यासू माणसाच्या मते, 'आत्महत्या शेतकऱ्यांची नाही, तर शेतीची होत आहे.' एकही शेतकरी आपल्या मुलाला शेतकरी करण्यास तयार नाही. असे असेल, तर या कृषिप्रधान देशाचे भवितव्य काय? शेती फायदेशीर आणि सन्मानजनक होत नाही, तोपर्यंत ती वाचणे कठीण आहे. शेतीला वाचवले तरच शेतकरी वाचेल ! शेती सन्मानजनक केली तरच शेतकऱ्यांची मुलंही शेती करतील. वर्धेजवळील दत्तपूर गावी महारोगी सेवा समितीच्या पडून असलेल्या १८० एकर शेतजमिनीवर आत्महत्या करणाऱ्या व इतरही दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या-शेतमजूरांच्या मुलांना प्रशिक्षित करून, 'ॲग्रीकल्चर इंडस्ट्री' प्रकल्प उभारून, शेतकऱ्यांच्या मुलांना स्मार्ट किसान बनवून; शेती करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा विधायक आणि फायदेशीर शेती करण्याचा साक्षात उपक्रम डॉ. करुणाकरन सेवानिवृत्तीनंतरच्या काळात सेवाभावीपणे राबवीत आहेत. डॉ. करुणाकरन आणि स्वामीनाथन यांच्या शेतीला जगवणाऱ्या पर्यायांची देशपातळीवर अंमलबजावणी करण्याचाही शासकीय कार्यक्रम राबवला तर शासनालाही लालफितीत जिरणाऱ्या अब्जावधी रूपयांच्या पॅकेजमधून वाचणारा पैसा शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या उपायांवर खर्च करून हरितक्रांतीची पुनरावृत्ती करता येईल. पोकळ घोषणांनी या देशातील शेतकऱ्यांचे प्रश्न उलट गंभीरच होत गेले आहेत; याचीही शासनव्यवस्थेने काळजीपूर्वक नोंद घ्यावी. सबंध देशातल्या शेतकऱ्यांच्या भरवशावर शासनसत्ता टिकवणारे बहुसंख्य शेतकरी-मतदाताच जर, आयन रँडच्या 'ॲटलास श्रग्गड' मध्ये सूचित केल्याप्रमाणे, आपल्याच विश्वात निर्जन बेटावर निघून गेले ! तर सत्ता तरी कुणावर गाजवायची? रिकाम्या आणि ऐतखाऊ पांढरपेशांच्या बुर्ज्वा जमातीवर? की लालफितशाहीतल्या मग्रूर अधिकाऱ्यांवर?.

**हरितक्रांतीची आठवण –**

पुन्हा एकदा लालबहादूर शास्त्री, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कृषिक्रांतीच्या युगाची आठवणही आपण विसरायला नको. 'स्वच्छ भारत तेव्हाच निर्माण होईल; जेव्हा स्वच्छ-निकोप दृष्टीने भारतीय शेतकऱ्यांच्या अवकळेचा कलंक समूळ पुसला जाईल !' हे करायचे की नाही? याचाच विचार करण्याचे हे युग आहे. अर्थातच, जगबुडीची नांदी तर आपल्या शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीने पुकारलेल्या अघोषित संपामुळे, देशाला अंधाराकडे घेऊन जाईल. समाज आणि शासनाची कुंठितावस्था दूर होईल. ती झालीच तर मात्र, आपल्या कृषिप्रधान देशाला आणि कृषीवलांची काळजी घेणाऱ्या समाज-शासन-सांस्कृतिक व्यवस्थेला भवितव्य राहणार आहे ! अन्यथा; कुणाला कशाशीच काहीही घेणेदेणे शेष नसतानाच्याही ह्या ग्लोबल काळात; जगाचे सर्वच जैविक व्यवहार रामभरोसे सुरळीत सुरूच असताना.

'जहाँ डाल डाल पर सोने की चिडियाँ करती है बसेरा,
वो भारत देश है मेरा, वो भारत देश है मेरा '

ह्याच आभासी वास्तवात आजही आम्ही जगत आहोत.
केव्हा जगबुडी येईल! त्याची वाटच आम्ही पाहत आहोत...जय जवान! जय किसान!...

**डॉ. किशोर सानप**
नागपूर-४४००३४

**आधार ग्रंथ व इतर संदर्भ ग्रंथ –**

१. गाथा सप्तशती विकिपीडिया
२. श्री. तुकाराम बावांच्या अभंगाची गाथा (शासकीय) – पुरुषोत्तम लाड, द्वितीय आवृत्ती १९५५.
३. राष्ट्रसंत तुकडोजी – राजेंद्र मुंढे, लोकवांग्मय गृह, मुंबई, पाचवी आवृत्ती, २०१३.
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे भजन व कीर्तन.
५. ग्रामगीता – रचनाकार राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज, संपादक सुदामजी सावरकर, श्री गुरुदेव प्रकाशन , तिसरी आवृत्ती, २०१७

# INTERNATIONAL CONFERENCE
ON RECENT TRENDS IN MULTI-DISCIPLINARY RESEARCH | ICRTMR 2023

Dnyandeep Shikshan Prasarak Mandal's

# DR. KHATRI MAHAVIDYALAYA

Tukum, Chandrapur

**Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to Gondwana University, Gadchiroli**



**Arts, Commerce and Science Stream**
**(Junior, Graduate, Post Graduate Department & Ph.D. Research Center)**

## COURSES CONDUCTED

### Junior Wing

11th & 12th
Arts, Commerce and Science

### Vocational Courses

Computer Science
Electronics
Marketing & Salesmanship

### Degree Programme

B.A.- Marathi Medium
B.Com- Marathi Medium
B.Sc.- English Medium
(Microbiology, Computer Science, Environmental Science and Other Regular Classes)

### Post Graduate Programme

M.Sc. (Chemistry)
M.Sc (Zoology)
M.Sc.( Physics)
M.Sc. ( Mathematics)
M.Sc.( Computer Science)
M.Sc. ( Environmental Science
M.Com. ( English & Marathi Medium)
M.A. ( Sociology, Political Sci. Marathi, Economics. Geography, Home Economics, History)

### Ph.D. Programme

Economics
Marathi
Commerce
Environmental Science
Mathematics

**Dr. J. M. Kakde**
Principal
Dr. Khatri Mahavidyalaya, Chandrapur

**Dr. N. H. Khatri**
President
Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

Jointly Organised by

DSPM'S DR. KHATRI MAHAVIDYALAYA,
TUKUM, CHANDRAPUR, MAHARASHTRA

SSES AMT'S SCIENCE COLLEGE,
CONGRESS NAGAR, NAGPUR, MAHARASHTRA

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळ प्रणीत दहावे दोन दिवशीय संमेलन (२१ व २२ जानेवारी २०२३ ) अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन गुरुकुंज मोझरी येथे पार पडले. हे संमेलन अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण ठरले. साक्षात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी, ग्रामगीता सारख्या विज्ञानवादी वैचारिक मौलिक प्रेरणादायी अश्या ग्रंथाची निर्मिती. महाराजांच्या वास्तव्यामुळे पावन झालेले ऊर्जादायी स्थळ. स्वत: महाराजांनी लोकसहभागातून उभारलेल्या सभागृहात पार पडलेल्या दोन दिवशीय विचारमंथनात महाराष्ट्राच्या विविध भागामधून सहभागी झालेले शेतीसाधक.

मुळात भारत हा कृषिप्रधान देश. महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे भारत हा 'खेड्यांचा देश' आहे. खेडे म्हणजे स्वावलंबनाची कार्यशाळा. स्वावलंबनामधून विकास हे ग्रामोन्नतीचे कल्याणकारी सूत्र आधारभूत मानून ग्रामविकासातून राष्ट्रविकास, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजामधील सर्व स्तरांतील सर्वांचा विकास कसा होईल हा महाराजांच्या प्रामुख्याने



चिंतनाचा विषय होता. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत चिंतन केले. ग्रामविकास ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतीय खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना तत्कालीन तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या. महाराजांच्या पुढील वचनातून आजही तीव्रतेने त्याची प्रचीती येते.

'सर्व ग्रामाशी सुखी करावे ! अन्न वस्त्र पात्रदी द्यावे !
परी स्वत: दु:खची भोगावे !भूषण तुझे ग्रामनाथा!
कष्ट करोनि महाल बांधसी! परी झोपडीही नाही नेटकीशी !
स्वातंत्र्या करिता उडी घेशी ! मजा भोगती इतरची!'

यातून वंदनीय राष्ट्रसंताचे द्रष्टेपण दिसून येते. युगात्मा शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्याचे न्याय हक्क, त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी म्हणून



व्यवस्थेविरुद्ध दिलेल्या प्रदीर्घ लढ्याव्दारे शेतीमातीच्या वस्तुनिष्ठ अर्थ जाणिवांच्या जनजागृतीचे फार मोठे काम केलेले आहे. तो लढा प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कृतिशील आंदोलनाच्या माध्यमातून आणि विपुल साहित्य संपदा निर्मितीमधून दिलेला होता. त्याचवेळी युगात्मा शरद जोशींनी आपल्या एका लेखात एक खंत व्यक्त केली होती, की साहित्यिकांनी या चळवळीस हवा तसा पाठिंबा दिला नाही. जर तसा दिला असता



तर याचे परिणाम नक्कीच वेगळे झाले असते.

युगात्मा शरद जोशींचा शेतीविषयक वस्तुनिष्ठ अर्थ विचार साहित्यातून खऱ्या अर्थाने प्रतिबिंबित व्हावा, शेतीसाहित्य निर्माण होताना ते कल्पनेच्या अवास्तववादी भराऱ्या न मारता त्यामधून शेती व्यवसायाची वस्तुनिष्ठता प्रतिपादित व्हावी, शेती व्यवसायापुढील ज्वलंत समस्येची ओळख साहित्यविश्वाला व्हावी. नवतंत्रज्ञानाची कृषीजगताशी सांगड घालत वस्तुनिष्ठ जाणिवांची लिहिणाऱ्या हातांना वैचारिक बैठक मिळावी, सशक्त व्यासपीठ मिळावे. या उद्देशाने श्री. गंगाधर मुटे सरांनी अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.



अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे ११ वर्षापूर्वी लावलेले हे साहित्यरूपी रोपटे आज महाराजांच्या पावन भूमीत येऊन आपल्या वैचारिक मुळाशी किती भक्कमपणे तादात्म पावत आहे याची प्रचीती आल्याशिवाय राहत नाही. मला वाटते ही साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने शेतकऱ्याच्या शिक्षित झालेल्या

मुलांची म्हणजे, पुढच्या पिढीची आहे. ज्याचा एक पाय गावात अन दुसरा पाय शहरात आहे. एकीकडे परंपरेतून चालत आलेल्या काळानुसार बदलत गेलेल्या शेतीच्या दुरवस्थेचाही तो साक्षीदार आहे. दुसरीकडे आता शेतीत राम नाही म्हणून पर्यायी व्यवस्थेकडे




मोठ्या आशेने बघतो, त्यात सामील होतो परंतू तिथेही त्याला, ते तंत्र अवगत करूनही, नव्या काळातील रोजगारांच्या संदर्भातील नव-नवी आव्हाने पेलताना सुद्धा मूळ समस्येशीच झगडावे लागत आहे. अश्या विचित्र मानसिकतेमध्ये आजच्या शेतकरी पुत्राचे एकूणच तरुणांचे भावविश्व चिंतेने ग्रासलेले आहे. कोणत्याही समस्येच्या जोपर्यंत आपण मुळाशी जात नाही तो पर्यंत त्याच्या उत्तरापर्यंत पोहचू शकत नाही हे सत्य आहे. मुळात युवावर्गाला शेतीमधून काढता पाय घेण्याची का आवश्यकता वाटली? जिने त्याचे भरणपोषण केले, तीच शेती आता जोखड का वाटावी? गावातच जर त्याच्या रोजगारांच्या समस्या सुटल्या असत्या तर? शेतीला व्यवसायाचा दर्जा दिला असता तर? तो न देण्याची कारणमीमांसा? हा चिंतनाचा विषय आहे. ही एकट्याची समस्या नसून फ़ार मोठ्या शेतीनिष्ठ समूहाची असल्यामुळे तो सामूहिक चर्चेचा, विचार मंथनाचा विषय आहे. अश्या चर्चेकरिता कार्यशाळा संमेलनाची आवश्यकता असते. हेच काम मोझरी इथे पार पडलेल्या दहाव्या संमेलनाने केलेले आहे.

उद्घाटन सत्रात संमेलनाचे प्रमुख कार्यवाहक श्री. गंगाधरजी मुटे सरांनी आपल्या प्रास्ताविकात एकूणच मराठी साहित्यातील वस्तुनिष्ठ शेतीसाहित्याचा आढावा घेताना, महात्मा फ़ुले नंतर युगात्मा शरद जोशी अशी दोनच नावे प्रामुख्याने दृष्टिपथात पडतात. काही अपवाद वगळता ग्रामीण साहित्याच्या नावाने लिहिल्या गेलेले शेतीसाहीत्य हे मोहमयी कल्पनारम्य अश्या आभासी पद्धतीने निर्माण झाल्यामुळे शेतीव्यवसायातील दाहकता, अस्सलता शहरातील वाचकांपर्यंत पोहचलीच नाही. त्यामुळे शेतीविषयाकडे, शेतकऱ्याकडे गंभीरपणे या समाजाने पाहिलेच नाही. परंतू आता आपल्या मदतीला तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्याचा वापर करून आपण आपल्या समस्या मांडू शकतो. संमेलनाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना, लिहित्या हाताने हे हक्काचे व्यासपीठ समजून आता आपल्या पूर्ण ताकदीनिशी व्यक्त व्हावे, असे मत व्यक्त केले.

उद्घाटक सह्याद्री फार्मचे संचालक श्री. विलास शिंदे यांनी शेती उद्योग व्यवसायामधील संधी आणि एकूणच शेतीउद्योग प्रक्रिया शेती उद्योग साहित्य याबाबत मार्गदर्शन केले. विशेष अतिथी वऱ्हाडी कादंबरीकार तथा म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ सदस्य पुष्पराज गावंडे हे स्वत: शेतकरी असल्यामुळे एकूणच शेतीव्यवसायामधील ज्वलंत समस्यांकडे लक्ष्य वेधून आपल्या मनोगतात साहित्यिकांची जबाबदारी प्रतिपादित केली. विशेष अतिथी डॉ. रवींद्र शोभणे, कार्याध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ यांनी आपल्या मनोगतात मराठी साहित्यातील अनेक दाखले देऊन स्वानुभवातून केलेली साहित्य निर्मिती ही वाचकांच्या काळजाचा वेध घेते. उपस्थित नवोदितांना अनेक मार्गदर्शक सूचना केल्या व संमेलनास शुभेच्छा दिल्या.

दोन सत्रात पार पडलेल्या शेतकरी कवी संमेलनातून महाराष्ट्राच्या विविध भागामधून सहभागी झालेल्या कवींनी शेतीमातीचे भावविश्व आपल्या अनुभूतीतून उलगडताना विविध समस्यांच्या मुळाशी जातांना काही प्रश्न निर्माण करीत उत्तरे शोधण्याचाही प्रयत्न केला. अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीने याच व्यासपीठावरून मराठी साहित्याला, मराठी शेतकरी मुशायरा ही दिलेली संकल्पना, यात फक्त शेतीमातीस समर्पित असा गझल मुशायरा मधून अनेक नवनव्या शेतीसाहित्यातील संवेदना उजागर होत गेल्या. अनेक नव्या दमाचे गझलकारांना हे व्यासपीठ आपले वाटू लागले आहे ही




एक उपलब्धी म्हणावी लागेल. कथाकथनाचे सत्र, अनुक्रमे बोलीभाषेतील पारंपारिक लोकवाङ्मय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे शेती वाड्मय, खुल्या बाजारपेठेतील शेतीचे भवितव्य,अन्नदाता सुखी भव: की अन्नखाता सुखी भव: अश्या विविध विषयावरील परिसंवादातील सांगोपांग विचारमंथनातून शेतीसाधकांना बौद्धिक मेजवानी देण्याचे काम या परिसंवादामधून साध्य झाले. या संमेलनानिमित्य आयोजित विश्वस्तरिय लेखन स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार पुरस्कार रूपाने करून लिहित्या हातांना बळ देऊन शेतीसाहित्यिकांची एक दमदार फळी निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

**-रवींद्र अंबादास दळवी**

भ्रमणध्वनी - ७०३८६६९५४२

# सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर संचालित

१) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

२) शंकरराव बेझलवार कला, वाणिज्य महाविद्यालय, अहेरी, जि. गडचिरोली

३) शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

४) सौ. सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, पडोली

५) सौ. लिना किशोर मामीडवार इन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अॅण्ड रिसर्च, कोसारा, चंद्रपूर

६) नेहरू विद्यालय, चंद्रपूर

७) इंदिरा विद्यालय, वरूर रोड

८) श्री. साईनाथ विद्यालय, कढोली

९) गुरूनानक विद्यालय, विरूर (स्टे)

१०) आदर्श किसान विद्यालय, नारंडा

११) सरस्वती विद्यालय, वढोली



(श्रीमती सुधाताई पोटदुखे)

**अध्यक्ष**

**सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर**

## १० वे अखिल भारतीय शेतकरी संमेलनाच्या "हार्दिक शुभेच्छा"


महात्मा फुले अर्बन को-ऑप.बँक लि.अमरावती,
मुख्य शाखा : अमरावती जुने कॉटन मार्केट चौक, अमरावती
श्री. राजेंद्रजी म. आंडे
अध्यक्ष
श्री. दिलीपराव आ. लोखंडे
उपाध्यक्ष
श्री. अजयजी म. सिनकर
मुख्य कार्य. अधिकारी
महात्मा फुले विशेष ठेव योजना
२२२
दिवसांकरीता ७%
जेष्ठ नागरिकांसाठी
७.५०%
-: मा. संचालक मंडळ :-
श्री. यामनराव भि. यासनकर, श्री. रमेशराव शं. मडघे, डॉ.श्री. अशोकराव वि. लांडे, श्री. प्रमोदराव वि. कोरडे,
श्री. संजयराव रा. कुरळकर, श्री. मनोजराव ड. भेले, श्री. केशवराव न. कांडलकर, डॉ.श्री. सुधाकरराव हि. डेहनकर,
प्रा.श्री.हेमंतराव सा. बेलोकार, श्री. पुरूषोत्तमराव बा. अलोणे, श्री. रंगरावजी खु. पोहगे, सौ. राजश्रीताई रा. जढाळे.
सौ. निलीमाताई दि. अडोकार, तज्ञ संचालक : श्री. विठ्ठलराव गो. बकाले, ॲड.श्री.आशिषजी लांडे
बोर्ड ऑफ मॅनेजमेंट
श्री. अरूणजी चामलवार
ॲड. रमेशजी भोयर
श्रीमती अर्चनाताई वारव्दे
UNIFIED PAYMENT INTERFACE
सर्व प्रकारची कर्ज सुविधा उपलब्ध
CTS CLEARING
मोबाईल बँकींग सेवा
RUPAY कार्ड ATM सेवा
IMPS / NEFT / RTGS
लॉकर्स सुविधा
SMS BANKING


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय
नागरी सहकारी पतसंस्था मर्या.धनोडी र.नं.५४०
र.नं. ए.टी.आय./व्ही.आर.डी./आर.एस.आर./सी.आर./५४०
मुख्य कार्यालय : राजगृह, आर.टी.ओ.चौक, मुलताई रोड, वरुड
विस्तारीत कक्ष : आठवडी बाजार, राजुरा बाजार, ता. वरुड,जि.अमरावती
व्यवसाय,व ७/१२ वर त्वरीत कर्ज उपलब्ध
सोने तारण कर्ज 1% व्याज
संस्थेमध्ये बचत खाते Saving Account उघडून स्किमचा लाभ घ्या
सोने तारण कर्ज उपलब्ध
ठेवीवर ८० % कर्ज उपलब्ध
योजना फक्त मर्यादीत कालावधीकरिता
ग्राहक सेवा केन्द्र
विज बिल भरणा केंद्र
सिर्फ आधार कार्ड लाएं और अपने किसी भी बैंक खाते से मिनटों मे पैसा निकाले/ जमा करे/ पैसा भेजे
भारतभर पैसे पाठविण्याची, काढण्याची सोय उपलब्ध
Pay Nearby
AADHAAR
Money Transfer
Cash Withdrawal
Cash Deposit
भारतीय स्टेट बैंक
State Bank of India
Union Bank
बैंक ऑफ बड़ौदा
Bank of Baroda
ALLAHABAD BANK
Purvanchal Bank
HDFC BANK
पेन्शन ठेव
मासिक प्राप्ती योजना
मुली ठेव
पुनर्गुंतवणूक योजना

# संमेलनाचे ठराव

गुरुकुंज मोझरी येथे दि. २१ व २२ जानेवारी २०२३ संपन्न झालेल्या १० व्या अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनात संमेलनाचे कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी खालील ठरावाचे वाचन केले. त्यास उपस्थित सर्व प्रतिनिधींनी हात उंचावून अनुमोदन दिले.

या संमेलनात सर्वानुमते ५ ठराव पारित करण्यात आले.

**ठराव – १ :** भारत हा शेतीप्रधान देश आहे असे मानले जाते आणि बदलत्या स्थितीतही देशातील बहुसंख्य जनतेचे उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. तरीही शेतीक्षेत्राकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शेतकऱ्याला देशातील इतर नागरिकांप्रमाणे सुखाचे आणि सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठी शासनाने निर्णायक पावले उचलून शेतीवर सतत सुरु असलेला अन्याय दूर करावा.

**ठराव – २ :** शेतीविषयामध्ये रुची वाढावी व सर्वार्थाने नवीन उदयोन्मुख पिढीच्या शेतीविषयक जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात म्हणून प्राथमिक, माध्यमिक शालेय आणि उच्च महाविद्यालयीन अभ्यासक्रमात शेतीसाहित्याचा प्राधान्यक्रमाने अंतर्भाव केला जावा. त्यासाठी अभ्यासक्रम निवड समितीत शेतीसाहित्यिकांना प्राधान्य देऊन सामावून घेण्यात यावे.

**ठराव – ३ :** सध्या महाराष्ट्र राज्यासहित संपूर्ण देशात शेतकरी आत्महत्यांनी विक्राळ रूप धारण केलेले आहे. शेतकरी आत्महत्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस आणखी उग्र रूप धारण करत आहे, यावरून शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी आतापर्यंत केलेले प्रयत्न आणि उपाययोजना कुचकामी ठरल्या आहेत, हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या कारणाचा शोध घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी, कृषी पत्रकार आणि शेतीसाहित्यिकांचा समावेश असलेली एक बहुआयामी अभ्यास समिती गठीत करावी.

**ठराव – ४ :** महात्मा ज्योतीराव फुले आणि युगात्मा शरद जोशी यांनी शेतीसाहीत्यात दिलेले सर्वोच्च योगदान लक्षात घेऊन राज्य शासनाने त्यांना 'शेती साहित्यरत्न' पुरस्कार देऊन त्यांचा मरणोत्तर गौरव करण्यात यावा.

**ठराव – ५ :** शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने अभ्यासकांना शेतीविषयक सर्व पुस्तके सहज उपलब्ध व्हावी म्हणून 'शेती ग्रंथ पेढी' आणि 'शेतकरी वाचनालय' ही संकल्पना स्वीकारून अंमलबजावणी करण्यात यावी.

**गंगाधर मुटे**

कार्याध्यक्ष




# ९० व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

## हार्दिक शुभेच्छा



दत्ता वारूळकर



प्रकाश वारूळकर

## श्री दत्ता मेडिकल

## कळमेश्वर

# स्त्री महादेवासारखा नवरा का मागते? विष्णूसारखा का नाही?

प्रथम ज्ञानयोग, भक्तियोग आणि कर्मयोगाचा समन्वय करून जे समाजासाठी जगले, ज्यांनी गीता जगून, अनुभवून आपल्यासाठी ग्रामगीता लिहिली त्या वंदनीय राष्ट्रसंतांना नमन करते. ज्यांनी विचार करायला शिकवलं त्या युगात्मा शरद जोशींच्या स्मृतींना वंदन करते.आजचा आपला विषय... ग्रामीण बोलीभाषेतील पारंपारिक लोकसाहित्य.!

बोलीभाषा दर चौदा कोसांवर बदलते. नागरीभाषा – प्रमाणभाषेच्या व्याकरणाच्या चौकटीतच राहते, वावरते. प्रमाणभाषेची गरज आहे म्हणून महत्त्वही आहे पण प्रमाणभाषा दिवाणखान्यातल्या फुलदाणीतल्या फुलांसारखी असते, तर ग्रामीण भाषा झाडावर फुलून झुलणाऱ्या फुलांसारखी असते. ग्रामीण भाषेचं मातीशी, मातीतल्या व्यवसायांशी नातं असतं. ती लोकांची भाषा असते. लोकसाहित्यातल्या कथा कवितांचा कुणी लेखक नाही. कुठेही कुणाकडेही ' सर्व हक्क स्वाधीन ' नाही. कारण ती अनुभवांची लिपी आहे. लिहिता वाचता न येणाऱ्यांची अभिव्यक्ती आहे. अनुभव कल्पना आणि शब्द यांच्या अपार साठ्यातून लोकगीत आणि लोककथा रचल्या गेल्या. हे साहीत्य पिढ्यांनपिढ्या ऐकलं, ऐकवलं गेलं, सांभाळलं गेलं.

वरवर 'भाकड' वाटणाऱ्या या लोककथा अतिशय आशयपूर्ण असतात. चातुर्मासातल्या पूजांच्या कथा खूप सुंदर आहेत. सुमारे सात –आठशे वर्षांपूर्वी आपल्या अनाम पूर्वज स्त्रियांनी त्या रचल्या. पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचवण्यासाठी त्यांना कर्मकांडात गुंडाळून आपापल्या लेकीसुनांना त्या देत राहिल्या. त्या कथांचे आज संकलन, मुद्रण केल्यामुळे त्या कथा आपल्याला वाचायला मिळतात. पूर्वीच्या स्त्रियांना त्या ऐकून ऐकून पाठ होऊन जात. त्या कथांमधल्या शब्दांचा नाद, वाक्यांची लय त्या कथांना काव्याच्या....कवितेच्या सीमेवरआणून ठेवतात. ऐकणाऱ्याला आकर्षण वाटावं म्हणून त्यात अनेक चमत्कारही असतात. चमत्कार बाजूला केले की कथेच्या विषयाची ओळख होते.

युगात्मा शरद जोशी नेहमी म्हणायचे की ' कुटुंबात आणि समाजात दुय्यम स्थान स्वीकारून स्त्रियांनी स्वत:च्या बोलण्यातला एक विशेष गुण जोपासला आहे. जे काही सांगायचं ते पुरुषवर्गाला खटकणार नाही अशा पद्धतीने सांगायचं ' अनेक कथांमधून हे स्पष्ट दिसतं. या सगळ्या कथा आणि पूजा कुटुंबातली नाती सशक्त, सुदृढ करण्यासाठी आहेत. आपण अनुरूप नवरा – बायकोला, लक्ष्मी नारायणाचा जोडा म्हणतो. विष्णू हे स्थैर्याचं आणि लक्ष्मी हे समृद्धीचं प्रतीक आहे. समाजाला समृद्धी हवी असेल तर स्थैर्य हवंच! पण आपल्या पूर्वज स्त्रियांनी मात्र माता पार्वतीचं उदाहरण कायम आपल्यासमोर ठेवलं आहे. कारण त्यांना हे माहीत होतं की आपण लक्ष्मी झालो तर कायम पायाशी उभं राहावं लागेल आणि नारायण कायम आरामात झोपलेले. याउलट शंकर–पार्वतीच दांपत्यजीवन, सर्वांना आवडणारं आणि आदर्श आहे. शंकर पार्वती एकमेकांसोबत सारीपाट खेळतात, यात्रेला जातात, आकाशमार्गांनी जाऊन पृथ्वीवर काय चाललंय ते बघतात, एकमेकांना कोडी घालतात, प्रश्न विचारतात, उत्तरं देतात. एकमेकांशी भांडतात, रुसून निघून जातात, पण पुन्हा एकमेकांना शोधत येतात. एकमेकांचा सन्मान करतात. सन्मान जपतात. म्हणून प्रत्येक स्त्री ङ्कमहादेवाङ्कसारखा पती असावा म्हणून व्रत करते.



सात–आठशे वर्षापूर्वीच्या सामाजिक व्यवस्थेतला हा महिला सक्षमीकरणाचा वसा आहे. बहुतेक कहाण्यांमध्ये वसा म्हणजे व्रत, नागकन्या, देवकन्यांकडून घेतल्याचा उल्लेख आहे. कोणे एकेकाळी उत्तर भारतात असलेल्या अतिशय समृद्ध आणि सुसंस्कृत अशा नागवंशी आणि देववंशी समाजाचं ते स्मरण आहे. त्या सगळ्या कथांचा आशय फार सुंदर आहे. त्यातील नागपंचमीची कहाणी आपल्या ग्रामीण स्त्रियांची जास्त आवडती. मुलांमाणसांनी भरलेल्या घरात, एकीला माहेराची ओढ असते. दुर्दैवाने दुष्काळात तिचे मायबाप देवाघरी जातात. तिचं दु:ख जाणून नागराज तिचा मामा होऊन येतो. तिला ' माहेरी ' घेऊन जातो. पण तिथे तिच्या हातून नागराजाच्या पिलांना मोठी दुखापत होते. त्यांच्या शेपट्या जळतात. मोठे झाल्यावर रागारागाने तिला शिक्षा म्हणून दंश करायचं ठरवतात. तिच्या घरी जातात तर... तिच्या घरी नागपूजेचा थाट असतो. सारवलेल्या भिंतीवर हळदी कुंकवाची नागनक्षी... त्याला चंदन, बेल फुलं वाहिलेलं. समई लावलेली. दुधाचा, लाह्या फुटाण्याचा प्रसाद ठेवलेला. ती डोळे मिटून देवाला 'भावांना' सुखात ठेव, असं विनवते. त्या भावांचा राग मावळतो. ते बहिणीला आशीर्वाद देतात.

या कथेला काहीजण निरर्थक मानतात. पण जेव्हा निंदतांना, खुडतांना, कापूस वेचतांना, गहू सवंगताना... एखादा भला मोठा साप दिसतो. तेव्हा थोडं थांबून, हात जोडून, ' देवा नागराजा, तुझी, वाडी तुझं वावरं, बहिणा आली भावाच्या पातीवर ' ..... असं भावाला सांगून पुन्हा काम करत राहण्याचं बळ ग्रामीण स्त्रियांमध्ये कुठून येतं? या पूजांच्या कथा कहाण्यांतून येतं. समाजातल्या डंख करणाऱ्या प्रवृत्तींना बहिणीच्या मायेनी, सौम्य, सभ्य करण्याचा आशय ह्या कहाणीत दिसतो. बहुतेक सगळ्या पूजा स्त्रियांनी एकत्र येऊन करायच्या आहेत. कुठे जमायचं ?.... देवाच्या दारी, पिंपळाच्या पारी, वडाच्या पाठी, नदीच्या काठी..... त्या काळात स्त्रियांनी एकत्र येऊन बोलण्यासाठी, संवाद साधण्यासाठी या पूजांची संहिता आपल्या अनाम पूर्वज स्त्रियांनीच– शेतकरणींनीच तयार केली.

एका वेगळ्या संदर्भातली लोककथा..... 'गिराणाची गोष्ट ' गिरान म्हणजे ग्रहण. ग्रहण का आणि कसं लागतं हे सगळ्यांना माहीत आहे. पण लोककथा सांगते..... 'पूर्वीच्या जमान्यात सूर्य आणि चंद्र कास्तकार होते. मोठ्ठा कारभार! जमिनीला आकाश टेकतं तिथपर्यंत वावर. पाऊस सुरू झाला. चंद्र, सूर्य, त्यांच्या बायका वावरात गेल्या. जवारीचं पेरणं सुरू झालं. बियाणं नूपुर गेलं. बायकांनी बियाण्याची ठेवरेव नीट निगुतीनी केली नव्हती. आता कातावून काय उपयोग ? गावात कुणीच नव्हतं. सगळे आपापल्या वावरात. बियाणं कुठून आणायचं? गावच्या मसणात दोन इसम आले होते. राहू आणि केतू.. त्यांच्या जवळ ज्वारी होती. तीच पेरायला घेतली.सुगीला पोतभर देऊ म्हणाले. पेरणं झालं. पाऊस पाणी चांगलं झालं. वारेमाप कणसं लागली. खुडणं झालं. खुरवत खळं झालं.वण दिली. ज्वारी काढली. ढोले भरले. सूर्य,चंद्र, राहू, केतूची उसनउधारी भुलून गेले. तेव्हापासून राहू–केतू कधी सुर्याला धरतात तर कधी चंद्राला. म्हणून 'गिरान' लागते. या अशास्त्रीय कथेत शेतीचं शास्त्र आहे.

१) बियाणं नीटनिगुतीनं ठेवलं पाहिजे.
२)ती जबाबदारी घरलक्ष्म्यांची
३)बियाणं पुरेसं आहे ना हे पेरणं धरण्याआधी बघितलं पाहिजे.
४)उधारी उसनवारी वेळेवर परत केली पाहिजे, नाहीतर नामुष्की होते.

सूर्य, पृथ्वी आणि चंद्र एका रेषेत आले की ग्रहण लागतं या वैज्ञानिक सत्यापेक्षा ही लोककथा शेतीतल्या व्यवस्थापनाचं विज्ञान सांगते.

एक लोककथा मनोविज्ञान सांगणारी.... एक होता राजा. त्याला दोन राण्या.. एकीला मुलगा झाला ती आवडती झाली.. दुसरीला मुलगी झाली ती नावडती झाली.. नावडतीला मुलीसह घराबाहेर काढलं.. ती जंगलात राहायला लागली. काही वर्षांनी राजा राजधानीत फिरायला निघाला. त्याला कोष्ट्याच्या घरासमोर सुंदर साडी दिसली. त्यावर मोर विणले होते. राजाला साडी आवडली. पण ती साधी रंगीत सुताची होती. राजा म्हणाला मी सोन्याची जर देतो. हिरे माणकं मोती देतो. माझ्या राणीसाठी अशी साडी विणून दे. कोष्टीदादा म्हणाला 'ठीक आहे' कोष्ट्याने साडी विणली. सोन्याची जर गुंफली, हिरे माणकं जडवली. राजा आला. पण त्याला साडी आवडली नाही. राजा म्हणाला ह्या साडीवरचे मोर श्रीमंत आहेत. पण त्या साध्या सुती साडीवरचे जिवंत आहेत.असं का?' कोष्टी म्हणाला राजा मी ती साडी माझ्या लेकीसाठी विणली आहे. त्यात धाग्यांसोबत माझा आत्मा विणला मी. 'राजाला अपराध्यासारखं वाटलं. लेकीला शोधत जंगलात गेला. एक चिमुरडी देवाला सांगत होती.

'दिली जंगल जमीनं, दिलं आभाळ आभाळ
देवा बापा माझ्या बापा सांभाळ सांभाळ.!'
राजाने भरल्या डोळ्यांनी लेकीला कडेवर घेतलं.

या लोककथा उन्हाळ्यात अंगणात, पावसात ओसरीत छपरीत आणि थंडीत शेकोटीच्या उबेत... जिज्जीकडून, आज्जीकडून, मोठ्या मायकडून ऐकायच्या असतात. तो एक शब्दांच्या पलीकडचा सुंदर अनुभव असतो.

लोककथांसारखीच लोकगीतही फार सुंदर असतात. विदर्भाचे वैशिष्ट्य असणाऱ्या पोळयाच्या झडत्या, दिवाळीतल्या गायीगोधनाच्या आरत्या आणि माघ महिन्यात खेड्याखेड्यात गायल्या जाणाऱ्या महादेवाच्या गाण्यात नाद, लय, सूर, ठेका आणि अर्थ यांचं कानामनाला भारून टाकणारं गारूड असतं. हातगा, भोंडला, भुलाबाईची गाणी उत्साह आणि निरागस आनंद देतात. काही लोक त्या गाण्यांना सासवासुनांची भांडणगाणी म्हणतात, टिंगल करतात. पण हे त्यांच्या लक्षात येत नाही की कित्येक वर्षं, पिढ्यानपिढ्या, घरोघरच्या, शेजारपाजारच्या, सासवासुना, लेकीबाळी,

जावानणदा एकत्र येऊन ती गाणी आवडीने, हौसेने रंगून जाऊन म्हणतात. या भांडणगाण्यांमुळेच कुटुंबातल्या खऱ्या भांडणांची दाहकता कमी होते. कुटुंबातल्या सगळ्याच नात्यात थोडेफार ताण तणाव असतातच. पण ते तुटू न देण्याचं कौशल्य याच सासवासुनांत असतं. म्हणूनच शेतकरी कुटुंबात गरिबीच्या वर्तुळातही कष्ट करताना झिम्मा फुगडी रंगते.

जात्यावरचं दळण संपलं पण सोयरीक जुळली की मुहुर्ताला जातं, सूप, उखळ पुन्हा मानाने समोर येतं. सुरेल शब्द, गोड आवाज, जात्याच्या घरघरीची लय, उखळात कांडण्याचा ठेका. माउली गात असते.. आई वडिलाच्या... सासू सासऱ्याच्या पाचा गं घरच्या पांच जणी.... जात्याच्या पाऊला लाव हळद कुकु वरणाला नको थकू सखुबाई..... घरात एखादं तान्हुलं असेल तर आजीची कविता बहरते..

तान्ह्या लेकराला ऊबजुनी वाकळ चौघडी
शिउ सावून या केली मावशी मामीची लुगडी
काकीच्या लुगड्याला आत्तेचा जरीकाठ
आजीच्या पदराला माया वं काठोकाठ......

लोकरामायणातल्या काही ओव्यातर दृक्श्राव्य आहेत. शूर्पणखेबद्दल वाटणारा राग कसा व्यक्त झालाय बघा..

सुलक्षेना सकवार सीता घाबरी घुबरी
सामोर उभी राहे शूर्पणेका निलाजरी......

शूर्पणखेच निलाजरेपण ऐका...
निलाजरी शूर्पणेका रामा लक्ष्मुमना झोंबी
झिंज्या मोकळ्या गळ्यात उघडी पाठ दावी ठोंबी.

तर सीतेला वडिलकीच्या नात्यानी सल्ला दिलाय....
गुंजभर सोनियानी गळसरी शोभे गळा
सोनियाच्या हरणाचा का गे सीताबाई लळा....

एक ओवी तर इतकी अर्थपूर्ण, अगदी आशयघन.....

सीतेच्या डोळा पानी, मंदुदरीला ये रडं
बोले नाही भरतारा, सोनियानं गळा जड......

आजही समाजात सोन्यानं गळा जड झाल्यामुळे भ्रष्टाचारी नवऱ्याला शब्दानेही बोलू न शकणाऱ्या अनेक मंदोदरी दिसतात.अशी आशयपूर्ण, अभिरुची संपन्न रचना करणाऱ्या अनेक बहिणाबाई शेतात, घरात कामे करत असतात. बी अंकुरावे इतकी सहज त्याची अभिव्यक्ती असते. आजकाल टि.व्ही. वर सादर होणाऱ्या भिकार, टुकार, अर्थहीन, दरिद्री प्रस्तुतींमुळे हा प्रतिभेचा पारंपारिक, श्रीमंत अविष्कार दडपला न जावो.

शेतातल्या मातीतली एक ओवी
लक्ष्मीच्या हातामधी इळा पालवाचं लेणं
खांदाडीत वो माईना पऱ्हाटीनं दिलं देणं.

**– प्रज्ञा बापट**
यवतमाळ

Phone No 020-64102818

।।श्रीगुरु प्रसन्न।।

**With Best Compliments**

## ।।श्रीमदूर्जित सेवा केंद्र।।

Mrs .Prdnya Jayant Bapat & Mrs.Padmaja Umakant Patil

आळंदीत आल्यावर शुद्ध , योग्य मापाच्या व जकातमुक्त स्वस्त ईंधनाचा आवश्य लाभ घ्या

आळंदी देहू रस्ता साधकाश्रमासमोर
आळंदी देवाची जिल्हा पुणे ४१२१०५



# कृषि उत्पन्न बाजार समिती,
## हिंगणघाट, जि. वर्धा

**बाजार समितीची वैशिष्टे**

- शेतकऱ्यांकरीता धान्यबाजार व कापुस बाजार येथे रु. १ मध्ये भरपेट जेवन.
- रु. १/– मध्ये निवासची व्यवस्था व सकाळी नि:शुल्क चहा.
- २४ तास सुरक्षा व्यवस्था.
- मार्केट यार्डवरून बस स्थानकापर्यंत निशुल्क बसची व्यवस्था.
- (रु. १०००/– मध्ये लग्न) कानगाव येथे बिछायत व भांड्यासह रु. १०००/– मध्यें मंगल कार्यालयाची व्यवस्था.
- अभियांत्रिकी (बि.ई.) द्वितीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या शेतकरी व शेतमजुर पाल्यांना रु.३०,०००/– पावेताच्या लॅपटॉपचे ५० टक्के अनुदानावर वितरण.
- चर्चा सत्राचे आयोजन व रु.१०/– मध्ये शेतकऱ्यांना १,७४,३११ फेरोमॅन ट्रॅपचे वितरण.
- प्रकल्पाअंतर्गत १०००० चौ.फुट मध्ये लिलाव शेडची उभारणी
- संगणीकृत लिलावाची १००% अंमलबजावणी
- धान्य मार्के यार्डवर सि.सि.टि.व्ही. कॅमेरा उभारणी
- योजनेअंतर्गत क्लीनिंग ग्रेडिंग मशिन व गोदाम बांधकाम सुरु
- भव्य प्रशासकीय इमारतीची उभारणी

**आगामी महत्वाकांक्षी योजना**

- शितगृह उभारणी
- माती पाणी व पान परीक्षण प्रयोगशाळा



ॲड. सुधीर कोठारी
सभापती

**संचालक मंडळ :** मा. हरिष वडतकर (उपसभापती), सर्वश्री मधुकरराव डंभारे, मधुसुदन हरणे, ओमप्रकाशजी डालिया, उत्तमराव भोयर, शेषकुमार येरलेकर, विनोद वानखेडे, अशोक उपासे, राजेश मंगेकर, सुरेश सतोकर, बापुरावजी महाजन, बळीराम नासरे, सुरेश वैद्य, पंकज कोचर, संजय कातरे, सौ. सुरेखाताई सायंकार, सौ. माधुरीताई चंदनखेडे, संजय तपासे, राजेश कोचर, सचिव टी.सी. चांभारे

फोन नं. (ऑ.) २६६२६३
(नि.) २६६२६४

# मे. किर्ती मशिनरी

सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा

प्रो. निळकंठराव घवघवे

**वितरक :**



- कोरोमंडल इंटरनॅशनल लि.
- सल्फर मिल्स, मुंबई
- भारत इन्सेक्टीसाईड, दिल्ली
- तुळशी सिडस् लि., गुंटूर
- सेन्ट्रोमेअर बॉयो सोल्यूशन, हैद्राबाद
- दफ्तरी सिडस्, सेलू
- PHG इंडस्ट्रीयल इंन्स्टिट्यूट, कोईमतूर
- प्लुगा पम्प्स अॅन्ड मोटर्स, बडोदा
- रॉकेट इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन प्रा.लि., कोल्हापूर
- पारस इरिगेशन लि. अहमदनगर

*१० व्या अखिल भारतीय*
*मराठी शेतकरी साहीत्य संमेलनास*

# हार्दिक शुभेच्छा



# किसान ट्रेडिंग कंपनी

सिंदी रेल्वे

# १० वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन, मोझरी

## शेतकरी कवी संमेलन वृत्तांत

मा. शरद जोशी यांच्या विचाराने प्रेरित झालेली शेतकरी चळवळ महाराष्ट्रात जोर धरू लागली. एक सनदी अधिकारी असूनही शेतकऱ्यांचे कष्ट, दारिद्र्य, त्यांची सर्वांगाने पिळवणूक पाहून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी नोकरी सोडून शेतकरी आंदोलनात उडी घेतली व शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. सरकार दरबारी वेगवेगळ्या मार्गाने गाऱ्हाणे मांडले. शेतकरी जीवनावर २५ पुस्तके लिहिली. त्यांची साहित्यिक परंपरा व शेतकऱ्यांचे वस्तुनिष्ठ प्रश्न मांडण्याची हातोटी पाहून त्यांचे सहकारी गंगाधरजी मुटे यांनी सर्व शेतकरी पुत्रांनी शेतकऱ्यांचे वस्तुनिष्ठ गाऱ्हाणे साहित्यातून मांडण्यासाठी शेतकरी नेते मा. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन सुरू केले.

या संमेलनात पाहुण्यांची भाषणे, परिसंवाद, कथाकथन, शेतकरी कवी संमेलन, शेतकरी गझल मुशायरा यांचे आयोजन करण्यास सुरुवात केली. या सर्वातून शेतकरी यांची होत असलेली पिळवणूक, शेतकऱ्यांचे अज्ञान, नवीन प्रगतशेती व प्रगत बी-बियाणे, खते, हवामानावर व मार्केटवर आधारित शेती या विषयावर चर्चा होत राहिली. पहिल्या वर्षी शेतकरी कवी संमेलन व शेतकरी गझल मुशायरा याला कवींचा प्रतिसाद कमी मिळाला. परंतु जसजसे दर वर्षी साहित्य संमेलन होत गेली तसे कवींची संख्या वाढत गेली. मागच्या वर्षी एक खूप मोठे कवी संमेलन रावेरीत झाले. या वर्षी दहाव्या संमेलनात मात्र दोनही दिवस कवी संमेलन घ्यावे लागले इतकी कवींची संख्या वाढली. गझल मुशायऱ्यामध्ये ही गझलकारांची संख्या वाढली आहे. पुढील वर्षी तर ३ कवीसंमेलने व दोन गझल मुशायरे ठेवण्याची संकल्पना आयोजक श्री गंगाधरजी मुटे यांनी बोलून दाखवली.

या वर्षीचे साहित्य संमेलन हे अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कर्मभूमीत त्यांच्या स्मृतीस्थळावरील त्यांनीच निर्माण केलेल्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या कवी संमेलनाचे प्रमुख अतिथी होते सौ. सानप, श्री. विलास शिंदे, श्री. पुष्कराज गावंडे, श्री रवींद्र शोभणे, जनार्धनपंत बोथे, सरोजताई काशीकर, श्रीमती. पुष्पा बोंडे, माजी आ. श्री वामनरावजी चटप. या ठिकाणी हे संमेलन घेण्याचा हेतू म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे बहुतांश साहित्य हे शेती विषयाशी निगडित आहे. परंतु जनतेला, साहित्यिकाला त्याची माहिती व्हावी हा उद्देश होता. या संमेलनातील पहिल्या दिवशीच्या कवी संमेलनाचे अध्यक्ष होते नाशिक येथील प्रसिद्ध वऱ्हाडी कवी श्री रवींद्र दळवी तर सूत्रसंचालक होते प्रसिद्ध कवी श्री. अनिकेत देशमुख. या कवी संमेलनात ३२ कवींनी सहभाग घेतला. तर दुसऱ्या कवी संमेलनाचे अध्यक्ष होते अहमदनगर जिल्ह्यातील राहाता येथील कवी श्री. राजेंद्र फंड तर सूत्रसंचालक होते नागपूरच्या ज्येष्ठ कवयित्री सौ. धनश्री पाटील व अमरावतीचे वऱ्हाडी कवी खुशाल गुल्हाणे. या कवी संमेलनात २८ कवींनी आपल्या कविता सादर केल्या. कवी संमेलनाची सुरुवात अखिल भारतीय शेतकरी ऑनलाईन कवी संमेलनाचे अध्यक्ष तुळशीराम बोबडे यांनी केली.


राजेंद्र फंड

पुर ओसरून गेला प्रश्न बाकी आहे
। पाहणी, सर्व्हे अनब जश्न बाकी आहे ।।

या कवितेत ते म्हणतात की जादा पावसाने पिके, घरे वाहून गेली आहेत. आता फक्त शासकीय योजनेचे मदतीसाठी करावे लागणारे कागदी सोपस्कार बाकी आहे. या सोपस्कारातून हाती विशेष काही लागणार तर नाही. पण या पाहणीला, सर्व्हेक्षणाला ते जश्नची उपमा देतात. मूर्तिजापूरचे कवी माधवराव काळे आपल्या कवितेत म्हणतात की

तुझ्या कृपेने झाले येथे सारे मालामाल
अन्न पुरवतो साऱ्या जगाला, मग तुझेच का रे हाल ।।

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाने आज बाकीचेच मालामाल झालेत. मात्र पिकवणारा शेतकरी हा मात्र त्याच्या मालाची किंमत ठेवायला असमर्थ असल्याने व व्यापारी धोरणाने कमी भावात माल विकून आजही हलाखीचे जीवन जगत आहे. नांदेड येथील कवी कपिल सावळेश्वरकर आपल्या पावसावर आधारित शेतकऱ्यांच्या स्वप्नावर भाष्य करतात

मातीचंच गाणं, मातीचंच जगणं ।
कधी होणार गा सोनं हे मातीतला मन ।।

अकोला येथील युवाकवी सागर लाहोळकर शेतकऱ्यांच्या दैन्यास कारणीभूत ठरणाऱ्या दलालांना चिडून उद्वेगाने म्हणतो

'शेतकरी ठार, नेते लोक गार ।
नाही तरी हार बुवारीचे ।।'

शेवटी एक आशा ठेवून तो म्हणतो शेतकऱ्यांची मुलं ही शिकतील. त्यांचा ही काळ बदलेल. शेतकरी राजा सुखावेल. ऊसतोड मजुरांच्या जीवनावर भाष्य करताना कवी लक्ष्मण लाड त्यांच्या कष्ट, हालअपेष्टा याविषयी लिहितात

'होतो जीव लाही लाही, चरे पडती अंगाला,
घामाने चविष्ट केले भाकरीला ।
घेऊन झोपतो बाप कोयता उशाला ।।

हिंगणघाट येथील कवी नरेंद्र गंधारे 'एकांत' आपल्या गीतातून वेदना प्रकट करताना इरसाल पावसाच्या लहरीपणाने शेतकऱ्यांच्या हाल

अपेष्टांवर लिहितात...

ओळखीचे पावसाळे अनब कितीदा पाहिले,

कोरडे हे पावसाळे मी कितीदा पाहिले ।

परतुनी ये अनब पुन्हा

ये शेत माझे छप्परांविन राहिले ।।

शेगांव नगरीचे एक सामाजिक भान असलेले कवी विनायक काळे मात्र उभे हिरवे पीक पाहून शेतकऱ्याच्या आनंदी वृत्तीची व या पिकाच्या जीवावर प्रपंचात काय काय करता येईल यावर मनसुबे करत गातात...

काया काया मातीमंदी कस हिरवं रान झालं ।

पावून त्या पिकाले, शेतकरी म्हणे गाणे ।।

पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या व्यथा राजकीय विडंबनातून सांगताना या संमेलनाचे आयोजक श्री. गंगाधरजी मुटे आपल्या खास शैलीत एकाच वेळी सरकारला व संगनमताने काम करणाऱ्या पुढारी व दलालांना उद्देशून म्हणतात.....

सच्चे दिन म्हणता म्हणता लुच्चे दिन आले ।

अनब शेतमालाचे भाव तमाम लंबेलाट झाले ।।

यानंतर शासनसेवेत राहून कृषीकिर्तनाची मुहूर्तमेढ रोवणारे तसेच पिकावरील रोगांच्या उपाययोजनेबाबत साध्या सोप्या भारुडाच्या रूपाने खेडोपाडी जाऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणारे कीटकशास्त्रज्ञ केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर येथील कवी बाबासाहेब फंड हे शेतकऱ्यांना बोंड अळीच व्यवस्थापन करण्याविषयी भारुडातून सांगतात की योग्य प्रतीच बियाणे वापरा, बोंड अळीच्या उच्चाटनाच्या सामूहिक प्रयत्न करावा, कामगंध सापळे वापरा, कपाशीचा हंगाम वेळेवर संपवा अनब राहिलेली हिरवी बोंडे व पऱ्हाटी उपटून टाका व उपटलेली पऱ्हाटी बांधावर टाकू नका. इतका छान संदेश खालील गीतातून देतात..

आली आली बोंडअळी बीटी कपाशीवर ।

लपून बसली बोंडामध्ये, डल्ला मारते बियांवर ।।

परळी येथून आलेले व दरवर्षी कवी संमेलनाचे आकर्षण ठरणारे पहाडी आवाज व प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याची ताकद असलेले कवी बालाजी कांबळे आपले आई, वडील व भारतीय संविधानाप्रती आदर असलेले भाष्य करतात......

कोणी म्हणाले माझ्याकडे आलिशान बंगला आहे ।

कोणी म्हणाले माझ्याकडे फ्लॅट चांगला आहे ।

कोणी म्हणाले माझ्याकडे संपत्ती अमाप आहे

'मी म्हणाला' माझ्याकडे माझी आई अनब माझा बाप आहे ।।

वर्धा येथून आलेले कवी रंगनाथ तालवटकर शेतकऱ्यांना आता लेखणी नावाचं शस्त्र हाती घ्यावयास सांगून शासनाच्या कुचकामी धोरणाचा धिक्कार करून तू तुझी नवी शेती धोरणे आख आणि एकजूटीचा मार्गाने जीवन सुखी कर . असा क्रांतिकारी संदेश खालील काव्यपंक्तीतून देतात....

नको घाबरू कुणा आता, लेखणी घे तू हाती ।

कुचकामी या धोरणांना पुरवू नकोस माती ।।

यवतमाळहून आलेले कवी निलेश तुर्के कपाशीने दिलेल्या दग्याने तसेच आलेला उली उली कापूस काढण्याचा खर्च व कापसाला नसलेला भाव पाहून उद्विग्नपणे या कवितेत म्हणतात.....

मजुरानं मोडलं, व्यापाऱ्यांनी तोडलं,

हाती उरल्या काय फक्त काचोया ।

खर्च अमाप डोक्याला ताप,

साऱ्या रिकाम्या झाल्या रे झोया ।।

वाशिम येथील कवी युवराज टोपले आपल्या कवितेतून शेतकरी व त्यांची बैलजोडी यांच्या जगण्याविषयी भाष्य करतात...

शेती मातीत राबते, माह्या शेतकरी राजा ।

उन्हातान्हात राबते माह्या शेतकरी राजा ।।

शेती हा एक व्यापारच आहे आणि सर्व व्यापारात शेतकरी हाच बुडत असतो. म्हणजे घात होत असतो. पण तो कधी दिवाळखोरी जाहीर करत नाही. उलट स्वतः राबून जगाचे पोट भरतो. अशाच आशयाची कविता सुंदर आवाजात गावून कवी सुनील पखाले म्हणतात...

राबूनी पोट भरतो जगाचे जरी ।

घात झाला तुझा रे किती दा तरी ।।

शेतकऱ्यांना शिकवायला, फसवायला आपला मतितार्थ साधायला कंपन्या, सरकार, दलाल सर्वच जण संगनमताने तयार असतात. पूर्वी जैविक शेतीवरून अधिक उत्पादन देणाया हायब्रीड वाणाचा प्रचार प्रसार केला.लोक अधिक उत्पादन घेण्याचा नादात आपले मूळ बियाणे नष्ट झाले. आता हायब्रीड बियाणे महाग, कीटकनाशके महाग झाली. जमिनीचा पोत घसरला. तर आता पुन्हा सेंद्रिय शेती करा असे टुमणे सुरू केले. अनब नाईलाजाने कवी सुधाकर शेटे हे विकसनशील देशाच्या सर्व सुधारणा सोडून पुन्हा सर्व जुन्या गोष्टी वापरण्यासाठी उपहासाने म्हणतात.....

सेंद्रिय शेती करा म्हणून सारे समजून राहिले ग्यान ।

मग सैन्याला ही बंदुकीऐवजी द्या धनुष्यबाण ।।

पुन्हा एकदा परळी येथील कवी संजय आघाव शेतकयांना हे दुपारची उन्हे म्हणजे कदाचित कवीला कठीण काळं ही म्हणायचं असेल किंवा दुपारची उन्हाची वेळ असा दुहेरी अर्थ म्हणायचा असेल हे टळून गेल्यावर पुन्हा चांगले दिवस येतील. तसेच शेतकऱ्यांनी निसर्गाकडून, छोट्या मधमाशीकडून ही संरक्षणाचे धडे शिकावे असा उपदेश आपल्या कवितेतून उपदेश करताना म्हणतात...

खिळी काढा जोत काढा, औत खिणभर सोडा ।

ऊन टळेल माथ्याच, जरा धीर धरा थोडा ।।

कवी अजय बोरकरांनी 'पंचनामा' या शब्दाभोवती फिरत असलेले शेतकऱ्यांचे जीवन व्यथित स्वरात मांडताना म्हणतात....

जीवनाला रोज मिळतो पंचनामा ।

आत्महत्या जर सुचवतो पंचनामा ।

वाहूनी पाऊस नेतो घाम आमुचा ।

पण त्याचा होत नसतो पंचनामा ।

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथील कवी दिनेश अढागळे हे राजकीय परिस्थितीचे वर्णन करताना जेव्हा सत्ताधारी व विरोधी पक्ष एकत्र येऊन शासकीय मदत संगनमताने लाटण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा गांव विकण्याची भाषा करताना उद्वेगाने कवी म्हणतात...

बोली लावा बोली लावा उमजेल न कुणा अंतरीचा कावा ।
धनशेट मजला व्हायचे आहे, म्हणून गांव माझे विकणे आहे ।।

मुंबई येथील कवी कपिल शिंदे हे शेतकऱ्याच्या आधार असलेल्या बैलाला उद्देशून बळीराजासाठी म्हणतात....

अनादी काळापासून तूच आहेस,
बळीराजासोबत त्याच्या सुख दुःखात ।
त्याच्या बऱ्यावाईट प्रसंगाचा,
तूच एकमेव साक्षीदार ।।

शेतकरी संघटनेचे अमरावती जिल्हाध्यक्ष श्री. दिलीप भोयर हे आजपर्यंतच्या त्यांच्या शेतकऱ्यांना कसे कसे लुबाडले जाते याचे भयानक वर्णन आपल्या निरीक्षणातून मांडताना पहिल्याच ओळीत म्हणतात ....

सपासप घाव घालणाऱ्याला
कधीच कळत नसते,।
यातनेने विव्हळणाऱ्या वृक्षाच्या वेदना
कारण वृक्षांना स्वतः चा हुंकार नसतो ।।

या कवितेत घाव घालणारे म्हणजे गेल्या ६० वर्षापासून राज्य करणारे राज्यकर्ते, व्यापारी, दलाल हे सर्व लुटीच्या धोरणाचे पुरस्कर्ते कायम या मातीतील शेतकरी राजाला लुटत असतात. या लुटीचाच येथे निर्दय पणे बाजार मांडला जातो एखाद्या कसायासारखा.यांचीच लाठी असते आणि वादीचा साप ही केला जातो. तो फक्त लुटल्या जाणाऱ्या बळीराजासाठी . दहीगांवचे कवी संदीप धावडे हे आपल्या कायदा या कवितेतून शेतकरी हितास बाधा आणणाऱ्या कायद्याचा विरोधात सरकारला जाब विचारतात...

सांगू नको मला योजनेचे फायदे ।
रद्द करा आधी शेती शोषणाचे कायदे ।।

वर्धा येथील कवी नारायण निखाते शेतकऱ्याची खरी श्रीमंती म्हणजे घरातील धान्याची रास आणि या राशीच्या रक्षणासाठी घरधनीन आपल्या बाळाला ही या राशीकडे जाऊ देत नाही. कारण एका एका दाण्यासाठी तिचा धनी हा रक्ताच पाणी करत असतो. आपल्या कवितेत ते म्हणतात....

माह्या जिवातला जीव पोती दबून बसला ।
कोणा सपणात दंग, जसा मुकाची रुसला ।।

अनेक साहित्य संमेलनात उत्कृष्ट सूत्रसंचालन करणारे अकोला येथील कवी श्री. अनिकेत देशमुख म्हणजे शब्दांचे विद्यापीठ. अनेक कवींच्या दर्जेदार प्रसंगारुप कवितांनी कवी संमेलनाची रंगत वाढवतात. आजच्या कवी संमेलनात त्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना धीर देण्यासाठी तसेच पहिल्या घडलेल्या चुका सावकारी कर्ज, आता हक्कासाठी लढा, आणि भविष्यातील शेतीमातीचे जंगल आता सिमेंटचे जंगल होवू पाहतेय आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या वाईट सवयी यावर भाष्य करतानाच शेतकऱ्यांना आधार देताना म्हणतात...

घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय ।
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायचं हाय ।।

अमरावतीचे वऱ्हाडी कवी खुशाल गुल्हाने यांची आजची गारपीट ही कविता म्हणजे गारपीट झाल्यावर शासकीय पंचनाम्याचे विविध भ्रष्टाचाराचे पंचनामे या कवितेतून मांडताना ते म्हणतात.....

अवकाऱ्या पाण्यासंग गारपीटही आलं ।
औंदातं इचिभईन भलकसच झालं ।।

नागपूरच्या कवयित्री सौ. धनश्री पाटील यांनी बायको ही हलकी फुलकी कविता गाऊन बायकोचे गुण विनोदी ढंगाने सादर करून कवी संमेलनाला हसत ठेवताना त्या म्हणतात...

कपाशीचा रंग जणू, तिचा पांढरा पांढरा ।
उभ्या गावामंदी माह्या, बायकोचा डांगोरा...।।

यानंतर पहिल्या कवीसंमेलनाचे अध्यक्ष नाशिक येथील कवी श्री. रवींद्र दळवी आपल्या वऱ्हाडी कविता 'अनाज' सादर करताना सरकारला समजावतात तुम्हाला ही बळीराजा सुखी पाहायचाय, त्याच्या वावराची दशा बदलायची, यासाठी फक्त पिकाला हमीभाव द्या इतकी माफक अपेक्षा व्यक्त करतात. म्हणजे आत्महत्या टळतील आणि जाता जाता गर्भित इशाराही देतात की तुमच्याच शाळेत आता आमची मुले ही शिकत आहेत. तेव्हा....

पेरा का नोका पेरू । खालेतं लागतेच लागते ।।

दुसऱ्या कवी संमेलनाचा समारोप करताना अध्यक्षीय कविता सादर करताना ग्रामसेवा संदेश व शब्दगंध परिवाराचे अहमदनगर येथील कवी राजेंद्र फंड हे ' शेती म्हणजे' या कवितेतून शेतकरी वर्गाची व्यथा मांडताना सरकारकडून देशी वाण संपवणे, अधिक उत्पन्नाचं आमिष देऊन हायब्रीड वाण, कीटकनाशक, रासायनिक खते यांचा प्रचार प्रसार आता भरमसाठ भाववाढ, दुष्काळी संकट, वेगवेगळ्या किडींच्या प्रभावाने पिकांचे कमी उत्पन्न , विमा कंपन्यांचे लुटीचे धोरण, व शासनाच्या कोट्यानु कोटींचे मदतीचे बोगस आकडे यावर कवितेतून भाष्य करताना म्हणतात..

म्हणे शेती म्हणजे १०० नंबरी सोनं,
हक्काचं आणि पुढच्या पिढीच्या जीविताचं ।
पण उत्पन्न म्हणावं अस तर कधी कधी,
नांव सोनूबाई हाती कथलाचा वाळा ।

अशा पद्धतीने दोन दिवस दोन भागात चाललेले हे कवी संमेलने शेतकरी काव्याने बहारदार रंगले. गंगाधरजी मुटे सरांनी लावलेले शेतकरी साहित्याचे रोपटे आता वटवृक्षाकडे वाटचाल करू लागले. सर्वार्थाने गुरुकुंजामधील हे कवी संमेलने साहित्यिकांच्या व साहित्य रसिकांच्या कायम लक्षात राहतील.

**शब्दांकन – राजेंद्र फंड**
राहाता
मो. ९८८१०८५६७१

## गझल मुशायरा वृत्तांत

१० वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन गुरुकुंज (मोझरी) जिल्हा अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते. पहिल्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन वर्ध्यापासून ते या दहाव्या संमेलनापर्यंत अनेक स्थित्यंतरे या शेतकरी चळवळीने अनुभवले आहेत. आदरणीय गंगाधर मुटे सरांनी आयोजनात सातत्य ठेवून सर्व साहित्य संमेलनांचा दर्जा उंचावत ठेवला. वर्धा येथे झालेल्या पहिल्या साहित्य संमेलनामध्ये मी सहभागी झालो होतो. पहिल्या साहित्य संमेलनापासून ते दहाव्या संमेलनापर्यंत अनेक वैशिष्ट्यांनी संपन्न ही शेतकरी साहित्य चळवळ आहे. यात एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'शेतकरी गझल मुशायरा' होय. दहाव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलना मधील गझल मुशायऱ्यामध्ये सहभागी सन्माननीय गझलकारांमधील नितीन देशमुख, विद्यानंद हाडके, गंगाधर मुटे, मारोती मानेमोड आणि निलेश कवडे हे गझलकार पहिल्या साहित्य संमेलनाच्या गझल मुशायऱ्यामध्ये सुद्धा सहभागी होते. आदरणीय गंगाधर मुटे सरांना साहित्य संमेलनांमध्ये सर्वप्रथम गझल मुशायऱ्याचा समावेश केल्याचे श्रेय जाते. मुटे सरांच्या माध्यमातून शेतकरी साहित्य चळवळीमुळे हल्ली जवळपास प्रत्येक साहित्य संमेलनांमध्ये गझल मुशायऱ्याला मानाचे स्थान दिले जात आहे. यासाठी मराठी गझल शेतकरी साहित्य चळवळीची कृतज्ञ राहील.

दहाव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या गझल मुशायऱ्याचे अध्यक्ष आदरणीय अझीझ खान पठाण होते. अझीझखान पठाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या मुशायऱ्यामध्ये नितीन देशमुख , विद्यानंद हाडके, दिवाकर जोशी , संजय तिडके, यशवंत मस्के, गंगाधर मुटे, चित्रा कहाते, अजय बोरकर, सुनील बावणे आणि नंदा फोकमारे वानखडे यांचा सहभाग होता. निलेश कवडे आणि मारोती मानेमोड यांनी सूत्रसंचालन केले. संपूर्ण मुशार्ययाच्या केंद्रस्थानी शेतीशी निगडित विषय होते. गझलकारांनी दमदारपणे शेती साहित्यातील जाणिवा आपल्या गझलरचनांमधून अधोरेखित केल्यात.

वसंत ऋतूच्या आगमनाच्या वेळी सगळीकडे उल्हास असतो. शेतकरी सुद्धा यादरम्यान अत्यंत आनंदी असतात मात्र इथली व्यवस्था शेतकऱ्याच्या शेतमालाचे मोल जाणत नाही. त्यावेळी वसंताची परिस्थिती अचानक पालटते नेमके हे दुःख दिवाकर जोशी यांनी पुढील शेरामधून मांडले

'गर्द हिरव्या पालवीचा देठ काळा होत आहे
शेवटी माझ्या वसंताचा उन्हाळा होत आहे'

शेतकऱ्यांच्या वेदनांना वाचा फफ़ोडणाऱ्या या शेराने मुशायऱ्याची दमदार सुरुवात झाली. यानंतर

'पुढेच जायचे म्हणून चालतो कधीकधी
पुन्हा वळून भूतकाळ पाहतो कधीकधी'

या शेराच्या माध्यमातून संजय तिडके यांनी जगण्याचा एक आशावाद सांगणारी गझल सादर केली. शेतकरी आपल्या जगण्याकडे प्रचंड सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतो. शेतकऱ्या एवढा सकारात्मक विचार कुणीच करत नाही. प्रत्येक वेळी शेतकरी आस लावून असतो. शेतकरी अत्यंत संवेदनशील असतो. शेती करणे याला तो मातीची सेवा करणे समजतो. शेतकरी अहोरात्र कष्ट करतो. विदर्भ मराठवाड्यातील शेतकऱ्याला तर दाहक उन्हाचा त्रास सहन करावा लागतो.

'जमीन कसली उन्हात साऱ्या
पिकेल यंदा बरी म्हणालो'

यशवंत मस्के यांनी अशा समर्पक शब्दात शेतकऱ्यांचा जीवन अनुभव मांडला.शेतकरी आणि शेती साहित्य यावर गझलकार व्यक्त होत असताना समाजातील व्यंगावर सूचकपणे भाष्य करणारा चित्रा कहाते यांचा पुढील शेर

'बंगले, माड्या, हवेल्या बांधल्या तू
सांधना भिंती मनाच्या भंगलेल्या'

प्रेक्षकांना अंतर्मुख करून गेला. आयुष्यामध्ये काही असेही लोक आपल्या संपर्कात येतात ज्यांचे आयुष्यभर आपल्याला अजिबात चांगले अनुभव येत नाहीत. जग सोडून गेल्यावर मात्र ते आपल्यासोबत लोकांना दाखवण्यापुरते संबंध जोडतात. अशा दुतोंडी लोकांवर

'आधार ना कधी नाही कधी दिलासा
प्रेतास हार पुष्पे जे टाकणार होते'

अशा शब्दात नंदा फोकमारे वानखडे यांनी भाष्य केले.

शेतकऱ्यांना सरकारी व्यवस्थेचा अत्यंत जवळून अनुभव आहे. शेतकऱ्यांचा राजकारणासाठी नुसताच उपयोग होत नाही तर राजकारणाचे माध्यम सुद्धा त्यांना बनवले जाते. दुष्काळ वा महापूर ही नैसर्गिक संकटे जेवढे नुकसान शेतकऱ्यांचे करत नाही त्यापेक्षा जास्त नुकसान सरकारी यंत्रणा करते असे दुर्दैवाने म्हणावे लागते. नेमकी ही परिस्थिती

'वाहुनी पाऊस नेतो घाम अमुचा
फक्त याचा होत नाही पंचनामा'

अशा शेरातून अजय बोरकर यांनी मांडली. पावसाळ्याबद्दल विद्यानंद हाडके यांनी सुद्धा सुंदर गझल सादर केली. त्यांच्या

गझलेतील एका शेरामध्ये ते म्हणतात,
'पेरून स्वप्न हिरवे तू ही निघून गेला
उरला अखेर माझ्या डोळ्यात पावसाळा'

शेतकऱ्यांच्या डोळ्यांमधला वेदना देणारा पावसाळा ऐकून रसिकांचे डोळे सुद्धा ओले चिंब झाले.

हल्ली देशांमध्ये गावांना शहरांना चौकांना असलेली नावे बदलण्याचे सत्र सुरू आहे. गझलकार याकडे थोडा वेगळ्या भूमिकेतून पाहतो. सुनील बावणे म्हणतात,

'आज माझ्या कापसाला भाव द्या
मग भले शहरास तुमचे नाव द्या'

देशामध्ये सध्या काय महत्त्वाचे आहे हे अधोरेखित सुनील बावणे यांचा वरील शेर करतो. सरकारने कशाला प्राथमिकता द्यावी यावर सूचकपणे त्यांनी भाष्य केले.

नितीन देशमुख यांची 'जळणाऱ्याला विस्तव कळतो' ही गझल वर्धा येथे झालेल्या पहिल्या शेतकरी साहित्य संमेलनामध्ये रसिकांच्या विशेष पसंतीस उतरली होती दहाव्या शेतकरी साहित्य संमेलनामध्ये सुद्धा त्यांनी अप्रतिम सादरीकरण करून मुशायरा प्रचंड उंचीवर नेला.

'फासावरी लटकते कर्जातली जवानी
कवितेतल्या बटांचा उपयोग काय सांगा'

आणि

'मी कुणाचा वारसा नाही
हाच माझा वारसा आहे '

हे नितीन देशमुख यांचे शेर रसिकांच्या काळजात घर करून गेले. मुशायऱ्याचे सूत्रसंचालन करणारे मारोती मानेमोड यांनी

'उंच होतो फार खोल जातो पुढे
अंकुराचा फक्त कोंडमारा करा..'

अशा शब्दात अंकुराचा कोंडमारा मांडला तर निलेश कवडे यांनी

'मातीमध्ये रुजणे जमले त्याला जगता येतेः
जगणाऱ्याला पुन्हा नव्याने येथे फुलता येतेः'

ही गझल सादर करून शेतकऱ्यांचे आत्मबल वाढवण्याचा प्रयत्न केला.

शेतकरी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी

'आत्महत्या बळीच्या तू रोख वामना
मी अभयदान इतुके मागून पाहिले '

अशा शेरातून व्यवस्थेवर प्रहार केला.

मुशायऱ्याचे अध्यक्ष अझीझखान पठाण यांनी आपल्या अध्यक्ष भाषणामध्ये शेतकरी संघटना आणि त्यांचे नाते भावपूर्ण शब्दात व्यक्त केले. शेतकरी चळवळीशी संबंधित आठवणींना उजाळा दिला. शेतकरी संघटनेचा बिल्ला हा स्वाभिमान आणि समर्पणाचे प्रतीक असल्याचे सुद्धा त्यांनी प्रतिपादन केले. आदरणीय युगात्मा शरद जोशी यांनी आदिलाबाद येथे केलेल्या आंदोलनाचा त्यांनी आढावा यावेळी घेतला. त्यांनी

'बळीच्या वेदना घेऊन निघाला कापला येथे
तुझ्या या काफल्या सोबत गझलही तेथवर गेली'

'कोणता माणूस आहे आत माझ्या
मी म्हणूनच जात नाही आत माझ्या'


'मज हरवण्या ते पुन्हा चालून आले
मी पुन्हा भरली फुले भात्यात माझ्या'

अशा शेरातून मैफिलीमध्ये आणखी रंगत आणली.

'मराठी गझलेला जो मान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने दिला नाही तो मान अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाने दिला.' हे अत्यंत महत्त्वाचे भाष्य अझीझखान पठाण यांनी केले.

आदरणीय गंगाधर मुटे सरांनी १० व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाची यशस्वी आयोजन केले... माझे मित्र अझीज खान पठाण यांच्या अध्यक्षतेखाली गझल मुशायरा संपन्न झाला. गझल मुशायऱ्याचे निवेदन माझे मित्र मारोती मानेमोड यांच्यासह करण्याची संधी मला दिल्याबद्दल आदरणीय मुंटे सरांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**निलेश कवडे, अकोला**
मो ९८२२३६७७०६



90 व्या अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

# हार्दिक शुभेच्छा



## श्री नितीन खेरडे

सामाजिक कार्यकर्ता आणि कॉन्ट्रॅक्टर
गायत्री कन्स्ट्रक्शन ज़ि अमरावती

90 व्या अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

# हार्दिक शुभेच्छा




## श्री मुकुंद खोडे

सेलडोह

90 व्या अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

# हार्दिक शुभेच्छा



## श्री सुभाष बोकडे

कुरझरी, जि. वर्धा

90 व्या अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

# हार्दिक शुभेच्छा



## श्री रवींद्र खोडे

सेलडोह

# शेतकरी साहित्य संमेलन साहित्य परीक्षणाच्या निमित्ताने

शेतकरी......... तो देशाचा आधारस्तंभ असतो. अशा काहीशा अर्थानं हे शेतकरी साहित्य संमेलन. संमेलनात शेतकरी बांधवाला केंद्रस्थानी मानलं होतं. सुरुवातीला दरवर्षी सारखं याही वर्षी स्पर्धा घेतल्या गेल्या व परीक्षक ठरवले गेले. दहा परीक्षक नेमले होते या परीक्षणाला. त्या परीक्षकात फक्त औरंगाबादच नाही तर बुलढाणा, पुणे, नागपूर वर्धा, नाशिक, परभणी येशील परीक्षक होते. यामध्ये एकूण पाच कथा आल्या. एकामागून एक सरस कथा. व्यवस्थेचा बळी, धग, पीकपाणी, परतीचा पाऊस आणि तिचं परगती पत्रक. सर्वच कथा डोळ्यांना धारा लावणाऱ्या होत्या. त्यात पुरस्कार प्राप्त तीन कथा निवडल्या. धग, व्यवस्थेचा बळी आणि...

व्यवस्थेचा बळी या कथेचं प्रारूप असं होतं. शामराव एक शेतकरी. बिचारा मेहनती. शेतात पाण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यानं हिरामण सेठकडून कर्ज काढलं. कर्जात सर्व गहाण ठेवलं. परंतू फसगत झाली. मानवी व्यवस्थेनं फसगत केली व निसर्ग व्यवस्थेनंही. त्यामुळं शामराव खचला व त्यातच तो बळी ठरला या दोन्ही व्यवस्थेचा. त्यामुळं लेखक श्री लक्ष्मण लाड यांच्या कथेनुसार एकदा वादळ यावं व सारं संपावं असंच झालं होतं.

शामराव सर्वांकडे गेला मरणापूर्वी. कोणीही मदत केली नाही आणि मग गळफास आवळला गळ्याभोवती. त्यानंतर मदतीचा ओघ सुरू झाला. भेटीचा ओघही. ते सर्व कांता पाहत होती. त्यानंतर तिला अतिशय राग आला आणि रागाच्या भरात ती बोलली. ती काय बोलली हे काही मी सांगत नाही. ते आपण वाचावे.

दुसऱ्या कथेमध्ये दसरुनं अख्खा ऊसच जाळून टाकला सरकारच्या दुर्दैवी धोरणापायी. ऊस चांगला होता तरीही. परंतू त्याला कापायला कोणीच का आलं नाही? तो का जाळला? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी ही कथा आपल्याला वाचावी लागेल.

तिसरी कथा होती. परतीचा पाऊस. सोयाबीनचं पीक. पीक चांगलं होतं. परंतू तो शेवटचा पाऊस. त्या पावसानं दगा दिला व हाती आलेल्या पिकाला त्यानं नेस्तनाबूत केलं. ते कसं केलं? यासाठी ही कथा.

चवथी कथा आली होती पीकपाणी. या पीकपाणी कथेत विजेचा प्रश्न मांडला आशिष वरघणे यांनी. वरघणे यांनी या कथेत विनोदची कथा मांडली. त्याला विजेमुळं कोणता त्रास होतो व त्यासाठी तो काय करतो. पीक कसं लोळतं? याचं वर्णन केलं आहे त्यांनी. परंतू ते कसं वर्णन केलं? हे मी सांगत नाही. ते आपण वाचावं. बळीराजा डॉट कॉम वरून. तिचं परगती पत्रक. ही देखील कथा फारच चांगली. वंदी आणि मंदीची कथा. गंगारामचं शांत परंतू मग्रुरीचं बोलणं. या कथेत नंदू कोण? त्यानं काय केलं? त्याचं काय झालं? हा गूढ प्रश्न आहे.

सर्वच कथा चांगल्या होत्या. एकाहून एक सरस कथा. आशय चांगला होता. परंतू निव्वळ आशयावरून क्रमांक निघत नाहीत. त्या कथेत वाक्यरचना महत्त्वाच्या असतात. समास महत्त्वाचा असतो. तसेच मुख्यतः महत्त्वाचं असतं विरामचिन्हे व शुद्धलेखन. त्यातच मांडणी आणि बोधालाही महत्त्व असतं. शिवाय विषय धरून लिहिला की नाही. त्याला तेच शीर्षक समर्पक कसं? ते शीर्षक बरोबर दिलं की नाही. या सर्व गोष्टीचं एकत्रीकरण म्हणजेच परीक्षण. शिवाय त्या कथेत विश्लेषणही महत्त्वाचं असतं. कथेबाबत मी माझं मत मांडताना एक गोष्ट सत्य सांगतो की दुसऱ्याकडे बोट दाखवणं सोपं आहे. परंतू स्वतःवर वेळ आल्यावर पंचाईत होते. माझीही तीच गत होईल. जेव्हा मी एखाद्या स्पर्धकाच्या रांगेत उभा असेल. आज असेच स्पर्धेत लिहिणारे भरपूर आहेत. काहीजण केवळ क्रमांकासाठी लिहितात. परंतू मुख्य सांगायचं म्हणजे केवळ क्रमांकासाठी लिहू नये. काहीतरी बोध द्यायला लिहावं. बोध जर असेल तर तो देशाच्या हिताच्याही कामात येतो. बोध जर असेल तर त्या कथेतून लहान मुलांनाही चांगलं वळण लावता येऊ शकते.

या शेतकरी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने गझल तपासता आली. याबाबत मी आवर्जून सांगेन काहीतरी. एका गझलसम्राटाने एक गझलेची पुस्तक मला दिली व म्हटलं की या पुस्तकावर समीक्षण लिहा. मी पुस्तक चाळली व पाहिलं की मुखपृष्ठावर गझलसंग्रह नाव लिहिलं आहे. त्यानंतर आतील भाग तपासला आणि आढळलं की त्या पुस्तकात शेर आहेत. परंतू त्या शेराचा क्रम लगावलीत जुळत नाही व त्याची काही लगावली लिहिलेली नाही. त्यामुळं त्या गझल नाहीत तर त्या कविता आहेत. त्यानंतर मी म्हटलं की यात लगावली कुठाय? त्यावर तो म्हणाला,

'दुसऱ्या पुस्तकात रफमध्ये.'

यात का टाकल्या नाहीत? '

'ज्येष्ठ गझलकारांनी म्हटलं की टाकायच्या नाहीत.'

' मग मी हा गझलसंग्रह असल्यामुळं यावर समीक्षण कसं लिहू. मी आक्षेप घेणार ना.'

'तुम्ही लिहा. त्यानंतर त्यावर उत्तर ते देतील.'

मुख्य म्हणजे यामध्ये लेकरू याचं आणि उत्तर गावातील लोकं देणार. किती हुशार आजचे गझलवाले. अलीकडं असे गझलकाराचे पीकच आले आहे. गझलेला एवढे महत्त्व आहे की अलीकडे अखिल भारतीय साहित्य संमेलनात गझल शीर्षक दिलं कवितेला की ती कविता पास. त्याला कवी कट्ट्यातील प्रथम पत्र प्राप्त. काही पुण्यातील लोकं गझलेबाबत म्हणतात की गझल ह्या गायन करून म्हणायच्या नसतात. मग भीमराव पांचाळे आणि सुरेश भट का गायन करायचे. अलीकडे ज्याला गझल जमत नाही, तेही म्हणतात की मी गझल लिहितो. परंतू ते गझलसदृश्य रचना लिहितात आणि गझल म्हणून प्रसवतात. मला गझलेबद्दल जास्त खोल माहिती नाही. परंतू जेवढी आहे तेवढी पुष्कळ आहे. जी मी महाविद्यालयात असताना व गझलसम्राट सुरेश भटांकडे जात असताना शिकलो. त्यांना आम्ही दादा म्हणायचो आणि त्यांच्या घरी गेलो तर ते लिहून मागायचे. त्यावेळी हात दुखायचे. परंतू आज त्याचा फ़ायदा झालेला वाटतो. गझलाही सुंदर होत्या. त्यातील एक गझल. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय देणारी होती. कवितेचं रसग्रहणही केलं काही लोकांनी. काही लोकांनी पोवाडे लिहिले, काहींनी छंदमुक्त कविताही लिहिल्या. काहींनी दुःखद अनुभव मांडले आपल्या शब्दात. साऱ्याचं परीक्षण केलं गेलं. मी आतापर्यंत कथेचं, लेखाचं, कवितेचं परीक्षण केलं होतं. परंतू पुस्तक परीक्षण. ते मी यावेळी पहिल्यांदाच केलं. पुस्तक परीक्षण. तेही दमदार असलेलं परीक्षण लिहिलं साऱ्यांनी. परंतू प्रत्येकाची शैली वेगळी. त्यातच कोणाच्या पुस्तकाचं परीक्षण लिहावं. कोणाच्या नाही हेही काहींना समजत नसल्यासारखं परीक्षण लिहिलेलं भासलं. एक कथाही तशीच वाटली. शिव्या होत्या त्यात.

शिव्या......कथेनुसार ठीक आहेत. परंतू त्या स्पर्धेमध्ये नसाव्यात. माझं तरी मत असं आहे. याच अनुषंगानं मी गतकाळात बाकीच्या लोकांनी पहिल्या क्रमांकानं नावारूपास आणलेली एका लेखकाची कथा स्पर्धेतून बाद केली होती. त्याचं कारण तुम्हाला पटेलच असं नाही. परंतू मला पटते. ते कारण आवर्जून देतो इथे. मी ती कथा कापताच त्या माणसाचा फोन आला. म्हणाला, 'माझी कथा का कापली? इतर मंडळांकडून माझ्या कथेला प्रथम क्रमांक मिळालाय. तुम्ही तर सर्रास यातून बाद केली. उत्तेजनार्थही नाही.' मी वरील प्रश्नावर चूप बसलो. परंतू तो आग्रहच करीत होता, त्यावर मी म्हणालो, 'त्यात शिव्या टाकल्या होत्या.' मी सांगितलेलं उत्तर त्याला पटलं नाही. तसा तो इतर लेखकाची नावं घेत होता. म्हणत होता. 'त्यांनी सांगितलंय की कथेला आशयगर्भीत करण्यासाठी अशी शिवी टाकली तर चालेल. मग तुम्ही कशी कापली? माहीत आहे मी कोण आहे. मला अखिल भारतीय संमेलनात निमंत्रित म्हणून बोलावतात.' मला त्या लेखकाच्या बोलण्याची कीव आली. अखिल भारतीय संमेलनाचं नाव घेताच व त्या मंडळींना बदनाम करताच त्याला सरळ करण्यासाठी मला उत्तर द्यावं लागलं. अखिल भारतीयांचं निमंत्रण असो की मोठमोठ्या कवीसंमेलनाचं निमंत्रण असो. ते कोणाला मिळतं. हे सर्वांनाच माहीत आहे. सत्य सांगायचं झाल्यास कवी कट्ट्यातील कविता चांगल्या असतात. परंतू अखिल भारतीय संमेलनातील निमंत्रित लोकांच्या नसतात. तिथं कोण जातात? ज्यांची ओळख आहे ते वा जे तेथील मुख्य लोकांना पैसा मोजत असतील ते. त्यांनाच विचारपीठ मिळतं. अखिल भारतीयच नाही तर कोणत्याही संमेलनात जे वशिलेबाजीने पुढारलेले असतात. त्यांनाच विचारपीठ मिळत असतं. इतरांना नाही. ही सत्यता नाकारता येत नाही. ते लेखक महाशय. त्यांनी प्रश्न विचारताच मी म्हटलं. 'हे बघा महाशय, तुमच्या कथेला आतापर्यंत आपण सांगितलेल्या मंडळांनी कसा पुरस्कार दिला हेच कळत नाही. जर माझ्यासारख्या आणखी लोकांनी तुमच्या कथेला पुरस्कार दिले आणि उद्या एवढे पुरस्कार प्राप्त आहे असे समजून ती कथा जर अभ्यासक्रम मंडळानं अभ्यासक्रमाला लावली तर उद्या लोकं आम्हा परीक्षकांना चपला जोड्यांनी मारतील. कारण त्या कथेत शिव्या आहेत. शिव्यांचे संस्करण आहे. त्या शिव्या शिकवायच्या का मुलांना की लोकांना शिकवायच्या शिव्या. ही एक की अशा शिव्या असणाऱ्या कथा मनोरंजनासाठी ठीक आहेत. परंतू शाळेत शिकणाऱ्या लहान मुलांसाठी वा महाविद्यालयीन मुलांसाठी नाहीत. त्याचप्रमाणे अशा कथा ह्या पुरस्कारासाठी वा पुरस्कारात क्रमांक मिळविण्यासाठी नसाव्यात असं माझं मत आहे. इतरांचं मत मला माहीत नाही.


एक प्रसंग सांगतो. एका प्रसिद्ध लेखकाची पुस्तक एका

विद्यापीठाला लागली. ज्यात शिव्या होत्या. ती पुस्तक एका महाविद्यालयीन तरुणीनं वाचली. तिला ती शिवी पटली नाही व तिनं त्याचा गवगवा केला. प्रकरण बरंच गाजलं. त्यानंतर ती पुस्तक त्या विद्यापीठातून बाद झाली. लिहिणारे लेखक असे असतात की त्यांना प्रसिद्धीसाठी मी काय करू आणि काय नाही असं वाटतं. काही लेखक मी असे पाहिले की ते पुस्तक पाठवतात. त्यानंतर माझी पुस्तक मिळाली का म्हणून फ़ोन करतात. त्यावर समीक्षण लिहा म्हणून सांगतात. त्यानंतर ते समीक्षण स्वतः वर्तमानपत्रात छापतात. मग ग्रीनिज बुकात नोंद करायचा प्रस्ताव पाठवतात. तसेच काही लेखिका अशाही पाहिल्या की त्या कविता वर्तमानपत्रात पाठवायलाही सांगतात. स्वतः पाठवत नाही आणि छापून आल्यावर ती कात्रणं शोधून ती कात्रणंही पाठवायलाही सांगतात. म्हणजे फ़किराच्याच म्हणण्यानुसार मेहनतही कोंबड्यानंच करायची आणि अंडंही फ़किरानंच खायचं. काही मागोवेही आलेत. काही वैचारिक लेखही.......

या परीक्षणाच्या माध्यमाने एक ललितलेखही आला. त्यातील गोवंश बंदी हा लेख मागोवा मध्ये आला. तो बरा वाटला. काही टिप्स दिले आहेत त्यात. वाचण्यालायक आहे. गंगाधर मुटे त्याचे लेखक आहेत. त्यांचाच 'शेतीतज्ज्ञांनो लाज बाळगा' हाही त्यांचा लेख चांगला आहे. त्यांचा 'उलट्या काळजाची उलटी गंगा' हाही लेख चांगला आहे. त्यातच 'शेतकरी सुखी तर जग सुखी' या भारती सावंत ताईचा लेखही विचार करायला लावणारा आहे. परीक्षण करीत असताना मी त्या लेखाचा लेखक कोण वा कवितेचा कवी कोण? हे मी पाहिलं नाही. बेरीज केली. त्यानंतर जास्त गुण पाहिले. त्यात गंगाधर मुटेंना जास्त गुण दिसले. त्यानंतर मी त्यांना व्हाट्सएपवर मेसेज केला की आपण तर आयोजक आहात. मग स्पर्धेत भाग का घेतला. त्यावर ते नियम व अटी वाचल्या नाहीत का म्हणाले. मी चूप बसलो. परंतू मला शंका होती की जर मी त्यांच्या लेखांना प्रथम क्रमांक दिला तर लोकं म्हणतील, 'काहीतरी सेटिंग असेल. म्हणूनच तर क्रमांक दिला. परंतू तसं काही नाही. आपण वेळ मिळाल्यास त्यांचे लेखही वाचून पाहावे. खरंच ते सरस आहेत. डॉ. राजेंद्र फ़ंड व गंगाधर मुटेंचे लेखन पाहून आता कळलं की ते दर्जेदार लेखक आहेत माझ्याहीपेक्षा. मी त्यांच्यासमोर काहीच नाही.

परीक्षण आपल्या लेखांचे, कवितेचे, गझलेचे, कथेचे. परंतू आपले सर्वांचे आभार. आपल्या लेखाच्या निमित्ताने माझे अनुभव वाढलेले आहेत. मी आपल्यापेक्षा बराच लहान असेल. वयानं, मानानं आणि इतरही गोष्टीनं. या निमित्तानं आपल्या कथा, लेख वाचायला मिळाल्या. अनुभवता आल्या. त्यामुळं आपले आभार. तसेच आयोजकांनी मला तशी संधी दिली व आपल्या दर्जेदार कथेचं मला परीक्षण करता आलं, त्याबद्दल आयोजकांचंही आभार. एकंदरीत आभार मानायचं झाल्यास सर्वांचेच आभार. साहित्यसंमेलनात रंगत येवो ही सदिच्छा!

आपला स्नेहांकित
**अंकुश शिंगाडे,** नागपूर
भ्रमणध्वनी : ९३७३३५९४५०



## विठ्ठलाची गझल

पंढरीचा हरी सावळा
देव, देवात हा वेगळा

पावला भक्तिभावास अन्
फुलविला सावत्याचा मळा

गाठली रे तुझी पंढरी
विठ्ठला मी जरी पांगळा

पाहण्याची  तुला एकदा
फार इच्छा म्हणे,, आंधळा

भूक दाबून पोटातली
राखला बा तूने जोंधळा

चंद्रभागा,, म्हणे विठ्ठला
लागला रे मलाही लळा !

गायली,, विठ्ठलाची गझल
गोड नाही,, तरी पण गळा

**– सुनिल बावणे – निल**
**बल्लारपूर, चंद्रपूर**

## शेतकरी ठार

शेतकरी ठार। नेते लोक गार ।।
नाही तरी हार। बुवारीच ।।

कष्टाची भाकर । लागे त्यास गोड ।।
पिक येते थोड । दरिद्रीचे ।।

किती घ्याल जीव । येते आते कीव ।।
पिकांना द्या भाव । भडव्याने।।

नाही स्विकारत । हार ठरलेली ।।
लढतो जिद्दीनी । जगासाठी ।।

मुल शिकतील । काळ बदलेल ।।
शेतकरी राजा । सुखावेल ।।

**– सागर लाहोळकार**

अकोला

## सर्जा राजा दोन पाऊलं पुढे

शेतकरी दादा तुझ्यासाठी
कायमच दोन पाऊलं पुढे,
बैलगाडी औत नांगर अन्
मोट ही गाणं ऐकता ओढे.

आमची माय सांभाळीली
लहानपणा पासुन प्रेमाणे,
आम्ही लहानाचे माठे ही
झालो बरं जिवलावल्याने.

लेकरावाणी लाड पुरवले
आहे कर्तव्य उतराई होणं,
रात्रंदिवसही मनापासुनच
शेतीकामात मदत करणं.

आम्हास राहण्याला गोठा
स्वच्छ सुंदर सतत ठेवती,
पोषक आहार चारा पाणी
दुःख लागता डॉ.बोलावती.

पोळा सण आमच्यासाठी
दोन दिवस आमची सेवा,
पुरणपोळीचे भोजन देती
बळीराजा असाच स्नेह ठेवा.

**– राजेंद्र उदारे**
पाथर्डी, अहमदनगर

## साथ तुझीच असेल

माझा शेतकरी दादा
घाम गाळी भुके पोटी,
मृग नक्षत्र निघता
भरी धरणीची ओटी........१

करी मशागत तिची
नांगरणी नि पेरणी ,
पावसाची व्हावी कृपा
त्याची हो मनधरणी.......२

किती राबतो खपतो
करी रक्ताचेच पाणी ,
त्याच्यावर विसंबून
सकलांची जिंदगानी.......३

स्वप्न भंगले हिरवे
बळीराजा खंतावला ,
हक्क त्याचा हिरावून
काळ कसा सोकावला......४

अंतरीची व्यथा जाणू
होऊ त्याचे उतराई ,
हक्क पोशिंद्यास देण्या
प्रतीक्षित वनराई.........५

देवा विनवितो तुला
साथ तुझीच असेल,
जीत एकीची होऊदे
माय तृप्तीने फ्फुलेल......६

**– सौ रझिया इस्माईल जमादार**
अक्कलकोट, सोलापूर

## मातीचे देणे सरले नाही

जिथे माणसाला मातीचे घेणे उरले नाही
तिथे मातीला माणसाचे देणे सरले नाही

आम्ही पेरला आत्मा कुणाला कळाले नाही
पावसात कुणब्याचे अश्रू दुःखात ओसरले नाही

नावाचा मी बळीराजा आहे मी भिकारी
भर सुगीच्या दिवसात बीज हरले नाही

कर्जाचा डोंगर साचतोया कष्टाच्या माथ्यावर
फाटक्या झोळीत माझ्या काही भरले नाही

ओळखीचा शिवार सोडून बाकीचे अनोळखी वैरणे
निसर्ग कधी कोपेल गुज स्मरले नाही

राब राब राबून शेतमालाला भाव नाही
महागाईत शेतकऱ्याचे स्वस्त धान्य पुरले नाही.

**– कपिल सावळेश्वरकर**
नांदेड

## ये असा रस्त्यावर

भूल आता किसाना जातपात धरम
ये असा रस्त्यावर, सोड लाज शरम ।।धृ ।।

तू घेतं तूर गहू ऊस सोया कापूस,
काटकूट करून तुह्या हाती टिपूस
पिकलं तवा लुटा, शासनाचं धोरन ।।१ ।।

चोर डाकू गुंड मारून राह्यले डल्ला,
व्यापारी दलाल भरून राह्यले गल्ला
राजकारणी पुढारी झाले बेशरम ।।२ ।।

कर्मचारी घेते सदा महागाई भत्ता,
निसर्ग मारे तुले, शासन देते बुत्ता
सम्दे झाले कडक,तू राह्यला नरम ।।३ ।।

आपसातली नष्ट कर तू आता दुरी,
शत्रू अन मित्राची कर पारख खरी
कोनता होये बिबा न कोनती खुरम ।।४ ।।

पक्ष असो कोनता फरक ना नेत्यांत,
धोरनापायी त्याहिच्या तू आला गोत्यात
आतातरी त्याहिचे जानून घे करम ।।५ ।।

बांध बरं मुठा,सांग सऱ्याहिले यंदा,
शेती दुसरं नाही, हाये उद्योगधंदा
कमी कर कर्मकांड अनब देवधरम ।।६ ।।

जोशी सायबाचे आठव सारे उपाय,
त्याच्याबिना दुसरा नाही तरनोपाय
शासनाचं धोरन, किसानाचं मरन ।।७ ।।

**– खुशाल दादाराव गुल्हाने**
गोकुळ कॉलनी, साईनगर, अमरावती–४४४६०७

# घेऊ राखेतून उभारी

घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय

धरणामध्ये गेलं घर तरी कोरडीच शेती
फफ़ाटला संसार सारा उसवली नाती
इस्कटला खोपा पुन्हा ईनायाचा हाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय
घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय

लटकुनी बा गेला, तू तसा ईचार नको करू
भेगाळल्या वावरामंदी अवंदा बारूद पेरू
लढूनिया हक्क अपुला मिळवायचा हाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय
घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय

आत्महत्या करून कुठे सुटतो कारे प्रश्न?
उचल दुःखाचा गोवर्धन तूच बनुनिया कृष्ण
सावकारी पाढा आता पुन्हा गिरवायचा नाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय
घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय

पिढ्यांपिढ्यापासून सुरू नियतीशी भांडण
दुःख पचवूनी जगा देशी सुखाचं आंदण
सातबाऱ्याचं चक्रव्यूह तुला तोडायाचं हाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय
घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय

कृषीप्रधान देशातून दिसेनाशी होईल माती
सिमेंटच्या जंगलात अमली पदार्थांच्या राती
जुलमी कपटी धोरणास या गाडायाचं हाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय
घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय....

**– अनिकेत जयंतराव देशमुख**
गोपालखेड, अकोला ४४४००६

# वांझ साहित्य निर्माण होण्याऐवजी निर्माणच न होणे काय वाईट?

**रविवार दि. १९ मार्च २०२३ रोजी भद्रावती (जि. चंद्रपूर) येथे सहावे स्मृतिगंध काव्य संमेलन संपन्न झाले या संमेलनात संमेलनाध्यक्ष गंगाधर मुटे यांनी केलेले अध्यक्षीय भाषण**




सामाजिक आणि सांस्कृतिक ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या भद्रावती नगरीत सहावे स्मृतिगंध साहित्य संमेलन आयोजित केल्याबद्दल सर्व आयोजक महानुभवांचे मी स्वागत करतो आणि आनंद व्यक्त करतो. या संमेलनाच्या कविवर्य स्व. प्र. ग. तल्लारवार (प्रगत) स्मृती मंचावर उपस्थित संमेलनाचे उद्घाटक म्हणून लाभलेले नागपूर येथील सुप्रसिद्ध समीक्षक मा. डॉ. तीर्थराज कापगते, प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले ज्येष्ठ साहित्यिक मा. आचार्य ना. गो. थुटे, प्रख्यात साहित्यिक डॉ. अनंता सूर, प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते मा. ॲड भूपेंद्र रायपुरे, स्व. विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा संमेलनाचे संयोजक मा. प्रवीण आडेकर, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मा. बळवंतराव सुर्वे, सचिव मा. रसिका आडेकर आणि या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन करणारे मा. डॉ. ज्ञानेश हटवार, माझे सर्व आप्तस्वकीय, सहकारी आणि सहाव्या स्मृतिगंध साहित्य संमेलनाला उपस्थित असलेले सर्व लेखक, कवी, गझलकार, वक्ते पदाधिकारी आणि कार्यकर्ता मंडळी

मित्र हो, आम्ही अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करत असतो. आयोजक, संयोजक मीच आहे, नियोजकही मीच आहे पण मीच आयोजित करत असलेल्या संमेलनात संमेलनाची भूमिका विस्तृतपणे मलाच मांडता येत नाही कारण संमेलनात माझ्या वाट्याला प्रास्ताविक येत असते आणि प्रास्ताविक म्हणजे केवळ प्रस्तावना करायची असते, लांबलचक विस्तृत भूमिका मांडायची नसते याची काळजी घ्यावी लागते. अध्यक्षांच्या भाषणापेक्षा प्रास्ताविक मोठे कसे असू शकते? शिंगे कितीही सुंदर असली तरी म्हशीपेक्षा शिंगे मोठी झाली तर तिथे सौंदर्य संपून विद्रुपता तयार होईल ना? आज आपण इथे संमेलनाध्यक्ष म्हणून मला निमंत्रित केले त्यामुळे निदान काही मुद्द्यांचा परामर्श घ्यायची मला संधी मिळत आहे, अशी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी आयोजकांचा शतशः ऋणी आहे.

मित्र हो, सांप्रत युगात साहित्य कसे असावे आणि कसे असू नये हा मोठा कळीचा मुद्दा झालेला आहे. पण; प्रथम एक जाण ठेवली पाहिजे की साहित्य कसे असावे? हा वादाचा, संवादाचा किंवा विसंवादाचा मुद्दाच होऊ शकत नाही. सृजन ही ज्याची त्याची अभिव्यक्ती असते. अभिव्यक्तीला कधीही कोणत्याही साच्यात जेरबंद केले जाऊ शकत नाही. 'जसा सृजक तसे त्याचे सृजन' इतकेच यासंदर्भात म्हणता येईल. ज्ञानेश्वरी ज्ञानेश्वरासारखी, एकनाथी भागवत एकनाथासारखे, तुकोबाची गाथा तुकोबासारखी, मुक्ताईच्या ओव्या मुक्ताईसारख्या, दोहे कबीरासारखे, तुतारी केशवसुतासारखी तर झेंडू आचार्य अत्र्यांसारखे. कुणी तरी उठावं, साहित्य कसे असावे असे प्रवचन ठोकावे आणि ते ऐकून सरस्वतांनी घोकमपट्टी करू साहित्य प्रसवावे, हे कदापिही शक्य नाही. जे यापूर्वी कधीही अस्तित्वात नव्हते ते निर्माण करणे म्हणजे अभिजात सृजन आणि तेच खरे अभिजात साहित्य. साहित्य कसे असावे, याची नियमावली तयार होऊ शकत नाही. करण्याचा प्रयत्न केला तर ते मर्यादेचे उल्लंघन ठरत असते. समीक्षकांनीही समीक्षा करावी पण 'कसे असावे' याचे धडे देण्याचा प्रयत्न करून सीमोल्लंघन करू नये. मर्यादेत राहूनच मर्यादा पुरुषोत्तम होता असते, इतकी तरी प्रत्येकाने जाणीव ठेवलीच पाहिजे.

> **शेतकऱ्यांना पाजले जाणारे 'उपदेशाचे डोज' साहित्यिकांचे अभ्यासदारिद्र्य, कल्पनादारिद्र्य, अनुभवदारिद्र्य व विवेकदारिद्र्य प्रदर्शित करण्याइतके फालतू स्वरूपाचे असतात. कर्ज करून दिवाळी करू नका, कर्ज काढून मुलामुलींच्या लग्नात खर्च करू नका, तीर्थयात्रा करू नका, उत्पादनखर्च कमी करा वगैरे वगैरे सारखे इतके फालतू सल्ले सांगण्यासाठी साहित्यिकाची काय गरज आहे? ते तर कोणत्याही शेंबड्या पोरांनाही कळत असते ना? मग शेतकऱ्याला कळत नाही अशा अविर्भावात जणू काही आपण ब्रह्मज्ञान सांगत आहोत असे साहित्यिकांना का वाटावे?**

पण; साहित्य कसे असू नये, याची मीमांसा हक्काने आणि ठोसपणाने करता येते. ज्या समाजात आपण जगतो त्यासमाजासाठी एखादे साहित्य पूरक नसले तरी चालेल पण मारक असता काम नये, मानवी सृष्टीच्या जीवनप्रवाहाला कुंठित करणारे आणि समाजमनाच्या उत्क्रांतीला विकृत दिशा देणारे साहित्य असेल तर

त्यावर परखड टीका टीप्पणीच नव्हे तर त्याला कडाडून विरोध करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिक, वाचक, रसिक, सृजक आणि समीक्षकांनीही उचलली पाहिजे. सारस्वतांनीही चिंतन केले पाहिजे, आत्मचिंतन केले पाहिजे. 'खपेल ते पिकेल' असा व्यावहारिक बाजारूपणा साहित्यात येणे कदापिही समर्थनीय ठरू शकत नाही. सोशल मीडियाच्या युगात तात्काळ प्रतिसाद मिळत असल्याने 'लोकांना रुचेल ते देण्याचा' मोह स्वाभाविक असला तरी त्यातून स्वतःची शक्य तेवढी सुटका करून घेण्याचा प्रयत्न सारस्वतांनी केला पाहिजे. स्वतःची अभिव्यक्ती प्रकट करण्यासाठी साहित्य असते, रसिकांच्या/प्रेक्षकांच्या फ़र्माइशीनुसार 'ऍटम पेश करणे' असा साहित्याचा तमाशा होणे समाजाच्या आरोग्याला कधीही पूरक ठरणार नाही, याची सामाजिक जाणीव ठेऊन थोडी ना थोडी सामाजिक बांधिलकी स्वीकारण्याचा प्रत्येक सृजकाने प्रयत्न केला पाहिजे.

साहित्य म्हणजे काय असते, असा जर प्रश्न आपण सार्वजनिकरित्या विचारला तर तुमच्यासमोर हजारच काय, लाखो लोक जरी बसले असतील तर एका स्वरात सगळ्यांचे उत्तर मिळेल की, 'साहित्य हा समाजाचा आरसा असतो.' पण साहित्य जर डोळ्याखालून घातलं तर साहित्यामध्ये खरेच आरसा दिसतो का? जनजीवनाकडे बघितलं तर आजूबाजूची परिस्थिती, लोकांचे प्रश्न, आजूबाजूच्या समस्या, आजूबाजूच्या लोकांचं राहणीमान, त्यांची वैचारिक ठेवण, त्यांच्या आचार-विचार आणि त्यांची वर्तणूक यांची सांगड जर उपलब्ध साहित्यासोबत घातली तर काहीतरी साम्यता आढळते का? शेती साहित्याचा अभ्यास केला तर परिस्थिती आणखी बिकट होत जाते. शेतीच्या समस्या काय, शेतकऱ्यांच्या समोरचे प्रश्न काय आणि साहित्यामध्ये उमटणारे प्रतिबिंब काय याचा कुठेच ताळमेळ लागत नाही. कल्पनाविलासाचे मनोरे रचत कलाकृती निर्माण होणे चूक नाही पण त्याला वास्तवाचा थोडाफार तरी गंध असायला हवा कि नको?

> **श्रद्धेला ह्रदय असते, डोळे नसताततच. जिला डोळेच नाही ती डोळस किंवा अंध कशी काय असू शकेल? याउलट विश्वासाचे आहे. आंधळेपणाने विश्वास ठेवायचा कि डोळसपणे विश्वास ठेवायचा हे सहज ठरवता येते. अंधविश्वास सारखा नेमका, तंतोतंत आणि अर्थपूर्ण शब्द उपलब्ध असताना अंधश्रद्धा हा निरर्थक शब्द साहित्यिकांनी एकतर टाळला पाहिजे किंवा त्याच्या अर्थाचा उलगडा तरी केला पाहिजे.**

'शोधात भाकरीच्या निम्मी हयात गेली
स्वप्नेच वांझ झाली, तारुण्य जाळतांना'

देशातील तारुण्याचा विचार केला तर असेच सार्वत्रिक चित्र आहे. भाकरीच्या शोधात निम्मे तारुण्य गारद होत आहे. ना भूतकाळ चांगला होता, ना भविष्यकाळात उज्वल आशेची किरणे दिसत आहेत. जन्माला आलोच आहोत तर मरण येत नाही म्हणून आला दिवस पुढे ढकलत जगत राहायचं, असे चित्र जर सभोवताली पावलोपावली ठळकपणे दिसत असेल आणि मात्र साहित्यात त्याचे प्रतिबिंब जाऊ द्या; साधा लवलेशही दिसत नसेल तर साहित्याला समाजाचा आरसा कसा म्हणता येईल? खरे तर ज्याची अनुभूती त्याने व्यक्त करायला हवी. कामगाराने कामगाराची, व्यापाऱ्याने व्यापाराची, शिक्षकाने शिक्षकाची, कष्टकयाने कष्टकऱ्याची, ऐतखाऊंनी ऐतखाऊंची, शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांची अभिव्यक्ती साकार करायला हवी. तसे झाले तर साहित्य म्हणजे आरसा असे समीकरण आपोआपच प्रतिबिंबित होईल, पण; शेतकऱ्यांच्या बाबतीत तेही शक्य होणे केवळ अशक्य आहे.

अभिव्यक्ती साकार करायला शेतकऱ्याला तर प्रतिभेची, अनुभूतीची आवश्यकताच नाही. शेतकरी कुटुंबात जन्माला येऊन शेतकरी म्हणून जगणे हाच एक ग्रंथ असतो. या ' लाइव्ह' ग्रंथात निसर्गाशी जवळीक, प्राणिमात्रावर प्रेम, बीजांचे अंकुरणे, झाडांचे बहरणे, कळ्यांचे फुलोरणे, फ़ळांचे लदबदणे, धरणीची माया, आभाळाची छाया...... सारं काही असते. त्यासोबतच वेदना, प्रतारणा, शल्य, उबग, उद्वेग, जोष, होश आणि क्षोभ... अगदी सारंच काही असते. फ़क्त एकच गोष्ट नसते आणि ती म्हणजे उसंत. ना जीवनाचा सर्वंकष उपभोग घेण्याची उसंत, ना आपल्या भावना व्यक्त करण्याची उसंत. ना कविता लिहिण्याची उसंत, ना क्षोभ व्यक्त करण्याची उसंत. फ़क्त कष्ट,कष्ट आणि केवळ कष्ट. मग त्या हाडाच्या शेतकर्‍याने साहित्यिक व्हावे तरी कसे? मग आमच्यासारखा थोडीशी संधी मिळताच शेती प्रत्यक्ष कसण्यापासून स्वत:ची सुटका करून घेतलेला, शेतीतल्या कष्टापासून मुक्ती मिळविलेला पण शेतीशी थोडीफ़ार नाळ जुळवून ठेवून बर्‍यापैकी उसंत मिळविलेला शेतकरीपुत्र लेखना-वाचनाच्या, साहित्याच्या जगात संचार करत स्वतःला ' हाडाचा शेतकरी ' म्हणून स्थापित करायला लागतो आणि मग शेती कसण्याच्या प्रत्यक्ष अनुभूतीपासून वंचित झालेला आमच्यातला शेतकरीपुत्र; आम्हाला दुरून दिसलेल्या, जाणवलेल्या, अनुभवलेल्या शेतकर्‍याला शब्दबद्ध करू लागतो. स्वाभाविकपणे मग शेतकर्‍याच्या वास्तविक मूळ वेदनांपेक्षा आमच्या कल्पनाविलासातला शेतकरी वरचढ ठरून जातो आणि अंतिमत: शेतकर्‍याचे मूळ प्रश्न पुरेशा वास्तविकतेने साहित्यात उतरायचे राहूनच जात असावे, असेही समजायला बराच वाव आहे.

मी जेव्हा कविता लिहायला लागलो आणि संकेतस्थळावर तसेच मुद्रित माध्यमात प्रकाशित व्हायला लागल्या तेव्हा 'कवितेचा शेवट आशादायी असावा, होकारात्मक शेवट नसेल तर ते केवळ रुदन ठरते!' असा टीकावजा सल्ला मला अनेक समीक्षकांनी दिला. नभाने पुन्हा एकदा या भुईला दान द्यावे, वरूणदेव प्रसन्न होऊन धो-धो पाऊस पडावा, शिवार हिरवेकंच होऊन फळाफुलांनी मोहरून जावे, सोन्याच्या ताटाला मोत्याची कणसे लागावीत आणि मग

असे झाले की शेतीची भरभराट होऊन शेतकरी आनंदाने नाचायला लागतील, असे काहीसे सकारात्मक चित्र उभे करणे म्हणजे आशादायी शेवट असे त्यांचे मत. पण शेतात सूर्य, चंद्र, तारे, हिरे, माणिक, मोती, सोने, तांबे पिकवूनही ते जर मातीमोल भावानेच खपणार असतील तर.... तर शेतकर्‍याच्या आयुष्यात त्याचे नैराश्य संपून आशादायी चित्र उभे राहणार तरी कसे? मग याला होकारात्मक/आशादायी शेवट म्हणायचा की स्वप्नरंजन म्हणायचे? की होकारात्मक, आशादायी, सकारात्मक असल्या गोंडस शब्दाआडून शेतकरी जीवनाची डोळ्यात केलेली धूळफ़ेक म्हणायची? की असा शेवट करणे म्हणजे केवळ स्वतःच्या मनाच्या समाधानासाठी ओढूनताणून केलेले स्वप्नरंजनच म्हणायचे? जर असे झाले किंवा असे केले तर 'रोग हाल्याला, इंजेक्शन पखालीला' असा प्रकार ठरून रोग्याला आराम तरी कसा मिळेल? मग असे उपचार करण्यापेक्षा उपचार न करणे का वाईट आहे? रोग्याऐवजी पखालीला इंजेक्शन टोचून रोग्याचा आजार वाढवणारे वांझ साहित्य निर्माण होण्याऐवजी नाहीच झाले तर ते जास्त परिणामकारक नाही ठरणार का?

मागील काही वर्षापासून शेतकरी आत्महत्यांनी धारण केलेले विक्राळरूप, अतिवृष्टीने निर्माण झालेल्या ओला दुष्काळ सदृश्य संकटामुळे उत्पादनात येणारी प्रचंड घट, शेतमालाच्या पडत्या बाजारभावामुळे व वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे डबघाईस आलेले शेतीचे अर्थशास्त्र, मागील पाच वर्षांपासून सततची नापिकी, कधी चक्रभुंगा तर कधी बोंडसड, कधी कपाशीवर बोंडअळी तर कधी तुरीवर मर रोग यामुळे शेतीतील उत्पन्नासोबतच उत्पादनही मोठ्या प्रमाणावर घटले आहे, विजेचे बिल देखील भरण्याची शेतकऱ्यांची ऐपत उरलेली नाही. राजकीय आणि शासकीय आघाड्यावर शेतीला आधार देणाऱ्या उपाययोजना शोधण्याऐवजी सक्तीने व बळाचा वापर करून वीजपुरवठा खंडित करण्याच्या, कर्जवसुली करण्याच्या भीमगर्जना केल्या जात आहेत. अशा बिकट स्थितीतही 'रोजचेच मढे, त्याला कोण रडे' अशा निर्विकारपणे शेतीव्यवसायाकडे बघण्याची शासकीय व प्रशासकीय यंत्रणेची मानसिकता तयार झाली आहे त्यामुळे प्रसारमाध्यमे वगळता अन्य कोणत्याही आघाडीवर याविषयीचा फ़ारसा उहापोह होतांना दिसत नाही. मराठी साहित्यक्षेत्रात सुद्धा यापेक्षा वेगळी स्थिती नाही. शेतकऱ्याची मुले शिक्षण घेऊन अन्य व्यवसायात गेली, पोटापाण्याचा प्रश्न सुटल्याने लिहिती होऊन अभिव्यक्त व्हायला लागली पण त्यांनाही शेतीच्या वास्तवाकडे अभ्यासपूर्ण आपुलकीने पाहावेसे वाटत नाही, हे शेतीव्यवसायाचे फार मोठे शल्य आहे.

'असे गैर ती आत्महत्त्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी
परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी'

गेल्या २०-२२ वर्षांमध्ये देशात लक्षावधी शेतकर्‍यांनी आत्महत्या केल्या आहेत; पण त्याचे प्रतिबिंब साहित्यात प्रभावीपणे उमटलेले नाही. शेतीच्या वास्तवतेवर सर्वकष प्रकाश टाकणारे, खोलवर अभ्यासपूर्ण मांडणी करून शेतीच्या दुर्दशेच्या कारणांचा शोध घेणारे, शेतीतील गरिबीचे, ग्रामीण भारतातील दुर्दशेचे खरेखुरे कारण सांगणारे आणि तशी अभ्यासपूर्ण मांडणी करून योग्य मूल्यमापन करणारे आणि त्यावर आवश्यक उपाययोजनांची चाचपणी करून जाणिवा समृद्ध करणारे पुस्तक मराठी साहित्यविश्वात आजही उपलब्ध नसणे ही बाब मराठी साहित्यक्षेत्राचे खुजेपण दर्शविणारी आहे. जे काही साहित्य निर्माण होते ते शेतक ऱ्यांना 'उपदेशाचे डोज' पाजणारे असतात. बरं उपदेशाचे डोज तरी प्रभावी

आणि परिणामकारक असावेत कि नाही? तर ते सुद्धा साहित्यिकांचे अभ्यासदारिद्र्य, कल्पनादारिद्र्य, अनुभवदारिद्र्य व विवेकदारिद्र्य प्रदर्शित करण्याइतके फालतू स्वरूपाचे असतात. कर्ज करून दिवाळी करू नका, कर्ज काढून मुलामुलींच्या लग्नात खर्च करू नका, तीर्थयात्रा करू नका, उत्पादनखर्च कमी करा वगैरे वगैरे सारखे इतके फ़ालतू सल्ले सांगण्यासाठी साहित्यिकाची काय गरज आहे? ते तर कोणत्याही शेंबड्या पोरांनाही कळत असते ना? मग शेतकऱ्याला कळत नाही अशा अविर्भावात जणू काही आपण ब्रह्मज्ञान सांगत आहोत असे साहित्यिकांना का वाटावे? सृजन आणि अभिव्यक्तीची पातळी काय इतकी हीन दर्जाची असावी? आपल्याला जितके कळते तितके किंवा त्यापेक्षा जास्त वाचकांना कळत असेल इतके समजण्याइतपत अक्कल म्हणा किंवा विवेक म्हणा, साहित्यिकांकडे का असू नये? तारतम्याच्या पातळीवर साहित्यिक इतका वैचारिक नादार कसा काय असू शकतो?

मनुष्य म्हटलं कि मर्यादा आल्याच. साहित्यिक हा सुद्धा मनुष्यच असल्याने त्यालाही मर्यादा असणारच हे ओघाने आलेच. आपण आपल्या मर्यादा जाणल्या पाहिजेत. ज्या क्षेत्रात आपला अभ्यास, अनुभव, कर्तृत्व नसेल त्या क्षेत्रात मुशाफिरी करायची असेल तर त्या त्याक्षेत्राचा थोडेसे कष्ट घेऊन अभ्यास केला पाहिजे, त्याला शक्य तेवढी अनुभवाची जोड देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वैचारिक श्रीमंती आली तरच लेखनातही समृद्धी येईल आणि असे लेखन मानवजातीच्या उत्थानासाठी उपयोगी पडेल. वैचारिक दारिद्र्य घेऊन अभिव्यक्ती साकार होत राहिली तर ती अभिव्यक्ती

**'तू पुरोगामी आहेस म्हणजे नेमका काय आहेस?' त्यांच्यात इतरांपेक्षा काय वेगळा गूण आहे, 'इत्तरांपेक्षा तुझा दृष्टिकोन कसा वेगळा आहे' तर अशा प्रश्नाचे उत्तर कुणालाही देता येत नाही. जे इतरांना अज्ञानी समजून तर्क विचारतात, कारणमीमांसा मागतात अशा पुरोगाम्यांना तर अजिबातच उत्तरे देता येत नाहीत. स्वतःचा बडेजाव मिरवण्यासाठी, स्वतःत नसलेले स्वतःचे वेगळेपण प्रदर्शित करण्यासाठी अशा शब्दांचा वापर केला जातो, यापलीकडे या शब्दांना काहीही अर्थ नाही.**



Sahyadri farms


Seeding goodness

# सह्याद्री फार्म्स

## शेतीतील सामुहिक शक्तीचा आविष्कार

- भारतातील सर्वात मोठे द्राक्ष निर्यातदार
- भारतातील अग्रगण्य टोमॅटो उत्पादक आणि प्रोसेसिंग युनिट
- जगभरातील ४२ देशांमध्ये निर्यात

### प्रमुख फळ उत्पादने



द्राक्ष | डाळिंब | टोमॅटो | केळी | स्वीट कॉर्न | संत्री -मोसंबी | आंबा | काजू

### ॲग्रो टुरिझम



### उत्कृष्ट दर्जाचे जागतिक प्रमाण

fssai | FSSC 22000 | GLOBALG.A.P. | FAIRTRADE | FDA US FDA REGISTERED | APEDA एपीडा | BRCGS | TESCO

टोल फ्री क्रमांक. 1800 212 00 2020 www.sahyadrifarms.com /SahyadriFarms

९० व्या अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

# हार्दिक शुभेच्छा



**डॉ कुशल मारोती मुडे**
सहयोगी प्रधयापक
मुंबई

९० व्या अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहीत्य संभेलनास

# हार्दिक शुभेच्छा



**ऍड सतीश बोराळकर**
मुंबई हायकोर्ट



'शोषकांना पोषक' ठरण्याचा फार मोठा धोका ठरण्याची शक्यता बळावते. त्याच बरोबर शब्दयोजना सुद्धा नीटनेटकी आणि नेमकी व्हायला हवी. शब्दयोजना, शब्दांची रचना, शब्दांची मांडणी आणि शब्दांची सजावट यातून भाषा सौंदर्य निर्माण होते. पण शब्द निरर्थक नसतात. 'या हृदयीचे त्या हृदयी' पोचण्यासाठी शब्द अर्थपूर्ण असतात. शब्दांना नेमका व तंतोतंत अर्थ असतो. या हृदयाची भावना त्या हृदयापर्यंत पोचवायची असेल तर शब्दांची योजना नेमकेपणाने होणे अनिवार्य आहे, त्यासाठी निरर्थक शब्दांना बाजूला सारणे सुद्धा तितकेच अत्यंत महत्वपूर्ण ठरते. आपण सारस्वत आहोत, शब्दप्रभू आहोत पण अनेकदा साहित्यिकांच्या हातून असे शब्द योजिले जातात की ज्याचा अर्थ साहित्यिकालाही माहित नसतो आणि वाचकांनाही माहित नसतो. मात्र आपण अर्थार्थी अर्थ लागत नसूनही असे शब्द वापरत राहतो. त्यासाठी उदाहरणादाखल दोन शब्द आपल्यासमोर चर्चेसाठी ठेवतो. त्यापैकी पहिला शब्द अंधश्रद्धा आणि दुसरा शब्द पुरोगामी.

अंधश्रद्धा हा शब्द जवळजवळ सर्वच वापरतात. पण मी गेली अनेक वर्ष त्या शब्दाचा अर्थ विचारतो आहे. त्या शब्दाचा अर्थ कुणालाही सांगता येत नाही मात्र शब्द वापरत राहतात. मूळ शब्द हा अंधविश्वास आहे. विश्वास डोळस असू शकतो किंवा आंधळा असू शकतो पण त्याला पर्यायी म्हणून अंधश्रद्धा हा शब्द कदापिही योग्य नाही. अंधविश्वास या शब्दाऐवजी ऐवजी अंधश्रद्धा हा शब्द मराठीत केव्हा आला, का आला, कोणी घुसवला हे कळायला काहीही मार्ग नाही. अंधश्रद्धा हा शब्द तयार होऊच शकत नाही. हा शब्द अत्यंत निरर्थक आहे.

'श्रद्धा ही श्रद्धा असते
एकतर असते किंवा नसते
पण ती डोळस किंवा आंधळी
वगैरे कधीही नसते'

श्रद्धेचा उगम शोधणे किंवा श्रद्धेची रेसिपी ठरवणे अशक्य आहे. कृत्रिमपणे श्रद्धा निर्माण होत नाही. कधी ती उपजत असते तर कधी स्वभावाच्या बदलावर आधारित असते. श्रद्धा लवचिक नसते आणि परिवर्तनीय सुद्धा नसते. ज्याची कशावर/कुणावर श्रद्धा असते त्याची प्रगाढ असते, ती डळमळीत करता येत नाही आणि ज्याची कशावर/कुणावर श्रद्धा नसते त्याची अजिबात नसते, ती कोणत्याही मार्गाने जडवता येत नाही. श्रद्धेला हृदय असते, डोळे नसतातच. जिला डोळेच नाही ती डोळस किंवा अंध कशी काय असू शकेल? याउलट विश्वासाचे आहे. आंधळेपणाने विश्वास ठेवायचा कि डोळसपणे विश्वास ठेवायचा हे सहज ठरवता येते. अंधविश्वास सारखा नेमका, तंतोतंत आणि अर्थपूर्ण शब्द उपलब्ध असताना अंधश्रद्धा हा निरर्थक शब्द साहित्यिकांनी एकतर टाळला पाहिजे किंवा त्याच्या अर्थाचा उलगडा तरी केला पाहिजे.

पुरोगामी हा आणखी असाच एक शब्द. त्याची व्याख्या कोणालाच करता आली नाही. व्याख्या करता येत नाही, अर्थ माहित नाही पण तरीही हा शब्द सर्रास वापरला जातो. सर्वसाधारणपणे 'जुने ते सर्वच सोने' असे कधीही होऊ शकत नाही. तसेच 'जुने ते सर्व नको' हेही अशक्य आहे. 'नवे ते सर्व हवे' हे जसे पूर्णपणे खरे नसते तसेच 'नवे काहीच नको' हे ही अशक्य असते. त्या त्या काळात, त्या त्या प्रसंगी, जे अनुकूल असेल, कालबाह्य झाले नसेल ते सर्वच्या सर्व माणसाला स्वीकारावेच लागते. त्याला काही पर्याय नसतो. अशा स्थितीत एखादा मनुष्य 'पुरोगामी' आहे म्हणजे नेमके काय आहे याचा कधीही उलगडा होत नाही. मी अनेकांना थेट विचारतो की, 'तू पुरोगामी आहेस म्हणजे नेमका काय आहेस?' त्यांच्यात इतरांपेक्षा काय वेगळा गूण आहे, 'इत्तरांपेक्षा तुझा दृष्टिकोन कसा वेगळा आहे' तर अशा प्रश्नाचे उत्तर कुणालाही देता येत नाही. जे इतरांना अज्ञानी समजून तर्क विचारतात, कारणमीमांसा मागतात अशा पुरोगाम्यांना तर अजिबातच उत्तरे देता येत नाहीत. स्वतःचा बडेजाव मिरवण्यासाठी, स्वतःत नसलेले स्वतःचे वेगळेपण प्रदर्शित करण्यासाठी अशा शब्दांचा वापर केला जातो, यापलीकडे या शब्दांना काहीही अर्थ नाही. मराठी भाषेची शब्दसंपदेची श्रीमंती समृद्ध असताना असले निरर्थक शब्द वापरण्याचा मोह साहित्यिकांनी तरी टाळला पाहिजे.

पुरोगामी या शब्दाची व्याख्या जरी कोणाला करता आली नसली तरी केशवसुतांच्या एका कवितेमध्ये खऱ्या पुरोगामित्वाचे ओझरते दर्शन घडताना आढळून येते. केशवसूत म्हणतात...

' जुने जाऊ द्या मरणालागुनी
जाळुनी अथवा पुरुनी टाका '

जुने सोडून द्यायचे म्हणजे जे जे जुने आहे ते ते सर्वच सोडून द्यायचे का? असा प्रश्न इथे उपस्थित होतो पण त्याचे उत्तरही कवीने नेमकेपणाने कवितेत देऊन ठेवले आहे. कालबाह्य झालेले सोडून देत आणि उद्याच्या उज्वल भवितव्याला पोषक असेल ते सर्व स्वीकारत सतत स्वतःला गतिमान ठेवणे आवश्यक असल्याचे कवीने नेमकेपणाने अधोरेखित केले आहे.

' सडत न एक्या ठायी ठाका'

गतिशीलता थांबून प्रवाह कुंठित होण्याला कवीने 'एकाजागी सडण्याची' समर्पक उपमा दिली आहे. पण पुढे चालत राहणे म्हणजे उगीच दिशाहीन चालून कालापव्यय करत मार्गक्रमण करणे हेही कवीला मान्य नाही.

'सावध! ऐका पुढल्या हाका'

मागील चुकापासून बोध घेत सावध होऊन पुढील भविष्याचा वेध घेत घेत त्या हिशेबाने पावले टाकणे म्हणजे पुढे चालणे. असा स्पस्ट उलगडा कवीने कवितेत समर्पक शब्दात केला आहे.

पण पुढे चालणे, चालत राहणे याने काय साध्य होईल, असा प्रश्न पुन्हा उपस्थित होतोच. जर लक्ष्य गाठण्याची दिशाच स्पष्ट नसेल तर उगीच निष्कारण चालत राहिल्याने काय साध्य होईल? ती तर फुकटची पायपीट ठरेल ना? पण त्याचे उत्तरही कवीने देऊन ठेवले आहे.

'खांद्यास चला खांदा भिडवूनी'

चालायचे म्हणजे स्वतःच स्वतःचा स्वतःपुरता स्वार्थ साधत 'एकला चलो रे' नव्हेच; तर एकमेकांना, समाजाला, सर्व थरातील समूहांना वगैरे सोबत घेऊन चालायचे आहे. त्यासाठी खांद्याला खांदा भिडवायचा आहे. निव्वळ तनेच नव्हे तर मनेही परस्परांशी सांधायची आहेत. एकमेकांच्या दुःखात सहभागी व्हायचे आहे. म्हणजे काय तर भारत-इंडिया दरी संपवायची आहे. धर्मधर्मातील भेद संपवायचे आहेत, अशी समाज रचना निर्माण करायची आहे की, जिथे कुणी शोषक नसेल आणि जिथे कुणाचे शोषण होणार नाही. जुन्याचा त्याग करून आधुनिकतेची आस कशी आणि किती व्यापक असावी याचे उत्तर 'तुतारी' फुंकण्याची पात्रता असलेल्या माणसामध्येच सापडू शकते आणि अशी पात्रता व कसब ज्याच्यात असेल त्यालाच पुरोगामी म्हणता येऊ शकेल.

खरं पाहता कुणी पुरोगामी नसतो आणि कुणी सनातनी नसतो, कुणी धार्मिक नसतो आणि कुणी निधार्मिक नसतो, कुणी आस्तिक नसतो आणि कुणी नास्तिक नसतो, कुणी विद्वान नसतो आणि कुणी ढब्बू नसतो, कुणी ज्ञानी नसतो आणि कुणी अज्ञानी नसतो. आचार-विचाराच्या बाबतीत प्रत्येकात केवळ थोडेफार अंतर असते. एकदमच वर्गविग्रह करून टाकावा, असे कुणाचेच आचरण नसते. ही सृष्टीची विविधता आहे की या सृष्टीने प्रत्येक जीवजंतूला वेगळेपण व अनन्यसाधारणत्व दिलेलं आहे. निसर्गाची प्रत्येक कृती विविधतेने नटलेली असल्याने प्रत्येक जीव, प्रत्येक व्यक्ती सुद्धा अनन्यसाधारण आहे. पहिला दुसऱ्यासारखा नाही तर दुसरा तिसऱ्यासारखा नाही. जगाच्या पाठीवर करोडो लोक आहेत पण एकाचा चेहरा दुसऱ्याशी मिळत नाही, एकाचा आवाज दुसऱ्याशी मेळ खात नाही, एवढेच काय तर प्रत्येकाच्या चालण्याची ढब सुद्धा परस्परभिन्न असते. मनुष्य जसा चेहऱ्यावरून आणि आवाजावरून ओळखता येतो तसाच चालण्यावरून देखील ओळखता येतो, इतके प्रत्येक व्यक्तीमत्व एकमेवाद्वितीय - अद्वितीय असते आणि हेच स्वतःचे वेगळेपण कृत्रिमपणे बटबटीतपणे अधोरेखित करण्यासाठी मनुष्य स्वतःला नानाविध उपाध्यामध्ये बांधून स्वतःला सादर करून चारचौघात मिरवण्याचा अट्टाहास करत असतो.

सृष्टीने कुठेही असमानता ठेवलेली नाही. प्रत्येकाला काही दुर्बलता तर काही बलस्थाने दिली आहेत. प्रत्येकाच्या ठायी कौशल्य आहे. मोदींना देश चालवता येतो, सोनियांना पक्ष चालवता येतो पण माझ्या शेतातल्या व्यक्तीला जितकी तरबेजपणे गाडी आणि सराईतपणे कुऱ्हाड चालवता येते तशी गाडी व कुऱ्हाड ना मोदींना चालवता येणार, ना सोनियांना चालवता येणार. कलेक्टर आयएएस असला तरी त्याला फक्त प्रशासन चालवता येते; माजघरातल्या स्वयंपाक्याइतके स्वादिष्ट भोजन तयार नाही करता येणार. याचा अन्वयार्थ इतकाच की प्रत्येक जीव हा अनन्यसाधारण आहे आणि स्वतःची अद्वितीय कौशल्य-ओळख ठेवून आहे. मात्र सृष्टीने कुठेही भेदभाव केला नसला तरी बेरक्या माणसाला नेमके इतकेच काम अद्वितीयपणे करता आले आहे. कलेक्टरच्या कौशल्याला श्रेष्ठत्व आणि खानसाम्याच्या कौशल्याला हीनत्व ही व्यवस्था दुष्ट मानवी स्वभावातून निर्माण झाली आहे. 'जिसकी लाठी उसकी भैस' आणि 'ज्याची सत्ता त्याची मालमत्ता' ही असली समीकरणे म्हणजे माणसाच्या बेरकी, दुष्ट, कपटी व कारस्थानी स्वभावाने समाजावर लादलेली कृत्रिम व्यवस्था आहे. सृष्टीच्या निकषावर पडताळा घेतला तर सतरा वर्ग शिकल्याने आणि अठरा पुस्तके वाचल्याने कुणी ज्ञानी होतो हे जसे सिद्ध होत नाही तसेच शाळेचे तोंड न पाहण्याने आणि पुस्तकाला हात न लावल्याने मनुष्य अज्ञानी राहतो हेही सिद्ध करता येत नाही. ज्याने सृष्टीची निर्मिती केली त्याच्याकडे कुठलीही डिग्री नव्हती आणि ज्याच्याकडे डिग्री आहे त्याला सृष्टीची निर्मिती करता येत नाही. ज्यांच्याजवळ डिग्री नव्हती असे ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, तुकडोजी यांनी ज्या रचना केल्या तशा रचना डिग्रीधारकांना कधीही करता आल्या नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांच्या साहित्याचे अन्वयार्थ लावण्याचे काम सुद्धा त्यांना आजवर झेपलेले नाही. धाडसाने विधान करायचे ठरवले तर असेही म्हणता येईल की, काही अपवाद वगळले तर जी काही साहित्यनिर्मिती झाली त्या साहित्यात अशिक्षितांनी समाजाला संस्कार, प्रेरणा, चैतन्य आणि दिशा देण्याचे काम केले आहे तर सुशिक्षितांनी केवळ समाजाचे मनोरंजन करण्याचे काम केले आहे. कधी कधी तर हीन-दीनांचे अश्रू पुसून त्याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करण्याऐवजी तेच अश्रू विकून गल्लाभरू बाजारू साहित्य निर्मितीत धन्यता मानली आहे. कदाचित माझे निरीक्षण, अवलोकन चुकीचे असू शकेल, चुकीचे असेल तर आनंदच आहे, साहित्यविषयक माझे अवलोकन चुकीचे ठरावे, अशी माझीही मनोमन इच्छा आहे पण जर दुर्दैवाने हे खरे असेल तर...?

सृष्टीचा खेळ तर फार अजब-गजब आहेच पण सृष्टीच्या नियमांना कलाटणी देऊन स्वहिताची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी बेरकी माणसांनी निर्माण केलेला खेळ त्याहीपेक्षा अजब-गजब आहे. या मानवनिर्मित अजब-गजब खेळात निदान साहित्यिकांनी तरी स्वतःला गुरफटवणे थांबवले पाहिजे. एकदा हा नैसर्गिक व कृत्रिम अजब-गजब खेळ समजून घेतला तर अस्सल अभिजात कल्पना प्रसवण्याचे दरवाजे आपोआपच उघडायला लागून अभिव्यक्ती मानवनिर्मित क्षितिजे लांघून अनंताशी ऋणानुबंध स्थापित करू शकेल. साहित्यिकांचे आयुष्य, जीवनचर्या आणि आचार-विचाराची व्याप्ती डबकांतल्या बेडकासारखी असू शकेल, जर ती अपरिहार्यता असेल तर त्यात काही गैर आहे असेही नाही पण; निदान कल्पना व प्रतिभेला तरी डबक्याच्या सीमात न गुंतवता त्यांना आसमंताच्या पल्याड झेपावण्यासाठी मुक्त ठेवले पाहिजे. जात, धर्म, पक्ष, पंथ, ज्ञान, अज्ञान, शिक्षित, अशिक्षित, आस्तिक, नास्तिक, सनातनी, पुरोगामी वगैरे भेदाभेदांच्या कक्षा साहित्यिकांना ओलांडता आल्या नाही तरी चालतील पण स्वतःच्या प्रतिभेला यात अडकवणे म्हणजे प्रतिभेची नसबंदी करून टाकण्यासारखे आहे.

मित्रांनो, जितकी दृष्टी तितकेच मनुष्याचे क्षितिज असते पण कल्पना आणि प्रतिभेचे क्षितिज चराचर सृष्टीच्या पल्याड असू शकते, इतके सृजकांनी सदैव लक्षात ठेवावे, इतकाच मला याप्रसंगी आग्रह

करायचा होता आणि तो करून झाला आहे त्यामुळे भाषण इथेच थांबायला हवे पण; साहित्य संमेलनाचा अध्यक्ष जर कवी असेल तर अध्यक्षीय भाषणात अध्यक्षांनी निदान एक तरी कविता सादर केली पाहिजे असा एक प्रघात आहे. त्यामुळे एक कविता मी आपल्यासमोर ठेवतो आहे पण आज जी कविता मी घेणार आहे त्या कवितेची कहाणी मोठी विचित्र आहे. एका विशिष्ट मनःस्थितीत आणि भावनेच्या ओघात ती कविता लिहिली गेली. पण लिहून झाल्यानंतर त्या कवितेचे मी सादरीकरण करू शकेन असे कधी वाटले नव्हते आणि तशी अपेक्षा नव्हती कारण त्या कवितेत जो एक असांसदीय शब्द आलेला आहे त्या शब्दाने माझीच गोची करून ठेवली आहे. असा शब्द किंवा तसे वाक्य मी माझ्या व्यक्तिगत जीवनात किंवा सार्वजनिक आयुष्यात कधीही वापरले नाही, उच्चारले नाही त्यामुळे ही कविता पुस्तकातच बंदिस्त होऊन पुस्तकाचीच फक्त शोभा वाढवेल असा माझा स्वतःचा कयास होता.

पण २०१६ मध्ये नागपूरला दुसरे शेतकरी साहित्य संमेलन झाले आणि त्या साहित्य संमेलनात एबीपी माझाचे मुख्य संपादक श्री. राजीव खांडेकर यांनी आपल्या भाषणात प्रामुख्याने तीच कविता वाचून दाखवली; एवढेच नव्हे तर शेतीला न्याय मिळवून द्यायचा असेल तर अशाच अस्सल कविता लिहिल्या पाहिजेत अशी भावनाही व्यक्त केली. पुढे हीच कविता पूर्ण मराठी भाषिक प्रदेशात गाजली, लोकप्रिय झाली, युट्युबवर लाखो लोकांनी बघितली-ऐकली. एबीपी माझाच्या एका विशेष कार्यक्रमात आग्रहाखातर तीच कविता मी सादर केली आणि तिचे जगभर प्रसारणही झाले परंतु एकट-दुकट अपवाद वगळता ही कविता सादर करण्याचे मी कधी धाडस केले नाही. आज मी जे बोललो त्याच विषयाला न्याय मिळावा म्हणून मी हीच कविता घेतो आहे. कवितेचे नाव आहे स्वदेशीचे ढोंगधतुरे. ही कविता सादर केल्यानंतर पुन्हा सर्वांचे आभार मानण्याची औपचारिकता पूर्ण करण्याच्या मनस्थितीत मी असेन किंवा नसेन हे सांगता येत नाही. त्यामुळे आधीच माझे बोबडेबोल व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आणि आपण ऐकून घेतले याबद्दल आपले आभार मानतो आणि आपल्या बोबड्याबोलांना आराम देऊन आपल्यासमोर कविता ठेवतो.

कवितेविषयी सांगायचं झालं तर हा 'नागपुरी तडका' आहे. 'नागपुरी तडका' हा एक नवीन आणि स्वतंत्र काव्यप्रकार आहे. नागपूर आणि आसपासच्या काही जिल्ह्यांत जी मराठी भाषा बोलली जाते ती भाषा आणि भाषेचा लहजा, वऱ्हाडी किंवा झाडी बोलीभाषेपेक्षा पूर्णत: भिन्न आहे. त्यामुळे या बोलीभाषेतील रचनेला मी 'नागपुरी तडका‍ असे स्वतंत्र नांव दिले आहे. पण या प्रकारात मी पूर्णत: निर्भेळ नागपुरी भाषेचा वापर करीत नाही. फ़क्त लहजा आणि काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द यांचाच सीमित वापर करतोय. या काव्यप्रकाराचा आशय व उद्देश, न रुचणाऱ्या रूढी-परंपरा-चालीरीती, न रुचणारी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय धोरणे यांचेवर टीकाटिप्पणीसह घणाघाती घाव घालणे हा उद्देश असल्याने या प्रकारास मी जाणीवपूर्वक ‍नागपुरी तडका‍ असे नांव दिले आहे. या पद्यलेखनामध्ये मी ‍अभय‍ हे टोपणनाव/उपनांव, तखल्लुस/मक्ता म्हणून वापरले आहे.

एक आणखी झाडावरती लटकून मेला काल
तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल

पुन्हा एकदा बिनपाण्याने भाजून गेले शेत
एसीमध्ये आखतोस तू सटरमफ़्फ़टरम बेत
तुला दावतो भकासबंजर तू बांधावरती चाल

खते, औषधी, बीज, मजुरी दसपट झाले भाव
वीज, किराणा, डिझेल, डॉक्टर लुटून नेती गाव
अनब तुला पाहिजे स्वस्तामध्ये शेतीमधला माल

शेतपिकाच्या निर्यातीला जगात आहे वाव
बरकत येऊ शकते हे तर तुलाही आहे ठाव
तरी खेळतोस तू शहाण्या का रे तिरपी चाल ?

आयातीवर सूट देऊनी गाडलास तू बळीराजा
म्हणून वाजतो दारापुढती अंत्यक्रियेचा वाजा
स्वदेशीचे ढोंगधतूरे; खातोस विदेशातली दाल

छल कपटाचा नाद सोडूनी भानावर ये आता
'अभय' जाहली जर भूमिकन्या, मरशील लाथा खाता
तुझी हुशारी, अक्कल तज्ज्ञा बेसुरी बेताल

**धन्यवाद!**

जय जवान! जय किसान!!

**गंगाधर मुटे**
मु. पो. आर्वी (छोटी) - ४४२३०७
ता. हिंगणघाट जि. वर्धा
E-mail :gangadharmute@gmail.com
Mob : 9730582004

# सन २०१५ - पहिले अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन, वर्धा




**पहिले अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन**

**दिनांक : २८ फेब्रुवारी २०१५ व १ मार्च २०१५**

**स्थळ : मातोश्री सभागृह, आर्वी नाक्याजवळ, वर्धा**

**संमेलनाचे अध्यक्ष : मा. शरद जोशी**

**उदघाटक : मा. इंद्रजित भालेराव**

**प्रमुख अतिथी : मा. भीमराव पांचाळे**

**प्रमुख अतिथी : मा. संजय पानसे**

**स्वागताध्यक्ष : सौ.सरोजताई काशीकर**

# सन २०१६ - दुसरे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन, नागपूर










## दुसरे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन

दिनांक : २० आणि २१ फेब्रुवारी २०१६

स्थळ : डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह, नागपूर

संमेलनाध्यक्ष : मा. श्री. रा.रं. बोराडे, ज्येष्ठ साहित्यिक

उदघाटक : मा. श्री. सुरेश द्वादशीवार, ज्येष्ठ पत्रकार

प्रमुख अतिथी : मा. श्री. राजीव खांडेकर, मुख्य संपादक एबीपी माझा

स्वागताध्यक्ष : मा. ॲड श्री. वामनराव चटप, माजी आमदार

# सन २०१७ - तिसरे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन, गडचिरोली










**तिसरे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन**

**दिनांक : २५ आणि २६ फेब्रुवारी २०१७**

**स्थळ : संस्कृती सांस्कृतिक सभागृह, गडचिरोली**

**संमेलनाध्यक्ष : मा. डॉ.प्रा. शेषराव मोहिते, ज्येष्ठ साहित्यिक**

**उदघाटक : मा. डॉ. अभय बंग, ज्येष्ठ समाजसेवक**

**प्रमुख अतिथी : मा. डॉ. किशोर सानप, ज्येष्ठ समीक्षक**

# सन २०१८ - चौथे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, दादर-मुंबई



## ४ थे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन

**बुधवार, ३१ जानेवारी २०१८**

**स्थळ : रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, दादर, मुंबई**

**संमेलनाध्यक्ष : मा. डॉ. विठ्ठल वाघ, ज्येष्ठ साहित्यिक**

**उदघाटक : मा.मकरंद अनासपुरे, समाजसेवक-सिनेकलावंत**

**प्रमुख अतिथी : मा. सौ. सरोजताई काशीकर, माजी आमदार**

**मा. रामचंद्रबापू पाटील, ज्येष्ठ शेतकरी नेते**

**स्वागताध्यक्ष : मा. अभिजित फाळके**

**प्रास्ताविक : मा. श्री. गंगाधर मुटे, कार्याध्यक्ष**

**सूत्रसंचालन : मा. किशोर बळी, गझलकार**

## सन २०१९ – पाचवे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, पैठण









### ५ वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन

दिनांक : २ व ३ फेब्रुवारी २०१९
स्थळ : संत एकनाथ ज्ञानपीठ, माहेश्वरी जनकल्याण सभागृह, पैठण जि. औरंगाबाद


मायबोली गौरवगीताने प्रारंभ
संमेलनाध्यक्ष :मा. इंद्रजीत भालेराव, ज्येष्ठ साहित्यिक
उदघाटक : मा. राजेश राजोरे, ज्येष्ठ पत्रकार
स्वागताध्यक्ष : ॲड. मा. सतीश बोरुळकर



### ६ वे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन, अलिबाग

दिनांक : ८ व ९ फेब्रुवारी २०२०
स्थळ : क्षात्रैक्य सभागृह, अलिबाग जि. रायगड
संमेलनाध्यक्ष : मा. भास्कर चंदनशिव, ज्येष्ठ शेती साहित्यिक
उदघाटक : मा. संजय राऊत, ज्येष्ठ पत्रकार, संपादक, सामना

विशेष अतिथी : मा. सुनील तटकरे, लोकसभा सदस्य, रायगड
मा. राजीव खांडेकर, संपादक, एबीपी माझा
संयोजक : मा. ॲड सतीश बोरुळकर, मुंबई हायकोर्ट
स्वागताध्यक्ष : मा. ॲड प्रदीप पाटील, मुंबई हायकोर्ट




- महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर आधारित जगातील एकमेव ऑडियो गाईडेड संग्रहालय
- महात्मा गांधींवरील भव्य शैक्षणिक व संशोधनात्मक ग्रंथालय व अभिलेखागार
- गांधीजींच्या कृतिशील विचारांवर आधारित समाजकार्य विषयात डिप्लोमा पाठ्यक्रम
- विद्यार्थी व बंदिजनांसाठी 'गांधी विचार-संस्कार' परीक्षांचे आयोजन
- महिला सशक्तीकरण व ग्रामविकास अभियान
- व्याख्यानमाला, चर्चासत्रं व शिबिरांचे आयोजन

**गांधी रिसर्च फाऊंडेशन**

*• सत्य • अहिंसा • शांती*

गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) भारत
दूरध्वनी: +९१ २५७-२२६००३३, २२६४८०३, ९४०४९५५३००, ९४०४९५५२२०
इ-मेल: info@gandhifoundation.net; वेबसाइट: www.gandhifoundation.net

*जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. आणि भवरलाल अॅन्ड कांताबाई जैन फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम*

**गांधी तीर्थ संग्रहालय: सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ पर्यंत** (सोमवार बंद)

अंकुर सीड्स
ची वचनबद्धता...
नाविन्यपूर्ण संशोधन, शेती मार्गदर्शन, शेती विकास व गुणवत्ता !

Ankur®

नवीन वाण




**हिरव्यागार शेतात, माळ बोंडाची ।**
**हीच किमया, अंकुर किर्तीची ॥**

अंकुर **किर्ती** बीजी-II

नवीन वाण




**मोठ्या बोंडाची**
**नवीन संकल्पना !**

अंकुर **हरीश** बीजी-II

**अंकुर सीड्स प्रायव्हेट लिमिटेड**
27, न्यू कॉटन मार्केट लेआऊट, नागपूर 440018 (महाराष्ट्र)

Ankur Seeds Pvt. Ltd.